*1st Row : Left to Right* :—1. Mr. B. M. Patil (Secretary). 2. Mr. B. H. Patil. 3. Prof. C. R. Potnis (Chairman G. M. C.). 4. Prin. Y. S. Mahajan. 5. Mr. R. K. Dikshit (Prof. in charge.) 6. Mr. V. K. Patil (G. S.). 7. Mr. L. R. Chandgude (Captain).

*2nd Row : Left to Right* :—1. Mr. Pillay. 2. Mr. B. H. Kulkarni. 3. Mr. G. V. Patil. 4. Mr. R. S. Sharma. 5. Mr. C. V. Natkhede. 6. Mr. S. K. Rasse.

*3rd Row : Left to Right* :—1. Mr. R. V. Sharma. 2. Mr. V. K. Guntha 3. Mr. G. L. Acharya. 4. Mr. D. D. Tayade. 5. Mr. S. Y. Kulkarni.



**Mr. B. H. Patil,** General Champion, 1950.



**Miss. Pushpa Karnik,** Ladies' Champion, 1950.



# *PLASTICS AND SYNTHETIC RUBBERS

Plastics are essentially high-polymers. The essential chemical reaction involved in the synthesis of plastics, is therefore, "Polymerisation" of simple comparatively small molecules into macromolecules. This can be achieved under the catalytic influence of certain substances. Ethylene, which is a gas, with a molecular weight of 28, when heated under pressure, with a little oxygen, polymerises to a solid substance, which is very tough and elastic. This is "Polyethylene" or "Polyethene" (mol. wt. 40,000). It is not acted upon by acids or alkalies, softens at 115°C and thus can be moulded into any desirable shape at that temperature. It has a very low dielectric constant and therefore can be used as a good insulating material. Its low m. p., however comes in the way of it being used at high temperatures.

The m. pt. of the material can however be elevated by substituting one Hydrogen atom with a poler group such as Chloro or Carbonyl groups. Thus, if instead of ethylene, chloro-ethylene is polymerised in a similar way, the resulting plastic—" Poly-chloro-ethylene "—has all the properties of Polyethene and has a m.p. 160°C. However, in introducing the polar group, a dipole is created in the molecule, and the dielectric constant is increased, thus depriving the material of its insulating properties.

A new method has been developed to increase the point of softening of a polymer, without increasing its dielectric constant. This consists in the stiffening of the chain, which constitutes the polymer. Thus if the four hydrogens in ethylene are replaced by a bigger atom such as Fluorine, then that would stiffen the polymer, by obstructing the flexibility of the normal carbon chain. The compound thus obtained " Poly-Tetra Fluoro-ethylene " has been found to have the m.p. 360°C and has low dielectric constant. Thus, it retains the elasticity and insulating property of "Polyethene", at the same time withstanding high temperatures.

Various other plastics, which we see in the market today are essentially the high-polymers of the above type, the parent substances being chosen according to the desired properties.

Synthetic fibres such as "Neylon" and Synthetic rubbers also belong to the same class. The essential practical difference between them is only in the degree of elasticity, that they possess. Neylon when stretched does not snap back to the original position. Rubber snaps back immediately, the strain is removed. While plastics are elastic and can be twisted and deformed in any way but come back to the original position very slowly. This can be explained

* An extract of the popular lecture delivered by Prof. Hermann Mark at the Indian Science Congress, Poona on 6th Jan. 1950.

on the intramolecular forces of attraction present in the molecules.

In polymers the macromolecules are grouped in a random way. When we stretch the polymers the molecules are parallelised and are said to have been "crystallised." This has been clearly illustrated by the X'ray pictures of these stretched fabrics. If enough intra-molecular attraction force is present, then even on removing the stretching force the crystalline molecules will retain the form i.e. the stretched polymer will not snap back to the original state. In synthetic fibre this force is strong, while in rubbers this is very weak. Plastics stand somewhere between the two.

This can be very well illustrated in case of neylon. In neylon, which contains a carbonyl and an amino group the intra-molecular force is furnished by the "Hydrogen-bridge" between the two groups. If therefore, we can replace the hydrogens of the amino by any other group, say metals, then "Chelation" would not be there and thus the intra-molecular force would be weakened. Practically, such a fibre would have the elasticity of a rubber. Experimentally, this has been achieved and a dimetal-neylon fabric when stretched, snaps back immediately like a rubber.

The chemistry of plastics and synthetic rubber is therefore the chemistry of high polymers and it opens before us a vast field for useful research. A large number of things, in everyday use, can thus be synthesised from cheap and plentily available resources.

—M. D. N.

— STOLEN SMILES —

A farmer's barn burned down and the agent for the insurance company, explaining the policy that covered the structure, told him that his firm would build another barn of similar size instead of paying the claim in cash. The farmer was furious.

"If that is the way you do business," he exploded, "you can just cancel the insurance on my wife."

× × ×

Three deaf ladies were travelling on top of an open bus. "Windy, isn't it ?" said one.

"No, it is not Wednesday. It is Thursday." said the second.

"Yes, I am thirsty too. Let us all get down and have something to drink."

× × ×



# A VISIT TO BHARAT VANASPATI FACTORY

BY : M. M. KAZI, SR. B. SC.

When our professors explain to us in the class, the working of some scientific processes, we, for a while hesitate to believe in them, and feel that, they are simply leading us into a dream-land. Our knowledge of various scientific mysteries however, forces us to believe in them. But we are not perfectly convinced about the successful working of these processes, unless we see them actually. Thus when we see these being worked out before our eyes we regain the confidence in all the scientific phenomenæ; and further-more we begin to believe in the various scientific dreams, dreams originally by the great Scientists and subsequently turned into realities, and also to visualise new dreams ourselves. That is the difference between the description of a scientific process and seeing its actual working. With these feelings, we very eagerly took the opportunity of visiting the Bharat Vanaspati Factory at Pachora, on the 24th December last.

We reached Pachora at about 11 a. m. and the authorities immediately took us round the factory in three batches. We were first taken to the Laboratory, where a sample of the oil is tested for its free acid content and the colouring matter. For the manufacture of Vanaspati ground-nut oil is usually employed. An oil, is a glyceride i. e. an ester of glycerine with higher fatty acids. Along with these glycerides an oil also contains some free acids, which are required to be removed, before the oil is 'hydrogenated' i. e. the unsaturated glyceride is saturated with hydrogen. If these acids are not removed, the "Vanaspati" or the "Vegetable Ghee" becomes rancid. These are determined by titrating a weighed amount of the oil, dissolved in rectified spirit, with a standard caustic soda solution. After thus determining the amount of free acids, an equivalent amount of sodium hydroxide is added to the oil, in a big funnel shaped vessel, known as the neutraliser. The mixture of the oil and the caustic soda is heated with steam, when the free acids are neutralised and form salts, which are called "soaps". These collect at the bottom of the neutraliser and are led away through the opening below and subsequently used in the manufacture of soap.

The neutralised oil is then led into a second vessel, called the bleacher. The amount of colouring matter present is previously determined in the laboratory, by comparing the colour of the oil with standard coloured plates. An equivalent quantity of Fuller's Earth is added and the oil is heated under vacuum.

The bleached oil is then carried to the hydrogenation plant. Where it is hydrogenated under the catalytic influence of active nickel. The catalyst is obtained by reducing nickel formate

in a different plant. Pure hydrogen required for hydrogenation is obtained by what is known as Iron-steam process. This consists in reducing the iron ore ($Fe_3O_4$) to metallic iron by water-gas and subsequently passing super-heated steam over the reduced metal, when the metal is oxidised back to the oxide and hydrogen is liberated. Hydrogen thus obtained is purified and then forced under pressure into the vessel containing the oil and the catalyst, being continuously stirred and maintained at a temperature of 180°C and two atmospheres pressure. The oil takes up hydrogen and gets saturated and thus is solidified. The extent of saturation is so adjusted, that the melting point of the hydrogenated oil remains near about normal temperature of the body. The Govt. have specified this melting point to be between 35° and 40°C.

After "hydrogenation" the oil is led into another vessel— "Deodoriser," where it is heated with super-heated steam at 200°-225°C, under reduced pressure, to expel all sorts of odours and exessive hydrogen. It is later reneutralised, filtered and finally blended with some flavours in a mixer. Ultimately, it is carried to the packing counter, where it is packed in tins and is ready for our service as the "Vegetable Ghee."

After taking a round through the factory and thus getting a clear idea of the whole process, we returned to the factory office. Our hosts, treated us to light refreshments and all of us enjoyed it thoroughly. The manager spoke a few kind words and we took leave of them, thanking them for the fine arrangements they had made.

After returning to Jalgaon, we went to the Municipal Gardens and enjoyed our refreshments, which could not till then be made justice to, due to the hospitality of our hosts at Pachora. Mr. Kaiser and Mr. B. S. Patil, proved to be very good companions for our entertainments. Before concluding, I must pay my respects to our professors and demonstrators who were very free and friendly with us during the trip. We are grateful to them and particularly to Dr. Sathe, who gave us the opportunity to learn and enjoy. Finally we dispersed, with a few closing words by Prof. Thatte.

———

"Did you write the poem yourself?" asked the editor.

'Yes" replied the contributor, "Every line of it."

"Then I am glad to meet you, Edgar Allan Poe," said the editor,

"I thought you were dead long ago."





**Customer** —I want a thermometer for my husband. He has fever.

**Chemist** —Fahrenheit or Centigrade?

**Customer** —What is the difference? Give me the one which will cure him quickest.

**—Vidyadhar Bhortakay**
Sr. B. Sc.

———

*Advice to Collegians :—*

Your College-Course represents a substantial investment on the part of your Guardian !

Safeguard it by insuring your life with us. For an annual premium of Rs. 96/4 only, we cover you for Rs. 5,000/-.

Please drop a card or better still, call on us for a personal discussion !

Local Office :—148, Navi Peth, **Jalgaon,** E. K.

**WESTERN INDIA LIFE INSURANCE Co. Ltd.,**
**SATARA.**

**Memorise Great Occasion of Life by having them Photographed.**

The following types of work will be artistically and efficiently Carried out.

1. Indoor & Out-door Photography
2. Enlargements
3. Cinema slides
4. Portrait painting

*Enquire at :—*

Pro:— **G. D. Chaudhari,**
G. D. Art (Bombay).

**SHAMENDU STUDIO,**
Opposite Chitra Talkies,
Jalgaon, E. K.

**प्रजासत्ताक भारताचे पहिले राष्ट्रपति बाबू राजेंद्रप्रसाद**



" जगांत विश्वासाचें व सहकार्याचें वातावरण निर्माण व्हावें अशी आमची सदिच्छा आहे. आमचें नवें प्रजासत्ताक राष्ट्रजनक महात्मा गांधी यांनीं घालून दिलेल्या चतुःसूत्रीवर चालणार आहे. सहिष्णुता, आत्मौपम्य वृत्ति, अहिंसा व आक्रमणाचा प्रतिकार हीं आमचीं मुख्य धोरणें राहणार आहेत. "

[ ब्लॉक् चित्रशाळा प्रेस, पुणें यांच्या कृपेनें— ता. २६–१–१९५०]

## प्रवेशद्वाराजवळ



★

गगनस्पर्धी



फोटो—श्री. डहाळे



# अजिंठा

मुं. जे. आर्ट्स् व सायन्स कॉलेज, जळगांव, पू. खा.

नियतकालिक

## — मराठी विभाग —

वर्ष ४ थें ] १९५० [ अंक ४ था

### पसायदान

आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें । तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ॥
जे खळांची व्यंकटी सांडो । तयां सत्कर्मी रती वाढो । भूतां परस्परे जडो । मैत्र जीवाचें ॥
दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्यें पाहो । जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात ॥

—ज्ञानेश्वर

# पहिलें प्रेम

पावसाळी दिवसांत
तुझी माझी झाली भेट
उमलला फुलबाग
उन्मेषला अनुराग
फुलाफुलांवर होतें
गुलाबी पहिलें प्रेम
माझ्याकडे पाहुनिया
तुझ्याकडे पाहुनिया
सुकुमार पांखरांची
नवथर अंतरांची
मंद वायुलहरींनी
तुझी माझी नि मोहिनी
होती जरा लाजरी ग
अंतरींचे मुग्ध भाव
जगीं दिसे हीच नीति
पहिल्याच भेटी अंतीं
नेलेंस तदा चोरूनी
आणि झालीस सखये
कशी पुसून टाकूं ग
होते मानवजीवनीं

हसहसे फुलबाग
मुसमुसे अनुराग
पहिल्याच वर्षावाने
पहिल्याच दर्शनाने
विनटले नवरंग
उमललें अंतरंग !
खाली झाली तुझी मान,
विसरलों देहभान !
हळुवार फडफड
सुकुमार धडधड
तुझा उडाला पदर
होई नजरानजर
पहिलीवहिली भेट
उलले, भिडले थेट
प्रणयाची हीच रीति
होई प्रीति वा अप्रीति !
हृदय तूं रूपखाणी,
माझ्या हृदयाची राणी !
पहिल्या भेटीची स्मृति !
अमर पहिली प्रीति !!

—इंद्रराव पवार.



# ऐतिहासिक कादंबरी आणि उषःकाल

( लेखक : मु. ना. नेमाडे, सीनियर बी. ए. )

इतिहास आणि कादंबरी या दोन गोष्टी अगदी भिन्न आहेत, नाही ! या भिन्नत्वामुळेच 'ऐतिहासिक कादंबरी' हा शब्दप्रयोग वरवर पाहणाऱ्यास विचित्र वाटतो. परंतु वैचित्र्यांतूनच मनुष्याला आनंद प्राप्त होतो असा अनुभव आहे. तांबडा आणि पांढरा यांच्या मिश्रणांतूनच सर्वांच्या डोळ्यांना आनंद देणारा गुलाबी रंग तयार होतो. मनाला प्रसन्न करणारें आकाशांतील इंद्रधनुष्यसुद्धा अशाच प्रकारें निरनिराळ्या सहा रंगांच्या मिश्रणामुळे उत्पन्न झालेलें दिसतें. ऐतिहासिक कादंबरीपासून आपणांस जो आनंद होतो त्याचें कारण किंवा ऐतिहासिक कादंबरी वाचावीशी वाटण्याचें कारण म्हणजे तिच्यांतील इतिहास व कादंबरी या दोन भिन्न, वैचित्र्यपूर्ण अशा गोष्टींचें बेमालूम मिश्रण होय.

इतिहासामध्ये भूतकालांतील प्रसिद्ध घटना, प्रसंग, व्यक्ति, राजे, लढाया वगैरेंचा समावेश होतो. इतिहास सत्याधिष्ठित असतो. म्हणजे त्यांत वर्णिलेल्या व्यक्ति, प्रसंग प्रत्यक्ष होऊन गेलेल्या असतात. परंतु इतिहासांतील हें जें सत्य असतें त्याबद्दल निरनिराळीं मतें आढळतात. कोणी म्हणतात कीं इतिहासांतील सत्य हें अपूर्ण असतें तर कोणी म्हणतात तें पूर्ण असतें. असें जरी असलें तरी एक गोष्ट सर्वांना मान्य आहे आणि ती म्हणजे इतिहासांत सत्य असतें. फरक आहे तो फक्त प्रमाणाचा. म्हणून इतिहासाचें कार्य सांगावयाचें झाल्यास सत्यशोधन हें सांगितलें जातें.

संस्कृत भाषेंत 'कादंबरी' या शब्दाला 'मद्य' असा अर्थ आहे. एका दृष्टीने पाहिलें तर कादंबरी व मद्य या दोन शब्दांत साधर्म्य आहे. ज्याप्रमाणे मद्यपान करणारा, मद्याचा आस्वाद घेणारा आपलें देहभान विसरून जातो त्याप्रमाणेच कादंबरी वाचणारा, कादंबरींतील रसाचा आस्वाद घेणाराहि देहभान विसरल्याशिवाय राहात नाही. मराठी भाषेमध्ये 'कादंबरी' हें नांव विशिष्ट प्रकारच्या वाङ्मयप्रकारास मिळण्याचें सर्व श्रेय बाणभट्टाच्या संस्कृत 'कादंबरी' स आहे. या वाङ्मयप्रकारास 'नावल' हें दुसरें नांव सुचविलें गेलें होतें. नावल म्हणजे नवलपूर्ण अशा कथांचा संग्रह. परंतु तें नांव इतकेंसें मान्य होऊं शकलें नाही. कादंबरी कल्पनाधिष्ठित असते. कल्पित गोष्टींनाच कादंबरींत जास्त महत्त्व असतें.

ऐतिहासिक कादंबरी म्हणजे इतिहास व कादंबरी यांचा सुंदर संगम. ऐतिहासिक घटना, व्यक्ति आणि काल्पनिक घटना, व्यक्ति यांचा हृदयंगम संगम म्हणजे ऐतिहासिक कादंबरी. शुक-रंभा यांचें मीलन म्हणजे ऐतिहासिक कादंबरी, शर्करावगुंठित कोयनेलची गोळी म्हणजे ऐतिहासिक कादंबरी. सत्य आणि कल्पना, सत्य आणि अद्भुतता यांपैकी कोणत्याहि एका बाजूला आपला तोल जाऊं न देतां ऐतिहासिक कादंबरीला सत्याभासाच्या तारेवर नाच करावा लागतो.

इतिहास वाचल्यावर त्यावेळचे प्रसंग, व्यक्ति यांचें बाह्यस्वरूप आपल्या डोळ्यासमोर उभें राहातें हें खरें, परंतु ऐतिहासिक कादंबरी वाचल्यावर त्यावेळच्या परिस्थितीचें, कालाचें, समाजजीवनाचें हुबेहुब चित्र किंवा त्या काळांतील व्यक्तींचें अंत-

बाह्य स्वरूप आपल्यापुढे उभें राहातें. इतिहासांत भूतकालांतील घटना, काल, व्यक्ति यांची नुसती नोंद किंवा यादी असते. परंतु ऐतिहासिक कादंबरींत त्या कालाचें, वातावरणाचें, व्यक्तींचें स्पष्ट चित्र उमटलेलें पाहावयास सापडतें. इतिहास फक्त प्रसिद्ध किंवा प्रमुख घटना, प्रसंग, व्यक्ति यांची माहिती सांगतो तर ऐतिहासिक कादंबरी अज्ञात, सामान्य, अशा व्यक्ति, घटना यांच्यावर प्रकाश पाडते. इतिहासांतील निरनिराळ्या घटनांत, व्यक्तींत, कालांत जें अंतर दिसून येतें तें भरून काढण्याचें कार्य ऐतिहासिक कादंबरी करते. वाक्यांतील कोऱ्या जागा भरून काढणाऱ्या शब्दांचें जें काम वाक्यांत असतें किंवा जें महत्त्व वाक्यांत असतें तेंच काम किंवा महत्त्व ऐतिहासिक कादंबरीला इतिहासांत असतें.

निरनिराळ्या पाश्चात्य लेखकांनी आपलीं ऐतिहासिक कादंबरीविषयीं मतें मांडण्याचा प्रयत्न केला आहे. ए. टी. शेपर्ड ऐतिहासिक कादंबरींतील सत्य आणि कल्पना याविषयीं म्हणतो कीं ऐतिहासिक कादंबरी ही भूतकाळांतील कथा असणें आवश्यक आहे. त्या कथेंतील कल्पना ही सत्याला पूरक असली पाहिजे. (" The historical novel must of necessity be a story of the past in which imagination comes to the aid of fact " — A. T. Sheppard ). बटरफील्ड ऐतिहासिक कादंबरी व इतिहास यांच्या संबंधाविषयीं म्हणतो, " ऐतिहासिक कादंबरी ही अनेक वस्तूंचें मिश्रण आहे. निरनिराळ्या कलांच्या संगमांतून निर्माण झालेल्या अनेक कलांपैकी ती एक कला आहे. ज्या इतिहासाविषयी ऐतिहासिक कादंबरीकाराला लिहावयाचें असतें त्या इतिहासाला थोड्या प्रमाणांत चिकटून राहावें लागतें. परंतु हा कलांचा संगम असल्यामुळे संपूर्णपणे इतिहासाला चिकटून राहण्याची आवश्यकता नाही. " ("The historical novel is a fusion. It is one of the arts that are born of the marriage of different arts. The historical novelist owes a certain loyalty to the history of which he treats. But because this is a marriage of the arts it is not a complete loyalty "—Butterfield). एफ्. डब्ल्यू. हेज यांचें म्हणणें असें कीं जी गोष्ट पुराव्याने सिद्ध करतां येईल आणि जी पुराव्याने असिद्ध करतां येणार नाही ती ऐतिहासिक कादंबरी होय. (" What could be proved by evidence and what could not be disproved by evidenee " F. W. Hayes ) ऐतिहासिक कादंबरी व तिच्यांतील सत्याचें स्थान यांविषयी ए. टी. शेपर्ड म्हणतो कीं जो कल्पक लेखक आपल्या लिखाणाला ऐतिहासिक पार्श्वभूमि निवडतो त्याला कोणतीहि सवलत दिलेली असो त्याला अनावश्यकपणे सत्यापासून परिवर्तित ( विचलित ) होण्याची परवानगी नसावी. शक्य तितक्या जास्त प्रमाणांत सत्य गोष्टी ज्या पुस्तकांत ग्रथित केल्या असतील तितकें तें पुस्तक चांगलें. खूप प्रसिद्ध अशा ऐतिहासिक कादंबरीकारांनी, जणू काय नियम म्हणून, शक्य तितकें इतिहासाला चिकटून राहण्याची काळजी घेतली आहे. ( " Whatever license may be given to an imaginative writer who takes history as his background no unnecessary departures from fact should be permitted. The more closely facts are followed the better is the book. The greatest writers of historical fiction have as a rule, been careful to keep as closely as possible to history. '—A. T. Sheppard.) ऐतिहासिक कादंबरीला सत्याभासाच्या तारांवर कसा नाच करावा लागतो हें सांगतांना लेस्ली स्टीफन म्हणतो कीं ऐतिहासिक कादंबरी ही वाङ्मयांतील एक संकरजात आहे. सत्याचा विपर्यास झाला तर इतिहासकार एका बाजूस आणि कादंबरी आकर्षक झाली नाही तर वाचक दुसऱ्या बाजूस दोष द्यावयास तयार असतात. ( "Historical novel is a literary hybrid which is apt to offend opposite sides. Either the historian condemns it of inaccuracy or novel reader



condemns it for dullness. " — Leslie Stephen. ) जोनॅथन नील्ड म्हणतो कीं ज्या कादंबरींतील सन, व्यक्ति व प्रसंग सिद्ध करण्याकरिता सहज पुरावे देतां येतील त्या कादंबरीला ऐतिहासिक कादंबरी म्हणतात. ( " A novel is rendered historical by an introduction of dates, personages or events to which identification can be readily given " — Jonathan Nield ).

ऐतिहासिक कादंबरींतील मुख्य प्रसंग हा ऐतिहासिक म्हणजे प्रत्यक्ष घडलेला असावा. या मुख्य कथानकाभोवती एक अथवा अनेक उपकथानकें — मग तीं ऐतिहासिक असोत वा काल्पनिक असोत — फिरणारीं असावींत. या मुख्य कथानकाचा व उपकथानकांचा संबंध इतका घनिष्ठ असावा कीं तीं सर्व एकजीव झालेलीं दिसावींत. ज्या व्यक्ति ऐतिहासिक असतील त्या विशेष प्रसिद्ध नसल्या तरी चालतील पण त्यांच्याबद्दल आज समाजांत रूढ असलेल्या भावना, विचार, चरित्र वगैरेंना धक्का पोचतां कामा नये. त्या ऐतिहासिक व्यक्तींच्या चित्रणामध्ये विसंगति नसावी. जे प्रसंग ज्या कालांत, ज्या ठिकाणीं, ज्या व्यक्तींकडून घडले असतील ते प्रसंग त्याच कालांत, त्याच ठिकाणीं, त्याच व्यक्तींकडून घडलेले दाखविले गेले पाहिजेत, म्हणजे स्थल, काल, व्यक्ति यांचा विपर्यास होऊं नये. याकरिता तत्कालीन इतिहासाचा, समाजजीवनाचा सूक्ष्म अभ्यास असणें जरूर आहे.

बखरींचा उपयोग या दृष्टीने फारसा होणार नाही, व तसें करणेंहि इष्ट होणार नाही. एक व्यक्ति दुसऱ्या व्यक्तीला आपल्या राज्यांतील माहिती कळवते. परंतु ती कळवतांना स्वतःच्या भावनांचा, विचारांचा त्या माहितीवर कळत नकळत परिणाम होऊन ती माहिती पाठवली जाते. हा सर्वसाधारण स्वभाव आहे मनुष्याचा. तेव्हा या दंतवजा असणाऱ्या माहितीवर ऐतिहासिक सत्याच्या दृष्टीने कितपत अवलंबून राहतां येईल ?

ऐतिहासिक कादंबरी ज्या कालाची लिहावयाची तिचा कोणता काल असावा कीं ज्यास ऐतिहासिक काल म्हणतां येईल ? म्हणजे ऐतिहासिक कालाची मर्यादा कोणती व किती आहे ? ज्या घटनांविषयी आपणास लिहावयाचें असेल त्या घटना ज्यांनी प्रत्यक्ष पाहिल्या आहेत त्यांच्याकडून मिळालेल्या ऐकीव माहितीवरून ऐतिहासिक कादंबरी लिहिली जाऊं नये. त्याच्याहि पलीकडचा काल निवडला पाहिजे. या दृष्टीने विचार करतां असा १०० वर्षांपूर्वींचा काल ऐतिहासिक काल होऊं शकेल. त्या १०० वर्षांच्या आंतील कालावर आधारलेल्या कादंबऱ्या ऐतिहासिक कादंबऱ्या न होतां कालखंडात्मक कादंबऱ्या होतील.

नंतर असा एक प्रश्न विचारांत घेण्यासारखा आहे कीं ऐतिहासिक कादंबरींत आजच्या कालाचे सामाजिक, राजकीय, धार्मिक प्रश्न कितपत उत्पन्न करावेत ? लेखकाने स्वतःच्या विचारांतून, दृष्टिकोनांतून, मतप्रणालींतून ऐतिहासिक कादंबरींतील मुख्य वा उपकथानकांचें विवरण करावें काय ? याचें उत्तर नकारात्मक द्यावें लागेल. कारण त्यामुळे वाचकांची अशी चुकीची समजूत होईल कीं आजचेच प्रश्न, मतें, विचारप्रणाली त्या कालांतहि अस्तित्वांत होती. आणि अशा प्रकारची चुकीची समजूत वाचकांची करून देऊन त्यांची दिशाभूल करण्याचें पातक लेखकाच्या हातून होईल; त्या कादंबरींत कालविपर्ययाचा दोष उत्पन्न होईल.

ऐतिहासिक कादंबरी लिहिण्यांत जसे फायदे आहेत तसे तोटेहि आहेत. ऐतिहासिक कादंबरींचें मुख्य कथानक तयार असतें. कांही उपकथानकांची थोडी मदत घेण्याचें फक्त शिल्लक राहतें. ती मदत घेऊन मुख्य कथानकाला उठावणी द्यावयाची. तसेंच वाचकाला कादंबरी हातांत घेतांना कादंबरीची थोडीफार कल्पना असल्यामुळे त्याची मनोभूमिका योग्य ते संस्कार करून घेण्यास संस्कारक्षम झालेली असते. त्यामुळे ऐतिहासिक कादंबरीमुळे होणारे परिणाम खोलवर, पुष्कळ काल टिकणारे

असे होतात. पूर्वी होऊन गेलेल्या थोर, प्रसिद्ध व्यक्तींविषयी वाचकाच्या अंतःकरणांत एक प्रकारचा आदर वसत असतो. आपणास जर त्या व्यक्ती-सारखे होतां आलें तर किती चांगलें होईल असा विचार त्याच्या डोक्यांत हळूच डोकावतो. आणि त्या व्यक्ति पूर्वी होऊन गेल्याची जाणीव त्यास झाली म्हणजे तसें होण्यामध्ये त्यास कांही अशक्यता वाटत नाही. अशा मनावर सुपरिणाम करणाऱ्या कादंबऱ्या कोणाला वाचाव्याशा वाटणार नाहीत ? शिवाय ऐतिहासिक कादंबरीमुळे राष्ट्राबद्दल अस-लेला सुप्त अभिमान जागृत करतां येतो, राष्ट्राबद्दल असलेलें प्रेम उज्ज्वल करतां येतें. परंतु कांही दोष, तोटेहि सांगतां येतील. ज्याप्रमाणे इतर कादंबऱ्या वाचतांना वाचकाला प्रथमपासून शेवटपर्यंत औत्सुक्य वाटतें तसें ऐतिहासिक कादंबरी वाचतांना वाटत नाही. कारण त्यांतील घटना, प्रसंग, व्यक्ति यांच्याविषयी माहिती असते त्याला. परंतु ऐतिहासिक प्रसंग, व्यक्ति, तसेंच काल्पनिक घटना, व्यक्ति यांना एकत्र करण्याचें, एकमेकांत गुंतविण्याचें, अधिक परिणामकारक, हृदयंगम करण्याचें ज्ञान व कौशल्य ऐतिहासिक कादंबरीकाराजवळ असलें म्हणजे झालें.

वर उल्लेखिलेले व इतर कांही गुण ज्या ऐति-हासिक कादंबरींत असतील व दोष नसतील ती खरी ऐतिहासिक कादंबरी होय. थोडक्यांत ऐतिहासिक कादंबरीविषयी पुढील कांही गोष्टी सांगतां येतील. इतिहासापेक्षासुद्धा ऐतिहासिक कादंबरी लिहितांना ऐतिहासिक संशोधन, तत्कालीन समाजाचा, राष्ट्राचा अभ्यास जास्त असावा. ऐतिहासिक कादंबरी सामान्य व्यक्ति, प्रसंग यांची प्रतिभेच्या व कागद-पत्रांच्या साहाय्याने माहिती सांगून इतिहासांतील कोरीं पानें भरून काढते. ऐतिहासिक पात्रें, प्रसंग, काल तसेंच इतिहास, कागदपत्रें वगैरेंचा सत्यापलाप होऊं नये. ऐतिहासिक सत्य व कल्पनारम्यता यांचा तोल सांभाळावा. सत्य पात्रें व प्रसंग आणि कल्पित पात्रें व प्रसंग यांचा मधुर संगम व्हावा. ऐतिहासिक व्यक्तींच्या आशा, आकांक्षा, स्वभाव, भावना, विचार इत्यादींचें योग्य चित्रण व्हावें. त्यावेळच्या समाजाचें जिवंत चित्र डोळ्यासमोर उभें राहावें; त्यावेळच्या वातावरणाची निर्मिती व्हावी. ("An historical novel is simply a novel which attempts to reconstruct the life and recapture the atmosphere of an age other than that of the writer"—John Bucham). भूतकाळांतील घटनांची निर्जीव नोंद नसावी.

आतापर्यंत ऐतिहासिक कादंबरीचीं जीं लक्षणें सांगितलीं, ज्या कसोट्या सांगितल्या त्या 'उषःकाल'ला लावल्या तर काय दिसतें? त्या सर्वच लक्षणांनी युक्त अशी ती नाही किंवा सर्वच कसोट्यांना ती उतरूं शकत नाही. शिवाय ज्यावेळीं श्री. हरिभाऊ आपटे यांनी ती लिहिली त्यावेळीं ऐतिहासिक साधनें किती उपलब्ध होतीं याचाहि विचार करून 'उषःकाल' ऐतिहासिक कादंबरी आहे कीं नाही हें ठरवावयास पाहिजे. या ऐतिहासिक साधनां-विषयी एवढें म्हणतां येईल कीं तीं फारच अपुरीं होतीं. त्यावेळीं आजच्याइतकें ऐतिहासिक संशोधन झालें नव्हतें.

'उषःकाल' मध्ये गड सुलतान काबीज करून स्वराज्याचा पाया रोवण्याचें जें मुख्य कथानक तें इतिहासावर आधारलेलें आहे कीं नाही याविषयी मतभेद दिसून येतात. कारण कांहीं लेखक-कु. वेणु-ताई पानसे, श्री. वि. सी. सरवटे-तें कथानक खऱ्या ऐतिहासिक प्रसंगावर उभे असल्याचें सांगतात तर कांही लेखक-श्री. द. सी. पंगु-त्या कथानकाला खऱ्या ऐतिहासिक प्रसंगाचा आधार नसल्याचें सांगतात.

ऐतिहासिक पात्रें—शिवाजी, तानाजी, येसाजी, रामदास स्वामी, दादोजी, जिजाबाई वगैरे— यांना एकंदर कथानकाच्या मानानें गौण स्थान मिळालें आहे. मात्र त्यांचीं स्वभावचित्रें रूढ कल्पनांना धरूनच काढलीं आहेत. शिवाजी महाराजांचा मन-



मिळाऊ स्वभाव, धाडसी वृत्ति, भवानीवरील श्रद्धा, मधुरवाणी इ.; तानाजी व येसाजी यांची जिवास जीव देण्याची वृत्ति, धाडसी वृत्ति इ.; रामदास स्वामींचा शांत, सात्त्विक आणि गंभीर असा स्वभाव; दादोजींचा शिक्षक या नात्यानें शिवाजी महाराजांना उपदेश; वगैरे.

मुख्य कथानक व रंगराव आप्पा-नानासाहेब, नानासाहेब-चंद्रावती, चंद्रावती–रणदुल्लाखान, रण-दुल्लाखान-सय्यदुल्लाखान, सय्यदुल्लाखान-रामदेवराव, रामदेवराव-रंभावती, वगैरेसारखीं उपकथानकें श्री. हरिभाऊंनी एकमेकांत इतक्या चांगल्या रीतीने गुंतविलीं आहेत कीं तीं एकजीव वाटतात. परंतु या उपकथानकांनी मुख्य कथानकाला मागे टाकल्या-मुळें 'उषःकाल' कादंबरींत अद्भुतरम्य वातावरण, प्रणयरम्य वातावरण बरेंच पसरलेलें दिसतें.

मात्र या उपकथानकांचा उपयोग श्री. हरि-भाऊंनी इतिहासांत राहिलेलीं कोरीं पानें भरून काढण्याकडे पुरेपूर करून घेतला आहे. या उप-कथानकांतील बहुतेक सर्व पात्रें त्या कालाचीं प्राति-निधिक म्हणून रंगवलेलीं आहेत. त्या काळांतील समाज-जीवनाचें हुबेहूब चित्र 'उषःकाल' मध्ये आपणांस पाहावयास सापडतें. त्या कालांतील ज्या घटना घडल्या त्या घडण्यास खरीं कारणें, अन्तस्थ कारणें कोणतीं होतीं; त्या कालांतील व्यक्तींच्या भावना, आशा, आकांक्षा कोणत्या होत्या इ. गोष्टी हरिभाऊंनी स्पष्ट करून सांगण्याचा प्रयत्न उत्तम केला आहे.

त्यावेळच्या मुसलमान अधिकाऱ्यांच्या अरेरावी-पणामुळे त्यांच्याबद्दल तरुण मराठे लोकांच्या मनांत वसत असलेला द्वेष, तिरस्कार आणि त्या मुसलमानी अमलापासून स्वतंत्र होण्याची मनाची तळमळ नानासाहेब, सावळ्या, सूर्याजी वगैरे व्यक्तींच्या चित्रणांतून आपल्या डोळ्यांसमोर उभी राहते. त्यावेळची जवळजवळ सर्व तरुण पिढी अशाच बंडखोर मनोवृत्तीची होती. वृद्धपिढी जी होती ती मात्र अगदी स्वामिभक्त, ज्याचें आपण इतके दिवस निमक खाल्लें त्याच्याशीं, प्राण गेला तरी, हरामी व्हावयाचे नाही अशा ब्रीदाची होती. याचें उत्कृष्ट प्रत्यंतर रंगराव आप्पांत पाहावयास सापडतें.

परंतु नवीन तरुण पिढीच्या व जुन्या वृद्ध पिढीच्या मतांत इतकें अंतर असल्यामुळे पिता-पुत्रांचे नेहमी खटके उडणें अशक्य नाही. याची साक्ष रंगराव आप्पा व नानासाहेब यांच्या सुलतान-गडावरील व विजापूरमधील भेटी आपणास देतात. शिवाजी महाराज, नानासाहेब, श्रीधरस्वामी वगैरे सारख्या तरुणांना पुरंदरचा गडकरी, सुभान्या, आवजी पाटील वगैरे सारख्या जनतेचा अन्तस्थ पाठिंबा मिळत होता हें कांही प्रसंगावरून दिसून येतें. मुसलमानी अमलाचा दरारा, अरेरावीपणा सर्जेखानाच्या मारुतीच्या देवळापासून तों पुरंदर किल्ल्यावर असतांनाच्या वागणुकींतून, सय्यदुल्लाखान मेहेरजानला बादशाही जनानखान्यांत टाकण्याच्या उद्देशाने तिला सुलतानगडावरून घेऊन जाण्याकरिता येतो त्या वेळेच्या त्याच्या वागणुकींतून दिसून येतो. हिंदुस्त्रियांची विटंबना त्यावेळीं कशी केली जात होती हें रंभावती व सूर्याजीची वेडी झालेली पत्नी यांच्या कथानकांतून समजतें. त्यावेळच्या बाद-शहाचा विलास, तो विलास पुरविण्यास मदत कर-णाऱ्या सय्यदुल्लाखानासारख्या पूर्वी हुजऱ्या अस-णाऱ्या सरदाराचा दरबारांतील बडेजाव, श्रीधरस्वामी-सारख्या साधुपुरुषांचा होणारा छळ इ. गोष्टी श्री. हरिभाऊंनी उत्तम रंगवून त्या काळचें चित्र आपल्या-समोर उभें करण्याचा प्रयत्न त्यांनी खूपच चांगला केला आहे असें म्हणावेसें वाटतें.

तेव्हा 'उषःकाल' मधील मुख्य कथानक कदा-चित् ऐतिहासिक नसलें, ऐतिहासिक पात्रांना प्रमुख स्थान नसलें, तरी वर दाखविल्याप्रमाणे श्री. हरि-भाऊंनी वाचकांसमोर शिवाजी महाराजांच्या वेळचें ऐतिहासिक कालाचें, तें मूर्तिमंत चित्र रेखाटलें आहे. वाचकाला 'उषःकाल' कादबरी वाचतांना ऐतिहासिक वातावरणाची जी प्रचीति येते त्यामुळे वरीलसारखा उणेपणा मान्य करूनसुद्धा 'उषः-

काल' कादंबरीला ऐतिहासिकच कादंबरी म्हणावें लागेल. श्री. हरिभाऊंनी त्यांच्या 'सूर्योदय' या ऐतिहासिक कादंबरीच्या प्रस्तावनेंत तिच्याकडे कोणत्या दृष्टीने पाहावें हें सांगतांना त्यांची ऐतिहासिक कादंबरीची कल्पना सांगितली आहे. ते म्हणतात, "हा इतिहास नसून कथा आहे; हें ऐतिहासिक सत्य नसून ऐतिहासिक सत्यकथाभास आहे."

त्या दृष्टीने 'उषःकाल' कादंबरीकडे पाहिलें असता, हरिभाऊंनी तिच्यांत निर्माण केलेला सत्यकथाभास आणि तोसुद्धा सत्याचा अपलाप बिलकूल होऊं न देतां, पाहिला म्हणजे 'उषःकाल' ही एक उत्कृष्ट ऐतिहासिक कादंबरी आहे असें वाटतें. 'उषःकाल' ही श्री. हरिभाऊंची पहिली स्वतंत्र ऐतिहासिक कादंबरी होय. वाङ्मयांतील ऐतिहासिक कादंबरीच्या प्रकारांत 'उषःकाल' कादंबरीने बरीच क्रांति घडवून आणली आणि श्री. हरिभाऊ आपटे यांना ऐतिहासिक कादंबरी लिहिणाऱ्या लेखकांत मानाचें पहिलें स्थान मिळवून दिलें आहे. श्री. हरिभाऊंनी अशा १०,१२ ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या आहेत म्हणून असें म्हटलें जातें कीं सन १८७१ मध्ये 'मोचनगड' सारखी ऐतिहासिक कादंबरी लिहिणारे श्री. रामचंद्र भिकाजी गुंजीकर हे महाराष्ट्राचे पहिले ऐतिहासिक कादंबरीकार असले तरी महाराष्ट्राचे सर्वश्रेष्ठ ऐतिहासिक कादंबरीकार व महाराष्ट्राचे सर वॉल्टर स्कॉट असण्याचा मान श्री. हरिभाऊ आपटे यांचाच आहे.

———



अग, जरा हळू कीं.



# गरजवंताला अक्कल नसते

लेखक : पद्माकर लांडगे, चतुर्थ वर्ष, कला विभाग

फिरण्यासाठी म्हणून मी बाहेर पडलों होतों. नगरपालिकेच्या कचेरीकडून जयस्तंभाकडे जाणाऱ्या रस्त्याने वळणार तोंच समोरच्या वाहनांच्या गर्दीमुळे थांबावें लागलें. संध्याकाळची वेळ होती; ऑफिसांतून, मिलमधून येणारीं माणसें, शाळा—कॉलेजांतून येणारे विद्यार्थी-विद्यार्थिनी, भाजीबाजाराला जाणारे हातगाडीवाले, या सगळ्यांची खूपच गर्दी झाली होती. पण तरीहि या गर्दींत पिवळट धोतरावर कळकट कोट घातलेल्या, आकारहीन काळ्या टोपीमुळे अधिकच बावळट दिसणाऱ्या बंडोपंतांकडे माझें लक्ष वेधलें गेलें. एरव्ही कुठलीतरी खाकी ओढीत शून्य नजरेने आणि भकास चेहऱ्याने रस्त्यांतून गबाळेपणें जाणारी व्यक्ति तरतरीतपणें, गडबडींत, विशींतल्या उत्साहाने चालू लागली तर आश्चर्य नाही का वाटणार ? विचार आला होता हटकूं कीं नाही म्हणून. पण म्हटलं गंमत करावी, अन् विचारावं कीं, "काय बंडोपंत हॉर्लिक्स घेतलंय् कीं भट ब्रेन टॉनिक ? कीं आणखी दुसरं कांही ?" म्हणून हाक दिली, "अहो बंडोपंत !"

पण या हाकेमुळे बंडोपंतांची खूपच घाबरगुंडी उडाली. त्यांनीं इकडे तिकडे कावऱ्याबावऱ्या नजरेने पाहायला सुरवात केली. तेव्हा "अहो, हा मी इकडे आहें" म्हणून त्यांना दिशा दाखवली. गर्दीतून अंतर कापीत ते माझ्याजवळ आले आणि सुस्कारा टाकून म्हणाले, "अरे, तूं आहेस का ? खूपच घाबरवलंस कीं !" आणि कपाळावरचा घाम पुसून ते म्हणाले, "काय रे, काय म्हणतोस ?"



या त्यांच्या उद्गारांनी नि आविर्भावाने मला खूपच गंमत वाटली. पण त्यांच्या मुद्रेवरील भीतिमिश्रित समाधान पाहून, पहिले दोन योजलेले प्रश्न विचारण्याऐवजी जरा आणखी गंमत करावी म्हणून जरा दरडावून विचारलं, "अहो, हें चालवलंय् काय आज तुम्ही बंडोपंत ? अन् या पिशवींतल्या भाजीखाली काय आहे बघूं ! चोराच्या मनांत चादणं, खाई त्याला खवखवे असं कांहीसं म्हणतात ना, तसे तुम्ही घाबरतां आहां. माहित आहे ना जवळ पोलिस स्टेशन आहे तें ?"

"ए माझ्या राजा, चल, चल काय म्हणतो आहेस ?" अन् त्यांनी मला जवळ जवळ ओढीतच त्यांच्या घराच्या दिशेने न्यायला सुरवात केली. गर्दी कमी झाली असं पाहून ते म्हणाले, "अरे, ही दिवाळी अशी तोंडाशीं आलेली; घरीं पहिल्यांदाच पहिले जांवई दिवाळसणाला आलेले; त्या हिराशेटकडून हे दोन शेर तांदूळ न् साखर आणली तर तुझ्या लेकाचं काय जातं ! हं; हे दिवस ! कधी संपणार ही महागाई कोण जाणे !! या हिराशेटकडे साखर पोतेच्या पोतें पडली असेल; पण मारे परोपकाराचा आव आणून, 'तुमच्याकरता हं शेट' म्हणून साखर देतोय्. तिप्पट भाव द्या आणि त्यासाठीहि नाक घासा, आणि पुन्हां उपकाराचें गाठोडें ठेवायला तयारी." आणि भिवया उंचावून, चष्म्यांतून नजर खाली करून, बंडोपंत तत्त्वज्ञाचा आव आणून म्हणाले, "हंऽ! काय करणार ? गरजवंताला अक्कल नसते हेंच खरं."

खरंच, या गरजा मनुष्याला भिकेला लावतात.

कर्त्या पुरुषाच्या मागचा " आणा " कांही सुटत नाही. पगार आल्यावर त्याला किती वाटा फुटतात याला गणतीच नाही. रेशन, दूध, घरभाडें, दिवाबत्तीचें भाडें, कपडे, चहा, हॉटेल, फी, तेल, डाळी, मोलकरीण, न्हावी, शिंपी, चांभार, सिनेमा ... यादी पुरी का पडणार आहे ? आणि अशांत दैनंदिन आवश्यकतेची वस्तु दुर्मिळ झाल्यास अन्नाच्या सव्वाच नव्हे तर तिव्वा नि चव्वा भाव देऊन खरीदणें भाग पडतें. मग ती चांगली असो नसो, कारण Beggars must not be choosers. किती किती " गरजू " माणसं दिसतात आपल्याला !! भिक्षा मागणारे पोटाची गरज भागविण्याकरताच दारोदार हिंडतात ना ? आयुष्याच्या मार्गाला लागण्यासाठी शिदोरीची व्यवस्था म्हणूनच विद्यार्थी परीक्षांना तोंड देतात ना ? वरीष्ठ अधिकाऱ्यांचीं अधिकउणीं बोलणीं खालच्या मानेनें ऐकून घ्यावीं लागतात तीं पोटाची भाकर तुटूं नये म्हणूनच ना ? शेट सावकार काय पैसा मिळविण्यासाठी धडपडतात ? हो, पण पैसा तरी कशासाठी ? तर गरजा भागवण्यासाठीच ना ? Employment Exchange मध्ये हजारो गरजू माणसं तुम्हाला अर्जरूपाने दिसतील !! गुन्हेगार कायदे मोडतात ते Necessity knows no laws, या सिद्ध झालेल्या म्हणीनुसारच ना ?

पण " गरजवंताला अक्कल नसते " या म्हणींत मला तरी उद्दामपणाचा, अहंकाराचा, दर्पाचा वास येतो. काय असेल तें असो ! आपण म्हणजे कोणी तरी बाजीरावाचे बेटे आणि आतां अगदीं अडचण म्हणून अक्कल गहाण टाकून तुमच्याकडे मदत मागायला आलों आहे अशा तऱ्हेचा सूर मला त्या वाक्यरचनेंत ऐकूं येतो. आणि म्हणूनच कोणी भिकारी भीक मागायला येतो आणि जेव्हा " तुम्ही काय मला भिक्षा देणार ? असुचा राम देतो. " असें म्हणतो तेव्हा मला त्याच्या उद्धटपणाची, निष्क्रियतेची, आळशीपणाची, ऐतखाऊपणाची चीड येते. आणि एखादा कोणी गरजवंत ( स्वतःला "कला"वंत समजणारा ) मदत मागायला येतो तेव्हा हा स्वतःकडे आडल्या नारायणा(!)ची भूमिका घेऊन गर्दभयोनींत बसवतो आहे कीं काय या शंकेने मी त्याच्याकडे पाहूं लागतों.

गर्दभयोनीवरून आठवण झाली; आमच्या नाशिक कॉलेजच्या हॉस्टेल्‌मध्ये वसंत हसबनीस नांवाचा विद्यार्थी होता. बड्या बापाचा लेक, आणि अचपळ फार. स्वतःला काय समजायचा तो ! येवढ्या श्रीमंताचा मुलगा अन् त्याच्या डोक्यांत वेड एकच कीं पुलिस सब् इन्स्पेक्टर व्हायचं. पुण्याला सुटींत गेला असतां त्याला कळलं कीं अमुक अमुक प्रोफेसरकडे logic चे पेपर्स तपासायला आहेत. स्वारी लटपटी नि बडबडी. कुठली ओळख काढली त्याने कोण जाणे. त्याचा लॉजिकचा पेपर फक्त कठीण गेला होता. त्याने अवांतर गप्पा खूप मारल्या अन् मग हळूच गोष्ट काढून म्हणाला, " हें पाहा सर, हें Inter चं वर्ष कसंहि करून पास झालों कीं बस्स ! मग मी एकदम direct भरती होऊन फौजदार होणार. हें पाहा कसंहि करा, तुमच्या हातीं आहे सर. " सरहि विरघळत चालले होते. पण गाडें एकदमच उलटलें. तो म्हणाला, " आणि हे तुमचे उपकार कधींहि विसरणार नाही सर. आडला नारायण आपल्या दाराशीं आलों आहे तर माझ्यावर कृपा करा " ... अन् काय, सगळंच फिसकटलंन् काय !!

कोण्या एका लेखकाने " दोन शब्दांत दोन संस्कृति " म्हणून लेख लिहिला आहे. " श्रुतिस्मृतिपुराणोक्त " हें भारतीयांचें मत तर " अद्यावत् " हा पाश्चात्यांचा परवलीचा शब्द हें तर खरेंच. पण आपल्या नि पाश्चात्यांच्या म्हणींतहि विरोधी सूर निघावेत ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. आपण म्हणतों. "गरजवंताला अक्कल नसते." पाश्चात्यांत म्हण आहे, " Necessity is the mother of invention, " खरंच ! आपल्या मनाची घडणच त्यांच्यापेक्षा निराळी आहे.



स्वभावविशेष भिन्न असल्याने म्हणींतदेखील विरोध असावेत यांत नवल काय ?

आणि खरं पाहिलं तर पाश्चात्यांच्याच म्हणीची आपल्याला सत्यता प्रतीत होईल. आजच्या आपल्या भोवतालच्या बहुतेक गोष्टी गरजेच्या पोटींच जन्माला आलेल्या नाहीत काय ? गरज हेंच आजच्या आर्थिक जगाचें उगमस्थान आहे हें खरें नाही का? जगांतले सगळे व्यवहार गरजेंतून उत्पन्न होतात आणि त्यांचें निराकरण हाच जगाच्या व्यवहारांचा शेवट आहे. काव्य, शास्त्र, कला, शोध, इमारती, नगरं, बाजार, खेळ, उद्योगधंदे, एवढंच काय पण सभोवतालचा समाज, राष्ट्र, धर्म व व्यवहारांतली रोजची भाषा हीं सर्व माणसांच्या गरजा भागवण्या करता निर्माण झालेलीं आहेत. थोडक्यांत म्हणजे गरज हें प्रगतीचें मूळ आहे.

खरोखरच जग हें गरजेमुळे प्रगतिपथावर जात आहे. ब्रह्मदेवाला काय गरज भासली म्हणून त्याने हें विश्व निर्माण केलें हा प्रश्न अध्यात्माचा होईल. पण ब्रह्मदेव व अध्यात्मशास्त्र हीं दोन्ही मात्र माणसाच्या मानसिक गरजेकरता निर्माण झालीं हें खास. माणसाच्या गरजा या किती असंख्य आणि विविध आहेत !! अर्थशास्त्रांत "wants" वर एक स्वतंत्र प्रकरण लिहिण्याची अर्थशास्त्रज्ञांना गरज वाटते तें उगाच नाही. अन्न, वस्त्र, आसरा, या खरोखर अगदीं सामान्य आणि प्राथमिक गरजा आहेत. माणूस आणि इतर प्राणी यांच्यांत साम्य क्षुधा, तृषा, निवास या बाबतींत आहे. पण माणसाने कल्पना, बुद्धि, विचार यांच्या साहाय्याने स्वतःची प्रगति करून घेतली. तो या पृथ्वीचा राजा झाला. पोटाची गरज ही तर न विझती आग आहे. पोट पाठीशीं लागलें आहे म्हणूनच जगाचे व्यवहार चालूं आहेत असं म्हणायला हरकत नाही.

माणूस खरोखर मूलतः आळशी, निष्क्रियतेचा भुकेला आहे कीं काय कोण जाणे. अगदीं गरज पडली, परिस्थितीचा चिमटा बसला कीं तो उठतो नि कार्यप्रवण होतो. निबिड अंधःकार कोंदला आहे, सोसाट्याचा वारा सुटला आहे, आकाशांत मेघांची गर्जना, विद्युल्लतेचा थयथयाट सुरू आहे, मुसळधार पाऊस कोसळतो आहे अशा स्थितींत आद्य मानवाने आसरा शोधला असला पाहिजे. हिंस्र श्वापदांच्या गर्जना, विषारी जिवाणूंच्यामुळे बळी पडलेले बांधव पाहून त्याने शस्त्रें शोधलीं असतील आणि अशाच हलकेहलके समाजव्यवस्था, धर्मव्यवस्था, राज्यव्यवस्था इत्यादि उदयास आल्या असल्या पाहिजेत.

आणि हीच संस्कृति आणि सुधारणा ! माणसाच्या गरजा जितक्या अधिक नि विविध तितका तो आधिक सुसंस्कृत. गरजांची संख्या मनुष्याच्या प्रगतिपथावरील टप्पा आहे. आणि या गरजा पूर्ण झाल्या आहेत असं कधींच वाटायचं नाही ! आज कॉलेजमध्ये गेलों, फाउंटन पेन हवें, मग घड्याळ हवें, नंतर सायकल हवी, आणखी...... !! आज अमुक इतका नफा आला, इतकें भांडवल घातलें होतें; आतां अमुक जिनसा एकदम खरीदूं, मग त्याचा " ऐसा " नफा येईल अन् ... अन्...!! हीं सगळीं मनोराज्यें गरजेंतून निर्माण होतात. आणि आज राहणीचा खर्च वाढल्याने जीवनमान खाली गेलें असतां ' आपल्या गरजा कमी करा ' हा उपदेश ठीक वाटत असला तरी तें एक पाऊल पीछेहाट झाल्याचें निदर्शक आहे.

आणि गरजाहि कांही वेळां किती परस्परविरोधी असतात ! माणसाच्या परिस्थितीप्रमाणे त्याच्या स्वभावविशेषांत, गरजेंत फरक पडतो. त्याला एकवेळ समाजाचा तिटकारा येतो तर दुसऱ्यावेळीं समाजांत मिसळून स्वतःचें व्यक्तित्व विसरून जाण्यासाठी तो आतुर असतो. समाजांतील अन्याय, चुका, विकार, श्रम, दुःख यांनी तो तापून गेल्यामुळे त्याला प्रेम, दया, सहानुभूति, थट्टा, हास्यविनोदांत रमून जावेसें वाटतें. जखडबंद परिस्थितीचा विसर पडावा व उन्मादाच्या कैफांत, नशेंत वावरावें असें वाटतें. विस्मृतीवरच जग आधारलें आहे असें त्याला वाटूं लागतें. या रूक्ष जगापासून दूर जावें, फळाफुलांच्या वेलींना वळसे घालावे,

पक्ष्यांच्या मंजुरवांत, कूजनांत, गुंजारवांत दंग व्हावें, काव्याचा आस्वाद घ्यावा असें त्याला वाटतें. सर्वत्र तेजोमय, चैतन्यमय, सात्त्विक आनंदांत गुंगून जावें असें वाटतें. पण मनुष्य हा समाजप्रिय प्राणि असल्याने एखाद्या शहरी खेडेगांवाचीं रम्य वर्णनें बघून तिथल्या सृष्टिसौंदर्याचा आस्वाद घ्यायला गेला तर तिथल्या भयाण, भेसूर शांततेने त्याला वेड लागायची वेळ यायची. पुन्हा त्याला गडबडींत रमून जाण्याची गरज भासते.

आणि म्हणूनच गरज ही अनेक शोधांची जननी आहे हें म्हणणें पटतें. सुखासमाधानासाठी म्हणून शास्त्रें, कला, काव्य, वाहनें, वाङ्मय, इत्यादि निर्मिणारी ही गरज माणसाला 'बेअक्कल' कशी बनवील ! आयुष्य जर जगावेंसें वाटत असेल तर तें गरजेमुळे ! इच्छा, आशा, आकांक्षा, क्षुधा, तृषा, स्वप्नरंजन, ध्येय इ. सर्व शब्दांत वेगवेगळ्या अर्थांच्या छटा असल्या तरी त्या सर्वांच्या सीमारेषा " गरजा " या शब्दापासूनच निघतात. आणि मग ही माणसाला कार्यप्रवृत्त करणारी " गरजवंताला अक्कल नसते " अशी जी म्हण आहे तींत " गरजवंतासच अक्कल असते " असा बदल करायला काय हरकत आहे ?

म्युनिसिपालिटीच्या दिव्यावर अभ्यास



पूर्वी



आता

चित्रकार— त्रिंबक कानवडेकर,
द्वितीय वर्ष, कला.



लघुकथा

# प्रॅक्टिकलची 'की'

लेखक : श्रीराम कुलकर्णी, चतुर्थ वर्ष, विज्ञान विभाग.

आज शनिवार. अन् परवा सोमवारीं आमचीं प्रॅक्टिकल्स सुरू व्हायचीं होतीं. त्यामुळे बॅच नंबर, पार्टनर, वगैरे माहिती पाहण्याकरिता आमच्या वर्गांतले सर्व विद्यार्थी नोटीस बोर्डजवळ जमले होते. " पाहूं मागनं, त्यांत काय ?" असा विचार करून मी बाजूलाच उभा होतों. इतक्यांत मला विश्वास माझ्याकडे येतांना दिसला. सबंध वर्गांत विश्वासचं कुणाशीं पटत असेल तर माझ्याशींच फक्त. कारणहि होतं म्हणा त्याला तसं. तो थोडासा एकलकोंड्या स्वभावाचा. कुणाच्या अध्यांत नाही, मध्यांत नाही असा. माझा स्वभावहि थोडाफार नसला तरी फार थोड्या प्रमाणांत तसाच. त्यामुळे आमचें स्वाभाविकच सूत जमलें होतें. आम्ही दोघेहि गप्पा मारूं लागलों. सहसा विश्वास इतर विद्यार्थ्यांना टाळण्याचाच प्रयत्न करी त्यामुळे आतां त्याच्याकडे सहसा कोणी येतहि नसे. पण आज मात्र प्रत्येकजण त्याच्याकडे पाहून मिस्किल हास्य करीत होता. त्याचें तिकडे लक्ष होतें कीं नाही कोण जाणे, पण माझ्या मात्र ती गोष्ट तेव्हाच लक्षांत आली. मी चाटच पडलों अगदी. मी त्याचें बारकाईने निरीक्षण करण्यांत गुंतलों पण त्याच्यांत एवढासासुद्धा दोष आज दिसत नव्हता. टोपीच्या बाहेर शेंडी आली नव्हती कीं वरची गुंडी खालती लागली नव्हती. मग हे बेटे हसतात कां ? अन् थोड्याच वेळांत त्यांच्या हसण्याचें कारण मला उमगलें.

आतापर्यंत सर्वजण निघून गेले होते. फक्त आम्ही दोघं अन् लॅबोरेटरींतले गडी ह्यांशिवाय तिथे कुणीच दिसत नव्हतें. आम्ही बॅच अन् पार्टनर पाहूं लागलों अन् एकदम मला मुलांच्या हसण्याचें कारण उमगलें; अन् तें म्हणजे विश्वासचा पार्टनर. पार्टनरच्या बाबतींत विश्वासला मुलांच्या दृष्टीने दैवाने हात दिला होता यांत शंकाच नाही. पण विश्वासच्या दृष्टीने मात्र ही एक नसती 'आफत' होती. पार्टनरच्या यादींत त्याच्या नांवापुढे मिस् सुषमा कुळकर्णी हिचं नांव पाहिल्यावर मग मलासुद्धा हसूं आवरेना. पण विश्वासच्या चेहऱ्याकडे पाहिल्यावर मात्र माझं हसूं ओठावरच जिरून गेलं. तो डोळे फाडफाडून नोटीस बोर्डाकडे पाहात होता. जणूं कांही मुलीचें नांव पार्टनरच्या यादींत घालणें हा त्याचाच गुन्हा होता. विश्वासचें स्त्रियांच्या बाबतींत थेट ' बोकिलांच्या वसंत ' प्रमाणे मत होतें. तो कार्तिकस्वामीप्रमाणे त्यांचें तोंडसुद्धा पाहायला तयार नसे. त्याचप्रमाणे उगाच आचरटपणाने त्याने ब्रह्मचर्याची प्रतिज्ञासुद्धा केली नव्हती. पण काय असेल तें असो, तो या जातीशीं शक्यतों फटकूनच वागे. वास्तविक कॉलेजमधे आल्यानंतर प्रॅक्टिकलमधे मुलगी पार्टनर म्हणून येणें ही गोष्ट आतां नवीन राहिली नव्हती, येवढेंच नव्हे तर कांही विद्यार्थी त्याकरताच प्रयत्न करीत असत हेंसुद्धा मला माहीत होतें; पण विश्वासच्या बाबतींत ! छे ! छे !! प्रयत्न तर राहूंच द्या, पण साधा विचार त्याच्या स्वप्नांतसुद्धा येणें शक्य नव्हतें. छे ! अगदीच अशक्य गोष्ट होती ती. एक वेळ संस्कृतचे प्रोफेसर तयारीशिवाय अन् नोट्स वर्गांत पाहिल्याशिवाय फिजिक्स शिकवणें शक्य होतं पण ही गोष्ट ! छे ! अशक्य !

" ए, चल आपण प्रोफेसरकडे जाऊं " तो म्हणाला; अन् मी अचानक विचारांतून जागा झालों.

" अं—कायरे ?

" कांही नाही. प्रोफेसरांना भेटलंच पाहिजे. "

" वा महाराज, खाली काय लिहिलंय वाचा की– " Partners will not be changed."

" छे ! छे ! तें कांही असूं दे. तें फक्त लिहिण्यापुरतंच आहे. " तो म्हणाला.

" चल बुवा ! " मीं अगदी नाराज होऊन म्हटलें. कारण शक्यतों मी प्रोफेसरांना टाळण्याच्याच प्रयत्नांत असतों.

" पण कां रे ! " मीं विचारलें, " काय हरकत आहे लेडी–पार्टनर असायला ? "

" काय ? काय म्हणतोस तूं ? " एकदम ओरडलाच तो माझ्यावर. अन् मला कळलं कीं आपली उडी चुकली. इतक्यांत आम्ही प्रोफेसरांच्या खोलीशीं आलों.

" May, I come in sir " — विश्वास.

" Yes. "

" हं काय म्हणणं आहे तुमचं विश्वास ? "

" कांही नाही सर. फक्त पार्टनर चेंज करून पाहिजे. "

" तुम्हीं नोटीस नाही वाचली वाटतं. "

" होय सर, पण— "

" तें कांही नाही. मग नोटीस काय माझ्याकरता लावली आहे ? साधी नोटीस अजून कळत नाही ? जा, पुन्हा अशा लहान मुलासारख्या तक्रारी घेऊन माझ्याकडे येऊं नका. " प्रोफेसर म्हणाले.

शेवटीं निराश होऊन आम्ही परत फिरलों. एका फार मोठ्या संकटांत सापडल्यासारखी विश्वासची मुद्रा झाली होती.

" आता कसं रे करायचं ? "

" आता काय ? ' आलिया भोगासी असावें सादर. ' "

" ए तो वेदान्त राहूं दे तुझ्यापाशी. मी अगदी seriouly विचारतोंय. "

" कांही नाही. मुकाट्याने परवा येऊन प्रॅक्टिकलला सुरवात करायची. "

" अन् ती, ..ती रेझिस्टन्स बॉक्स–आहे ती ? "

" अं, कोण म्हणालास— "

" अरे ही पोरगी रे. नसती आफत आहे. प्रॅक्टिकलमध्ये Resistance Box असते ना. तशीच आहे ही. "

त्याची ती उपमा ऐकून तर मी हंसायलाच लागलों.

" बघूं रे बुवा, काय काळजी करतोस ! मी आहें ना तुझ्या पाठीशी. परवा पाहूं तर खरं काय होतंयू तें. "

" पाहा हं ! मी तुझ्या भरवंशावर आहें अगदी " असं म्हणून, तो त्याच्या वाटेने चालायला लागला. मी माझ्या वाटेने जात होतों तरी विचार मात्र त्याच्याचसंबंधी होते. तसं पाहिलं तर विश्वास अगदीच सोवळा प्राणी होता. ती नेहमीची हाफ् पॅंट, आखूड बाह्यांचा थोडासा आखूड शर्ट, वरती ती टोपी. क्वचित् एकादे वेळीं तिच्याबाहेर भुरभुरणारी शेंडी. थोडक्यांत म्हणजे अगदीच ' मोरू ' होता तो. पण अभ्यासाच्या बाबतींत मात्र स्वारी अतिशय तल्लख. वर्गाच्या किंचित् पुढेंच असे. त्याची एकंदर अभ्यासाची पद्धत मात्र आकर्षक होती. कांही असो. त्याला पार्टनर देण्यांत प्रोफेसरांनी खरोखरच डोकं चालवलं होतं. मला मात्र वाटायचं—कसं व्हायचं हें ?—

प्रॅक्टिकलचा पहिला दिवस. आम्ही दोघेहि हॉलमध्ये बरोबरच शिरलों अन् आपापल्या जागांकडे गेलों. तरी पण माझी मात्र त्याच्याकडे सारखी नजर होती. त्यामुळे झालं काय कीं माझ्या पार्टनरचा माझ्याविषयी गैरसमज झाला. त्यान मला एक दोनदा डिवचलंसुद्धा. पण मी मात्र विश्वासची गंमत पाहण्यांत दंग होतों.

त्यान गेल्याबरोबर भराभर कनेक्शनूस करायला सुरवात केली. आणि इकडे तिकडे न पाहतां भराभर प्रयोगाला सुरुवात केली इतक्यांत—

" अहो म्हटलं मलाहि करायचाय हा प्रयोग " एक मंजुळ आवाज.

" अं...अं... काय म्हटलंत ... " किती दम लागला त्याला तेवढंच बोलतांना ! रुमाल कोणत्या खिशांत आहे हें माहीत असूनहि त्यान सर्व खिशे धुंडाळले...हें सर्व करतांना त्यान नजर मात्र समोर प्रयोगांच्या उपकरणांकडेच ठेवली होती.



" नाही म्हटलं तुमच्याच बरोबर करायचायू– "

" असं होय् ... मला वाटलं— "

" काय ? — " " कांही नाही. "

त्यानंतर त्यान पुन्हा प्रयोगाला सुरुवात केली. पण त्याची ती ' सीदन्ति मम गात्राणि, मुखंच परिशुष्यति ' अशी जी स्थिति झाली ती लपणं शक्यच नव्हतं. त्याचा चेहरा घामाने इतका फुलून निघाला होता कीं सारखा पुसूनसुद्धा तो पुसला जात नव्हता. जीं कनेक्शनूस तो पांच मिनिटांत करीत असे तीं त्याला अर्धा तास झाला तरी जमलीं नव्हतीं. जणुं काय त्याला वाघिणीपुढेच आणून उभें केलें आहे अशी त्याची स्थिति झाली होती.

" अहो घाबरतां काय असें एवढें ? मी काय कुणी वाघीण आहे कीं काय— ? "

" नाही तसं कांही नाही– " मांजरीच्या डोळ्याची एकदम त्याला आठवण झाली.

" तें कांही नाही, नीट करा पाहूं हीं कनेक्शनस्. तुम्ही एवढे स्कॉलर म्हणून मुद्दाम प्रोफेसरांना सांगून मीं तुम्हांला पार्टनर घेतलें, अन्— "

" काय ! तुम्हीं !! " एकदम ओरडलाच तो. सगळीं मुलं त्याच्याकडे पाहात होतीं. आतां मात्र कांही इलाज नाही अशा अर्थाची मुद्रा करून तो मुकाट्याने प्रयोग करूं लागला. त्यान हळूच डोळे तिरपे करून पाहिलं तों त्याला काय दिसलं—

—दोन हसरे डोळे—

हाच प्रकार कमीजास्त प्रमाणांत १-२ महिने चालला. मात्र हळूहळू त्याच्यांत निश्चित फरक पडत चालला होता. पण तो कुणाच्याच लवकर लक्षांत आला नाही. एक दिवस मात्र आम्ही आश्चर्यान गारठून गेलों अगदी.

हाफ्–पॅंट शिवाय कधीहि दुसरी पॅंट न घालणारा विश्वास चक्क Narrow cut ची फुल-पॅंट घालून आला होता. एवढंच नव्हे तर आपले कुरळे केस उलटे वळवून. छे ! विश्वासच बसेना डोळ्यांवर. इतके दिवस त्याचे केस कुरळे आहेत हेंसुद्धा आम्हांला माहीत नव्हतं. छे ! हा बदल असामान्य होता.

एक दिवस मीं त्याला एकीकडे गाठून विचारलें,

" काय रे विश्वास, तुझा तूं तरी तुला ओळखतोस काय रे ! "

" खरंच रे, फारच फरक झालायू माझ्यांत. पण तो कशामुळे माहीत आहे ? "

" कशामुळे ? " मला माहीत असूनहि मीं अज्ञान दाखवलं.

" प्रॅक्टिकलच्या ' की ' मुळे— "

" अं कशामुळे ? "—

" अरे, जी Resistance Box होती म्हणून मी म्हणत होतों तीच खरी या बदलण्याची ' की ' गुरुकिल्ली—समजलं ?— " अन् तो हसत हसत प्रॅक्टिकलला निघून गेला.

———

**आजचे कॉलेज विद्यार्थी —** मुलें–मुली वाईट आहेत असा नव्हे. शिस्त जरा कमी. पण याचा अर्थ ज्यांचा कायमचा स्वभाव वाईट ते वाईट. हल्लींचा क्वचित् प्रसंगीं दिसून येणारा उच्छृंखलपणा कायम स्वरूपातला नव्हे. क्षणिक वृत्ति आहे ती. सभेंत गोंधळ करणारे अगदी थोडे. कांहीजण ' गोंधळ करूं नका ' असें ओरडून अजाणतां गोंधळांत भर घालतात.

— बा. म. जोशी

# तुझ्या नयनिं मीं मज पाहियलें

तुझ्या नयनिं मीं मज पाहियलें
तुझ्या चरणिं मम नेत्र गुंतले. ॥ ध्रु० ॥

हरिणीसम चंचल मम नयनीं
कसा राहशिल स्थिर तूं म्हणुनी
नयनांच्या पापण्या मिटोनी
हृदयीं तुज नेउनी ठेविलें. ॥ १ ॥

डोळे मिटुनी मजला दिसतें,
तुझी नजर ही तुला धुंडिते,
मम हृदयावरि खिळुनि राहते,
तिथे तुला तव दर्शन झालें. ॥ २ ॥

शिरतांना तूं हृदय-सागरीं,
उंच उसळल्या जीवन-लहरी.
स्पंदन त्यांचें उरोजांवरी
दाखवि अंतरिं काय चाललें ॥ ३ ॥

माझ्या हृदयीं तुझें रूप स्थिर.
मम हृदया तव हृदय मिळे जर
जाइल विलया कंपन सत्वर
प्रीतीचें अद्वैत हें खरें ! ॥ ४ ॥

—ग. ह. तारळेकर



# आध्यात्मिक जीवनाभावीं वैज्ञानिक जीवनाचें वैफल्य

लेखक : विद्याधर भोरटके, साहित्य-प्राज्ञ, सी. बी. एस्सी.

आदि मानव रानटी अवस्थेंत होता, परंतु त्याच्या वंशजांनी पुढे आपल्या बुद्धिबलावर सतत नवे नवे शोध लावीत ते सुधारणेच्या मार्गास लागून त्यांनी आज विसावें शतक गाठिलें आहे. सुखलालसेने त्यांच्या बुद्धीस चालना दिली व ह्या विकासित बुद्धीने त्यांच्या रानटी जीवनांत स्थित्यंतर घडवून आणून तें सुखी, समृद्ध व प्रगत करण्याकरिता आजवर पराकाष्ठा केली. परंतु करोडों वर्षांपासून त्यांच्यांत व सुखांत असलेलें एक बोटाचें अंतर ती सुखलालसा यत्किंचितहि कमी करूं शकली नाही. सुखाचा शोध लावण्याकरिता ग्याच्यामागे बुद्धिवेगाने धाव घेणाऱ्या आशावादी मानवाला सुखसाधनांचे नवेनवे शोध लावून आपल्या गरजांचें क्षेत्र अफाट करावें लागलें. तरीहि तो खरोखर सुखी न होतां गरजेच्या ह्या अफाट क्षेत्रांतून उलट दुःखाच्या डोंगराची निर्मिति होऊन त्याची उंची वाढूं लागली. मनाच्या वेगाने आत्म्याचा शोध घेणाऱ्या विवेकवादी मानवाला मात्र जीवनाचा वास्तविक बोध होऊं लागला कीं, त्यांत 'सुख पहातां जवापाडे व दुःख मात्र पर्वताएवढें' ! आदि मानवाच्या काळचें खसखशीएवढें सुख विसाव्या शतकापर्यंत जवाएवढें तेवढें वाढलें. आधुनिक वैज्ञानिकांच्या शोधांनी तें निदान हरबऱ्याएवढें होण्यापूर्वींच त्यांच्या पोटीं संहारक अस्त्रांची उत्पत्ति होऊन मानवाच्या नाशाचा समय नजीक येऊन ठेपला आहे. आज मानवी जीवनांत शांति व जगांत शांतता अशक्यप्राय झाल्या आहेत.

सुधारलेल्या जगाची शोचनीय अवस्था पाहूनच जगांतील सर्व श्रेष्ठ पुरुष म्हणून मान पावलेले असे विज्ञानाचे पुरस्कर्ते भारताचे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरु त्यांनी त्यांना कायद्यांतील डॉक्टरेटची पदवी देण्यासाठी खास भरविलेल्या अधिवेशनांत कोलंबिया विद्यापीठाचे कुलगुरु जनरल आयसेन होव्हर यांनी दिलेल्या पदवीचा स्वीकार करतांना केलेल्या भाषणांत " आदि मानव व विसाव्या शतकांतील मानव ह्यांच्यामध्ये फक्त बुद्धीने शोधून काढलेल्या विध्वंसक अस्त्रांचाच फक्त फरक आहे काय ?" असा जीवनस्पर्शी विचारप्रवर्तक प्रश्न करून जगाला अंतर्मुख केलें आहे व मानवाला ती अजूनहि रानटी स्थितींतच असल्याची अप्रत्यक्षपणें जाणीव करून दिली आहे.

सन १९४९ ऑक्टोबर मधील संयुक्त राष्ट्रदिनानिमित्त भारतीय नभोवाणी केंद्रावरून केलेल्या भाषणांत स्वतंत्र हिंदचे पहिले व शेवटचे असे एकमेव गव्हर्नर जनरल व जगांतील एक थोर मुत्सद्दी राजगोपालाचारी ह्यांनी असाच एक हृदयविदारक प्रश्न आर्तस्वरांत करून जगाला सावधान केलें आहे. ते म्हणतात, " ॲटम अस्त्राबाबतची चढाओढ अपरिहार्य आहे, असें भविष्य अलीकडे वर्तविलें जात आहे. पण जगाला यापेक्षा वाईट बातमी दुसरी मिळूंच शकत नाही. भूतकाळांत ज्याप्रमाणे शस्त्रास्त्रांच्या चढाओढीने युद्ध टळूं शकलें नाही त्याचप्रमाणे सध्याची

अणुविषयक चढाओढ युद्ध नजीक आणील. शांतता नव्हे, मानवी प्रगतीच्या इतिहासाचें शेवटचें प्रकरण म्हणजे मूर्खपणा व विनाश यांचेंच प्रकरण व्हावें ही गोष्ट आपण टाळूं शकतच नाही का ?"

खरोखरच आम्ही आमच्या वैज्ञानिक जीवनास आध्यात्मिक जीवनाची जोड दिल्याशिवाय हें मूर्खपणा व विनाशाचें प्रकरण आम्ही टाळूं शकत नाही, हें कटु सत्य आहे. सत्तेच्या स्पर्धा क्षेत्रांत मानवी मूल्यांना फारसें महत्त्व राहात नाही असा आतापर्यंत अनुभव आहे. "माणसें ज्ञानी झालीं आहेत. पण शहाणीं बनलीं नाहीत" हें सुप्रसिद्ध तत्त्ववेत्ता प्लेटो ह्याचें निदान आधुनिक वैज्ञानिक जगाने अजून खोटें पाडलेलें नाही.

मनुष्याच्या ठिकाणीं ही जी ज्ञान व शहाणपणाची भरती-ओहटी होऊन ती कायमची टिकलेली दिसून येते ह्याचें कारण मुळांतच त्याच्या आध्यात्मिक व वैज्ञानिक जीवनांत झालेली फारकत हें होय. ह्या फारकतीमुळे त्याचा एकांगी बुद्धिविकास तेवढा घडून येऊन आवश्यक तो मानासिक विकास मात्र होऊं शकला नाही. बुद्धिविकासाने त्याच्या बाह्य जीवनांत जशी प्रगति झालेली दिसते तशी मानासिक विकासाभावीं त्याच्या अंतर्जीवनांत सुधारणा झालेली नाही. सुखाच्या शोधांत व सत्तेच्या हव्यासांत त्याचा जसा बुद्धिविकास घडला, तसा त्याचा स्वतःच्या शोधांत व स्वतःवर ताबा चालविण्याच्या त्याच्या अभ्यासांत मानसिक विकास त्याला करून घेतां आला असता. स्वतःचा शोध त्याला अंतर्मुख होऊन अंतर्दृष्टीने करतां येईल तसेंच स्वतःवर ताबा त्याला संयमाने-विवेकाने ठेवितां येईल. त्याचा स्वतःवर ताबा ठेवण्याचा मार्ग अहिंसामय असतो. पण परक्यावर सत्ता चालविण्यास त्यास हिंसा मार्गच पत्करावा लागतो. स्वतःच्या शोधांत त्याला सत्याचा शोध लागतो, पण सुखाच्या शोधांत सुखाचें सत्य स्वरूप जें दुःख व विनाश ह्याचाच त्याला शोध लागतो. त्याला स्वतःच्या म्हणजेच आत्म्याच्या-आत्म्याच्या म्हणजेच सत्याच्या अनुभवांत शांति लाभते, पण सुखोपभोगांत अतृप्ति वाढून अशांतता त्याच्या पाठीस लागते. सत्य, अहिंसा व शांतीचा हा मार्ग आत्मसामर्थ्यावर त्याला आक्रमितां येतो, पण सुख व सत्तेचा मार्ग त्याला विज्ञान-बलावर काढावा लागतो. सत्य, अहिंसा व शाश्वत शांतिपूर्ण आध्यात्मिक जीवन हेंच श्रेष्ठ व शाश्वत जीवन होय. जड, अस्थिर, हिंसा व अशांततायुक्त वैज्ञानिक जीवन हें क्षुद्र व विनाशी जीवन होय. आध्यात्मिक जीवनाभावीं हें वैज्ञानिक जीवन विफल होय.

मनुष्याच्या अंतर्जीवनांतील आत्म्याच्या सत्याच्या भूमींत मूळ धरून वाढलेल्या शाश्वत सुखाच्या वृक्षाच्या डहाळ्या तोडून त्या त्याच्या बाह्य जीवनांत जगवून त्याचे सुखवृक्ष बनविण्याच्या खटाटोपांत विज्ञान व्यर्थ शक्ति खर्ची घालीत आहे. त्याला शांतीचीं फुलेंफळें कधीतरी येणें शक्य आहे काय ? त्यापेक्षा अंतर्जीवनांतील ह्या मुळच्या सुखवृक्षावर बुद्धीने विज्ञाननिर्मित सुखाचें कलमच केलें तर ? ह्या शहाणपणाने मनुष्य ज्ञानी तसाच शहाणा होऊन प्लेटोने निर्दिष्ट केलेली आपल्या ठिकाणची उणीव ती भरून काढील व तेणेंकरून वैज्ञानिक जीवन आध्यात्मिक जीवनाच्या साहाय्याने सफल होईल.

एका महायुद्धाच्या तांडव नृत्यामधून जी जनता नुकतीच कोठे सावरूं लागली होती तोंच त्या जनतेच्या नशिबावर अणुशक्तीची टांगलेली तलवार आदळते. कोणीं ? दोन बलाढ्यांनी. कशासाठी ? आपल्या सुख व सत्तेच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेच्या तृप्तीसाठी. परिणाम कोणता ? निर्मनुष्यभूमि. केवळ भूमि बेचिराग होणार नसून ती निर्मनुष्य होणार आहे. जी भूमि ह्या अणुस्फोटाला आपल्या पोटांत जागा देईल ती कालिया डोहाप्रमाणे माणसांना राहावयास योग्य राहणार नाही. आजच्या बिकिनी बेटाप्रमाणे उद्या जमिनीवरचें पाणी, अन्न, वस्त्र सर्व कांही विषमय होणार ह्या भीतीने जनता हवालदिल झाली आहे. वैज्ञानिक जीवनाची ही परिणति काय दर्शविते ? हेंच कीं त्यास आध्यात्मिक जीवनाची



जोड जितकी लवकर मिळेल तितकी हवी आहे असा समय आता प्राप्त झाला आहे.

प्रो. पी. एम्. एस्. ह्यांना नोबेल पारितोषिक मिळालें असून त्यांचा …लिटिकल अॅन्ड मिलिटरी कॉन्सिक्वेन्सिस् ऑफ अॅटमिक एनर्जी ( अणुशक्तीचे राजकीय व लष्करी परिणाम ) हा ग्रंथ जगन्मान्य झालेला आहे. अशा ह्या विचारवन्ताने अॅटम बॉंबचें युग संपलें असा इषारा दिला आहे. त्यांच्या मताने अणुबॉंबचा खरा उपयोग शत्रुपक्षाला दरारा उत्पन्न करण्यांतच होऊं शकेल. पण युद्धाच्या ज्वाला भडकल्यानंतर अणुबॉंबच्या वर्षावाने लाखों माणसें प्राणांस मुकलीं व प्रदेश उध्वस्त झाले तरी राष्ट्रें त्याची पर्वा करणार नाहीत किंवा त्यामुळे युद्धाचा निकालहि लागणार नाही. इत्यर्थ इतकाच कीं, त्या शस्त्राचें संहारक सामर्थ्य अचाट असलें तरी त्यामुळे फार तर दरारा निर्माण होईल. युद्ध होऊं नये यासाठी त्या शस्त्रांपासून निर्माण होणाऱ्या दराऱ्याचा उपयोग करून घेतां येईल. युद्ध सुरू झाल्यानंतर त्या दराऱ्याचा कांही उपयोग नाही.

पण ह्या दराऱ्याबरोबरच विज्ञानाने आणखी एखादें तडकाफडकी युद्धनिर्णयाचेंहि त्याहून भयंकर संहारक महान् अस्त्र मानवाच्या हातीं दिलें तर ?

तर मग भीति आणि नाश ह्यांच्या पकडींतच मानवी जीवनाच्या प्रगतीची मर्यादा निश्चित झाली असेंच समजावयाचें.

भीति आणि विनाश हें रानटीपणाचें द्योतक आहे. मानवाच्या रानटी अवस्थेंत ह्या भीति आणि विनाशाच्या चाकोरींतूनच त्याच्या जीवनाची गाडी चालूं होती त्या चाकोरींतून ही गाडी बाहेर पडलेली आहे हें वरील वस्तुस्थितीवरून म्हणतां यावयाचें नाही. उलट ती चाकोरी पूर्वीपेक्षाहि आज अधिकच धोक्याची झालेली दिसून येते.

तथापि आता मानवाला शांति व जगाला शांततेची तृष्णा मात्र खूप लागलेली आहे. ही शांति व शांतता केवळ प्रेमामुळेच प्राप्त होणें शक्य आहे. प्रेम हें खऱ्या सुधारणेचें चिन्ह आहे. आध्यात्मिक जीवनांतच ह्या प्रेमाचें दर्शन व लाभ होऊं शकतो. आणि त्याच्या वाढीमुळे मनुष्याला आत्म्याचा-सत्याचा-अनुभव घेतां येतो. ह्या प्रेमाने भीति व विनाश टाळतां येतात आणि मानवतेची जाणीव उत्पन्न होऊन जीवन सुखी व समृद्ध करतां येतें. म्हणूनच आध्यात्मिक जीवनाभावीं वैज्ञानिक जीवनाचें वैफल्य सिद्ध होतें.

सद्भावना व सत्प्रवृत्तींनी मनाचा विकास घडून येतो, व मनाच्या विकासानुरूप अंतर्जीवनाचा विकास होत असतो. विकसित अंतर्जीवनांतच प्रेमाचा ठाव लागूं शकतो. ह्या प्रेमाचें मूर्तरूप म्हणजेच अहिंसा. अहिंसापूर्वक सत्याचे प्रयोग करून शांति प्राप्त करून घेण्याचें क्षेत्र अंतर्जीवन होय. म्हणूनच हें कार्य अध्यात्माचें आहे, विज्ञानाचें नव्हे. विज्ञाननिर्मित भीति, हिंसा व विनाश टाळून विज्ञान मानवी जीवनास उपकारक करावयाचें असल्यास त्यास अध्यात्माचा आश्रय केलाच पाहिजे. आध्यात्मिक जीवनाभावीं वैज्ञानिक जीवनाचें वैफल्य विज्ञानानेच पुरेशा पुराव्यानिशीं सिद्ध केलें आहे.

संयुक्त राष्ट्राच्या विज्ञान परिषदेंतील 'मानवी जीवन समृद्ध करण्यासाठी उपलब्ध साधनसामग्रीचा उपयोग करण्यांत यावा' ह्या विषयावरील आपल्या भाषणांत श्रीमती विजयालक्ष्मी पंडित म्हणाल्या, "विज्ञान ही आता सगळ्यांचीच कामगिरी होऊन बसली आहे. परंतु आपण हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, विज्ञान व राजकारण यांचें नातें जोंपर्यंत नीट जोडलें जात नाही तोंपर्यंत कुणाचेंहि जीवन शास्त्रीय ज्ञानाने समृद्ध होण्याचा संभव नाही."

आम्हीहि म्हणतों विज्ञान व राजकारणाप्रमाणेंच विज्ञान व अध्यात्माचेंहि नातें जोंपर्यंत नीट जोडलें जाणार नाही तोंपर्यंत कुणाचेंहि जीवन समृद्धच काय पण सुखी व शांत होण्याचीहि आशा नाही.

विज्ञानाने शांति व सुखाच्या पाण्याखालील मानवी जीवनाच्या घड्याचा एकांगी प्रगतीने एका बाजूस झोक घालवून तो उलटा केला आहे. त्यामुळे

त्यांत सुख-शांतीचा थेंबहि अनंतकाल लोटला तरी
शिरणें शक्य नाही.

विज्ञानाचें हें मानवी जीवनाच्या उलट्या घड्या-
वर सुखशांतीचें पाणी ओतण्याचें निष्फळ कार्य
अध्यात्मच थांबवूं शकेल. अध्यात्म मानवी जीव-
नाचा उलटा झालेला घडा सुलटा करून त्याला
सत्याच्या बैठकीवर अचल करील व त्यांत सुखशांति
देणाऱ्या प्रेमाचा प्रवाह अखंड चालू ठेवील, तेणें-
करून मानवी जीवनाचा घडा सुखशांतीने भरून तो
ओसंडून अनंतकाळ तसाच वाहात राहील. विज्ञानाने
आपण निर्माण केलेल्या सुखशांतीची ओंजळ
त्यांतच मधून मधून टाकून स्वतःला धन्य करावें.

पाणथळ कुरणांतील बैलाची बरोबरी करूं
पाहणारी बेडकी अखेर कुवतीबाहेर फुगल्यामुळे
पोट फुटून प्राणाला मुकली. विज्ञानाची बेडकीहि
मानवाला सुख व शांति देणाऱ्या अध्यात्माची बरोबरी
करण्याच्या प्रयत्नांत कुवतीबाहेर फुगण्याच्या बेतांत
आली आहे. तिचा विनाश अटळ आहे. पण तो
टाळावयाचा असल्यास अध्यात्माची बरोबरी
करण्याचा वेडेपणा सोडून देऊन तिने त्याचें ऋणी
होणेंच कल्याणप्रद होईल.

ह्या सद्बुद्धीमुळे विज्ञान विघातक करामती-
पासून पराङ्मुख होऊन विधायक कार्याकडे वळेल.
वैज्ञानिकांची संशोधक बुद्धि विघातक मार्ग सोडून
विधायक मार्गास लागेल. ह्या विधायक मार्गावरून
आजहि त्याच्या संशोधक बुद्धीस संहारक अणुशक्तींत
प्रचंड विधायक शक्ति असल्याचा प्रत्यय येत आहे.

अणुशक्तींत किती प्रचंड सामर्थ्य सामावलेलें
आहे ह्याविषयी बरीच माहिती उपलब्ध झालेली
आहे. युरेनियम् किंवा थोरियम् यावर रासायनिक
क्रिया करून त्यापासून अणुबॉम्ब बनवितात. अणु-
बॉम्बमधील एक पौंड युरेनियम् किंवा प्लेटोनियम्
घेतलें तर त्याचा आकार एका क्युबिक इंचाएवढा
किंवा एका मोठ्या बदामाएवढा असतो. पण त्याची
शक्ति किती अद्भुत आहे ! पारिभाषिक शब्दांत
सांगावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल कीं, एक
पौंड अणुस्फोटक द्रव्य १०० लक्ष किलोवॅट–तास
शक्ति निर्माण करूं शकतें. विजेवर किंवा कोळशावर
चालणाऱ्या प्रचंड एक हजार अश्वशक्तीचें यंत्र जर
१००० तास किंवा ४२ दिवस चालू ठेवलें, तर
त्या यंत्राने जेवढा माल उत्पन्न करतां येईल तेवढा
माल केवळ एक पौंड अणुस्फोट द्रव्याच्या साहाय्याने
यंत्र चालविल्यास निर्माण होईल. म्हणजे साधारणतः
एक पौंड अणुस्फोटकाने १३० लक्ष अश्वशक्ति
तास काम मिळूं शकतें. आणखी सोप्या भाषेंत
स्पष्टीकरण करतां येईल. १५०० टन कोळसा
वापरून एका यंत्राकडून जेवढें काम करून घेतां
येईल तेवढें काम बदामाएवढ्या अणुशक्तीपासून
करतां येईल. १०० अश्वशक्तीचें यंत्र रात्रंदिवस
१५ वर्षें चालविल्यावर एवढी प्रचंड शक्ति निर्माण
होऊं शकेल. यावरून अणुशक्तीचें सामर्थ्य किती
प्रचंड आहे याची कल्पना येईल.

एका अणुबॉम्बमध्ये युरेनियम्, थोरियम्, प्लेटो-
नियम् आदि द्रव्यें किती असतात हें एक गौप्य
आहे. पण तज्ज्ञांचा असा अंदाज आहे कीं, एका
अणुबॉम्बमध्ये २०-३० पौंड युरेनियम्, प्लेटोनियम्
समाविष्ट करण्यांत येत असावें. एक पौंड युरेनियम्
स्फोटकाचें किती प्रचंड सामर्थ्य असतें हें आपण
वर पाहिलेंच आहे. त्याच्या वीस ते तीस पट सामर्थ्य
एका अॅटम बॉम्बचें असतें. याचें गणित आता
करतां येईल. २० ते ३० पौंड अणुस्फोटक द्रव्याचा
आकार एखाद्या मोठ्या द्राक्षाएवढा होईल पण
त्याने २५०० लक्ष किलोवॅट–तास विद्युत् शक्ति व
उष्णता निर्माण होते.

परराष्ट्रीय तज्ज्ञांच्या मतें अमेरिकेंत दर वर्षी
१०० ते ५०० अॅटम् बॉम्बची निर्मिति होत
असावी. एका अणुबॉम्बमध्ये ३० पौंड अणुस्फोट
द्रव्यें असतात असें मानलें तर ५०० अॅटमबॉम्ब-
मध्ये १५०० पौंड अणुस्फोटक द्रव्यें संचय करावीं
लागतील. गेल्या चार वर्षांत अमेरिकेनें २०००
बॉम्ब तयार केले असावेत. यावरून अमेरिकेनें
किती अणुसंचय केला आहे पाहा.



जगांतील सर्व राष्ट्रांची अमेरिकेप्रमाणे वैभव-
शाली प्रगति होण्याइतकें अणुशक्तीला लागणारें
युरेनियम् जगांत सांपडूं शकेल कीं काय हा खरा
महत्त्वाचा प्रश्न आहे. युरेनियमपासून अणुशक्ती-
सारखी प्रचंड शक्ति निर्माण होऊं शकते हा शोध
अगदी नवा आहे. स्वीडनच्या तेलाच्या व दक्षिण
आफ्रिकेंतील सोन्याच्या खाणींतील रेतींतून हें युरे-
नियम् पैदा होऊं शकेल. थोरियमचें अणुशक्तींत
रूपांतर करण्याचे प्रयोग सफल झाले आहेत. हिंदु-
स्थानांतील त्रावणकोर संस्थानांतील व ब्राझील-
मधील रेतींतूनहि १००० लक्ष पौंड थोरियम् मिळेल.
खेरीज नॉर्थ कॅरोलिना आणि व्हार्जिनिया या
प्रदेशांतहि थोरियम् सांपडूं शकेल. आणि समजा
अणुशक्तीचा हा झरा आटला तरी न्युक्लर शक्तीचे
शास्त्रीय प्रयोग यशस्वी होत चालले आहेत. लिथि-
यम्चें हेलियम्मध्ये रूपांतर करून व हेलियम्चें
हैड्रोजनच्या साहाय्याने मिश्रण करून न्युक्लर शक्ति
निर्माण होते, व ती एक पौंड युरेनियम्च्या
अणुशक्तीपेक्षा कितीतरी पटीने अधिक असते.
परंतु तें अद्यापि संशोधनावस्थेंत आहे.

अणुशक्तीचें आणखी एक वैशिष्ट्य असें कीं,
अणुशक्तीवर चालणारीं प्रचंड यंत्रें विद्युत् व उष्णता
निर्माण तर करूं शकतीलच पण त्यांतील अणुकिरणें
साध्या युरेनियम्चें व थोरियम्चें स्फोटक युरेनियम्-
मध्यें व प्लेटोनियम्मध्येंहि रूपांतर करतील. म्हणजे
जी अणुशक्ति खर्ची पडली तिच्यापासून पुन्हा अणु-
शक्ति निर्माण होईल व युरेनियम्चा झरा चालू राहून
अणुशक्ति संपुष्टांत येण्याची भीतिच बाळगावयास
नको.

यावरून अणुशक्ति संहारक तशीच प्रचंड उत्पा-
दक शक्तिहि आहे. तिच्या रहस्याची देणगी व त्या-
बरोबरच आध्यात्मिक विधायक दृष्टिहि जगाला
मिळाली तर जगांतील शक्ति वायुवेगानें वाढेल व
मानवजातीचें भौतिक व आध्यात्मिक जीवन सुखी,
समृद्ध व उन्नत होईल.

मानसशास्त्र हें अध्यात्मशास्त्राची बाल्यदशा होय
व तत्त्वज्ञान तारुण्य होय. मानसशास्त्रास व तत्त्व-
ज्ञानास जर विज्ञानांत स्थान असेल तर विज्ञानानें
अध्यात्मशास्त्रांतील प्रयोग व संशोधनाकडे लक्ष पुर-
वून त्याचा आपण मानवास त्याचें जीवन सुखी
व समृद्ध करण्याकरिता अर्पण केलेल्या देणग्या
त्याच्या पचनीं पाडण्याकरिता उपयोग करावा.
शांतिनिकेतन येथील व वर्धा येथील परिषदेंतील
शांतिदूत व शांततावादी आणि पुण्याच्या शास्त्रीय
परिषदेंतील शास्त्रज्ञ ह्यांनी एकत्र येऊन विचारविनि-
मय करावा व आध्यात्मिक जीवनाभावीं वैज्ञानिक
जीवनाचें वैफल्य कसें टाळतां येईल त्याचा मार्ग
काढून आध्यात्मिक व वैज्ञानिक जीवन एकरूप
करून जगाचा विनाश टाळावा व मानवास खऱ्या
सुख आणि शांतीचा शाश्वत लाभ करून द्यावा.

जगाच्या पाठीवर आजवर प. पू. महात्मा
गांधीजी हेच एक अध्यात्मशास्त्रज्ञ होऊन गेलेत.
त्यांनी मानवी जीवनांत व स्वतःच्या जीवनांत
सत्याचे प्रयोग करून सत्य, अहिंसा व शांतीच्या
मार्गांचा शोध मानवी जीवन स्वतंत्र, सुखी, समृद्ध व
शांतिपूर्ण करण्याकरिता लावला. तसेंच त्यांनी विज्ञान
व राजकारण, विज्ञान व अध्यात्म ह्यांचें नातें नीट-
पणें जोडून मानवी जीवन स्वतंत्र, सुखी, समृद्ध व
शांतिपूर्ण करण्यांत तो यशस्वीहि करून दाखविला.
त्यांच्या ह्या यशाने अध्यात्मशास्त्रास जगन्मान्यता
प्राप्त झाली. सेवा व त्यागाच्या साधनांनी त्यांनी
मानव्याची उपासना करून नैतिक मूल्यांच्या व्रत-
पालनाने ती सफल केली. भीति व शांति मानवी
जीवनांत अगर जगांत एकत्र कधीहि नांदूं शकत
नाहीत. भीति व विनाश, तसेंच प्रेम व शांति ह्याच
जोड्या सदैव एकत्र नांदतात. वैज्ञानिक सामर्थ्यावर
नव्हे तर आत्मसामर्थ्यावर म. गांधीजी निर्भय बनून
शांतीचा उपभोग त्यांनी ह्याच जन्मांत घेतला.
एवढेंच नव्हे तर विज्ञान अंधारांत चाचपडत अस-
तांच जगाला देखील कोणत्याहि काळीं निर्भय बनून
शांतता प्राप्त करून घेतां यावी म्हणून त्यांनी
आपला सत्य, अहिंसा व शांतीचा मार्ग दाखविला,

त्यांचे राजकीय व आध्यात्मिक वारसदार पं. जवाहरलाल नेहरू विज्ञानवादी असूनहि जगाला आज शांततेसाठी ह्याच मार्गावर आणण्यासाठी झटत आहेत. ह्या मार्गासहि जगाने लवकरच मान्यता दिल्याशिवाय त्यास दुसरी गतीच उरणार नाही.

जगांतील बलाढ्य व पुढारलेलीं राष्ट्रें स्वतंत्र आहेत, पण त्यांतील वैज्ञानिक मात्र दुर्दैवाने परतंत्र आहेत. कारण त्यांना शोध लावण्याचें स्वातंत्र्य असलें व ते स्वतंत्रबुद्धीने शोध लावूं शकत असले तरी शेवटीं त्या शोधाचा उपयोग मानवांना मारक कीं तारक व्हावयाचा ह्या निर्णयाचे बाबतींत महत्त्वाकांक्षी सत्ताधाऱ्यांच्या दडपणामुळे ते हतबल ठरतात. जगांतील परतंत्र राष्ट्रें एकामागून एक अशीं आज स्वतंत्र होतांना दिसत असलीं तरी परवश वैज्ञानिकांचें स्वातंत्र्ययुग मात्र अजूनहि सुरू झालेलें नाही. त्यांनी मानवताविन्मुखता सोडून महात्मा गांधींच्या सत्य, अहिंसा व शांतीच्या मार्गाने ते स्वतः खरे स्वतंत्र झाल्यास त्यांना आध्यात्मिक जीवनाच्या साहाय्याने मानवांचें वैज्ञानिक जीवनहि निःसंशय सफल करतां येईल. हा लेख संपविण्यापूर्वी जगाच्या तरणोपायाच्या ह्या एकमात्र आशाकिरणाकडे आम्ही त्यांचें लक्ष वेधूं इच्छितों.




कन्हैया मारु नको पिचकारी.



# बाळ-संगोपन

लेखक : ल. दे. शिवरामे, ज्यु. बी. ए.

प्रथम एक गोष्ट स्पष्ट करावयाला पाहिजे व ती म्हणजे मी एखादा शरीरचिकित्सक डॉक्टर नाही अथवा शरीरसंगोपनाचा अभ्यास केलेली एखादी नर्सहि नाही. त्याचप्रमाणे बालकाच्या संगोपनाचा व माझा काडीचाहि संबंध नाही. माणसाच्या चेहऱ्याकडे पाहून ज्याप्रमाणे ज्योतिषी भविष्य सांगतात त्याप्रमाणे कुठल्याहि लेखाचें शीर्षक वाचून वाचक त्या लेखाच्या विषयाची कल्पना करून घेतात. परंतु केवळ नांवावरून ज्याप्रमाणे माणसाचा स्वभाव कळूं शकत नाही त्याप्रमाणे केवळ शीर्षकावरून लेखकाचा विषयहि कळूं शकत नाही. सांगण्याचें तात्पर्य असें कीं या लेखाचा व बाळगोपाळांच्या आरोग्याचा, शरीरचिकित्सेचा अथवा संगोपनाचा थोडासाहि संबंध नाही. परंतु या 'बालांचा' व आपल्यापैकी प्रत्येकाचा फार जवळचा संबंध आहे. बाल म्हणजे केस! आजपर्यंत आपण बालकांच्या—मुलांच्या आरोग्यावर खूप चर्चा, चिकित्सा व संशोधन केलें आहे. पण ज्याचा आपल्या सौंदर्याशीं, रूढीशीं, धर्माशीं व आरोग्याशीं अतिशय जवळचा संबंध आहे त्याची मात्र आम्हीं उपेक्षाच केली आहे.

शास्त्रज्ञांनी आपल्या पंचेन्द्रियांचीं मोठमोठीं वर्णनें करून स्तुतिस्तोत्रें गायिलीं आहेत. त्याचप्रमाणे संस्कृत कवींनी आपल्या हात, पाय, नाक, डोळे, तोंड वगैरेंना गुलाब, कुंदकळ्या, चाफेकळी, पाचू, कमळ वगैरे उपमा देऊन गौरविलें आहे. एकाहि कवीने आपल्या प्रतिभेच्या विलासांतून त्यांची सुटका केली नाही. परंतु आपल्या आवडत्या केसांची मात्र त्यांनी अवहेलना केली आहे. संस्कृत कवींनी तर त्यांचा केसाने गळा कापला असें म्हणायला हरकत नाही. नाही म्हणायला स्त्रियांच्या वेणीला फक्त नागिणीची उपमा दिलेली आढळते. पण ही उपमाच इतकी विषारी आहे कीं तिच्यांतून सौंदर्य प्रगट होण्याच्या ऐवजी तिची किळस मात्र येते. एकंदरींत संस्कृत कवींनीहि त्यांच्याकडे दुर्लक्ष केलें आहे. आपण आपल्या बालकांची जेवढी काळजी घेतों तितकीच आपल्या बालांचीहि घ्यायला पाहिजे असें माझें मत आहे. त्यामुळे माणसाने केसांशीं केलेल्या बेइमानीपणाबद्दल मला नेहमीच वाईट वाटतें. माझ्या सर्व अवयवांत मला जर सगळयांत जास्त कसला अभिमान वाटत असेल तर तो माझ्या केसांचा! माझा केसांवरून ज्या वेळेला मी हात फिरवतों त्यावेळीं माझ्या हृदयाला अवर्णनीय गुदगुल्या होतात. माझी ताई ज्यावेळेला माझ्या केसांवरून हात फिरवते अथवा केसांशीं चाळा करते त्यावेळीं मला स्वर्ग अगदी दोन बोटें उरतो. लहान मुलाच्या गोड हास्यापेक्षाहि त्याचें भुरभुरणारें जावळ मला जास्त गोड वाटतें. वाऱ्यामुळे आपले भुरभुरणारे केस सावरणाऱ्या बालिकेचें सौंदर्य मला कुठल्याहि सौंदर्यापेक्षा जास्त विलोभनीय वाटतें. त्यामुळे कुठल्याहि पाणीदार डोळयांपेक्षा, गुलाबी गालापेक्षा किंवा चाफेकळी नाकापेक्षा माझें लक्ष प्रथम रेशमाप्रमाणे मऊ व लुसलुसीत असणाऱ्या केसांकडे जातें, आणि जर केसांचें सौंदर्य दृग्गोचर न झालें तर केसहीन सौंदर्य मला कळस नसलेल्या देवळाप्रमाणे हीन वाटूं लागतें. केसांचा रंग काळा असतो म्हणून त्यावर रुष्ट होण्याचें कारण नाही. केसांचें सौंदर्य उषेच्या विविध चित्राच्या पार्श्वभूमीप्रमाणे आहे. अंधाराची पार्श्वभूमि रंगांच्या छटांना ज्याप्रमाणे अवश्य आहे त्याप्रमाणे पाणीदार डोळयांना, चाफेकळी नाकाला व कुंदकळयासारख्या दातांना व

गुलाबी गालांना केसांच्या पार्श्वभूमीची आवश्यकता आहे. त्यामुळेच केसांच्या सौंदर्याबद्दल मला नेहमी अभिमान वाटतो. म्हणूनच बालांच्या संगोपनाची मी जास्त काळजी घेतों. माझें टोपी न वापरण्याचेंहि कारण हेंच आहे. कारण टोपीच्या दडपणाखाली केसांचें सौंदर्य दडपून टाकणें मला बिलकूल पसंत नाही.

आजकाल प्रत्येक व्यक्ति आपल्या केसांची काळजी घेत असतेच. त्याशिवाय का केसांच्या सौंदर्यप्रसाधनांची संख्या सारखी वाढत आहे? केसांचीं मुख्य सौंदर्य स्थळें म्हणजे दाढी, मिशा व डोकें होय. त्यापैकी डोक्यावरच्या केसांची एकटा कम्युनिस्ट सोडल्यास प्रत्येक जण कसोशीने काळजी घेत असतो. कम्युनिस्टांचे पिंजारलेले राकट केस म्हणजे लाल बावट्यावरील हातोड्या कोयत्यासारखा ट्रेडमार्क आहे. परंतु सर्वसाधारण माणूस नेहमी आपल्या केसांचा सौंदर्यसंवर्धनाकडे उपयोग करीत असतो. आठदहा वर्षांपूर्वी डोक्यावर केस ठेवणें म्हणजे उच्छृंखलपणाचें लक्षण समजण्यांत येई. त्यामुळे नाटकांत अथवा तमाशांत काम करणारे लोकच सहसा डोक्यावर केस ठेवीत असत. बाकीचे लोक डोक्याचा अगदी तुकतुकीत कॅरमबोर्ड करीत व सभ्य माणसाने केस वाढवलेच तर लोक त्याच्याकडे तुच्छतेने पाहात असत. त्यामुळेच मला वाटतें कीं डोक्यावर केस ठेवणार नाही हा वाक्प्रचार अस्तित्वांत आला असावा. तुकतुकीत केसावर मात्र शेंडीचा झुपका कांद्याच्या पातीप्रमाणे शोभून दिसत असे. पण अलीकडे परिस्थिति अगदी उलट झाली आहे. केसांचा व प्रत्येक व्यक्तीचा फारच जवळचा संबंध निर्माण झाला आहे. आज डोक्याचा कुणी चकचकीत गोटा केला तर त्याचा तबला झालाच म्हणून समजा! सगळ्यांचा हात याच्या गुळगुळीत डोक्यावरून न फिरला तर आश्चर्य! त्यामुळे डोक्यावरचे केस उडूं न देण्याकरतां प्रत्येकजण जपत असतो. डोक्यावरच्या केसांचे अनेक लोक भांग काढतात, त्यांना वांकडीतिकडी वळणें देतात. त्यांना तेलें लावतात व केसांबरोबर आपलें तोंडहि तेलानें न्हाऊन काढतात. त्यामुळे केसांपेक्षांहि त्यांचा चेहरा जास्त चकचकीत होतो, आणि ज्यावेळीं ते आपल्या तेलकट चेहऱ्यावरून कोटाच्या बाहीचा हात फिरवतात त्यावेळीं तें ध्यान पाहण्यासारखें असतें. अशावेळीं मला वाटूं लागतें कीं असल्या भंगडपणापेक्षा तें केसांचें सौंदर्यहि नको व हा बावळटपणाहि नको; परंतु फॅशनच्या नांवाखाली कुठलाहि बावळटपणा खपतो हेंच फॅशनचें वैशिष्ठ्य आहे.

पूर्वीच्या लोकांना डोक्यावर टोपी घालणें म्हणजे जशी अब्रू वाटत असे त्याप्रमाणे आजकाल डोक्यावर केस राखणें म्हणजे लोकांना भूषण वाटतें. आमच्या तिम्बूनानांचे जेव्हा वडील वारले तेव्हा त्यांना डोक्याचा चमन करावा लागला. पण त्याचवेळीं त्यांनी डोक्यावर पूर्वीचेच केस येईपर्यंत बाहेर तोंड न दाखविण्याची प्रतिज्ञा केली. त्यामुळें लोक म्हणूं लागले कीं तिम्बूनानांना त्यांच्या वडिलांच्या मृत्यूचा धक्का बसला व म्हणून ते घराच्या बाहेरहि पडत नाहीत. परंतु तिम्बूनानांना खरा धक्का त्यांच्या प्रिय बालांच्या वियोगाचा बसला होता, हें त्या बिचाऱ्यांना काय माहीत? केस म्हणजे सौंदर्याचा प्रमुख घटक आहे. आपल्या पूर्वजांना याची पूर्ण कल्पना होती. त्याशिवाय का त्यांनी धूर्तपणाने विधवेला केशवपनाची शिक्षा फर्माविली? स्त्रीचा पति वारल्यावर तिच्या सौंदर्याचा मुकुटमणि उतरवतांच तिच्याकडे परक्या माणसाचें लक्षहि जाऊं नये अशीच आपल्या पूर्वजांची इच्छा होती.

स्त्रियांच्या सौंदर्यांत केसांना फार महत्त्व आहे. पुरातन काळापासून स्त्रिया केसांची काळजी घेत आल्या आहेत. केसांच्या निरनिराळ्या रचना स्त्रियांमध्ये प्रचलित आहेत. केसांना त्या निरनिराळीं तेलें लावून व निरनिराळ्या केशरचना करून त्यावर फुलें, गजरे वगैरे घालीत असतात. पूर्वी लांब व तुकतुकीत केस असणें हें स्त्रियांच्या केसांचें सौंदर्यलक्षण समजण्यांत येई. पण अलीकडे पाश्चिमात्यांच्या अनुकरणामुळे स्त्रियांनीहि केसांवर शस्त्र धरलें आहे. त्यामुळे कमरेवर लोळणाऱ्या केसांची लांबी त्यांनी



मानेपर्यंत आणून ठेवली आहे. कदाचित् यंत्रयुगाचा हा परिणाम असेल! कारण आधुनिक यंत्रयुगांत माणसाला पैशापेक्षाहि वेळेची जास्त किंमत वाटते. त्यामुळेच कदाचित् स्त्रियांना आपल्या केसांची निगा राखण्यास अथवा केशरचना करण्यास वेळ नसेल. तिम्बूनानांना तर स्त्रियांचें हें कृत्य म्हणजे माणसाचें अनुकरण वाटतें. ते म्हणतात, "पाहा, स्त्रियांनी आता केसावरच शस्त्र धरलें आहे. पण माणसाच्या अनुकरणामुळे त्या उद्या दाढी व मिशांवरूनच शस्त्र फिरवूं लागतील."

एकंदरींत डोक्यावरचे केस उडूं न देण्यांतच प्रत्येकाचें हित आहे व प्रत्येकजण त्याची काळजी घेतोहि.

माणसाच्या दाढीचें याच्या अगदी उलट आहे. डोक्यावरचे केस वाढविण्यांत तर दाढीचे केस समूळ नष्ट करण्यांत खरें सौंदर्य आहे. त्यामुळेच माणूस अगदी घोटून घोटून दाढी करीत असतो. दाढीचे बाबतींत थोडासा निष्काळजीपणा केला कीं चेहरा उतरलाच म्हणून समजा. त्यामुळे मी दाढीच्या बाबतींत कधीच निष्काळजीपणा करीत नाही. बाहेरगांवीं गेलों म्हणजे मात्र थोडा त्रास होतो. पण मी सहसा दाढीचें जंगल वाढूं देत नाहीं. एक वेळ मी माझ्या मामाकडे गेलों होतों. माझा दररोजचा दाढीचा कार्यक्रम पाहून माझ्या मामी नेहमी तक्रार करीत असत. त्यामुळे मला मोठें हसूं येत असे. एक दिवस मी दाढी करीत होतों. मामीने तिकडे आंघोळीला पाणी काढलें होतें, पण पाणी निवून गेलें तरी माझी दाढी कांही संपेना. त्यामुळे मामी खूप चिडल्या व म्हणाल्या, "अहो, तुमची दाढी संपते कीं नाही? काय इतकी गुळगुळीत करीत बसलां आहांत?"

मामींच्या या बोलण्याचें मला मोठें हसूं आलें व आश्चर्यहि वाटलें, कारण आमच्या मामांच्या दाढीबद्दल त्या नेहमीच तक्रार करीत असत. तेव्हा मी म्हणालों, "स्त्रियांना काय दाढीचं एवढं महत्त्व वाटणार आहे? मामी तुमचं मात्र आश्चर्य आहे अगदी. तुम्हांला सुद्धां दाढीचं एवढं महत्त्व वाटूं नये? तरी बरं तुमचं लग्न झालं आहे." माझ्याबरोबर मामींनाहि हसूं आलें. त्या म्हणाल्या, "याचं कारण माणसं स्वार्थी असतात. तुमच्या मामांचंच पाहा ना. लग्न व्हायच्या आधीं अगदी रोज नियमानं तीन तीन वेळेला दाढी करायचे. पण आता आठ दिवस दाढीला वस्तरा लावतील तर शपथ."

"हें मात्र अगदी वाईट आहे." मी मामींना सहानुभूति दाखवीत म्हणालों.

"तसंच तुमचं, आज जरी तुम्ही रोज एक एक तास दाढींत घालवीत असलां तरी लग्न झाल्यावर......"

"छे, छे, मामी आपलं लग्न होऊन दहा पोरं झालीं, तोंडाचं बोळकं झालं, गालाच्या खाचा झाल्या व तोंडावर सुरकुत्या पडल्या तरी आपण रोज दाढी करणार हें अगदी ठरलेलं. अहो तें केसांचं जंगल कोण वाढूं देणार?" गुळगुळीत दाढीवरून हात फिरवीत मी म्हणालों. मला केसांचा अभिमान वाटत असला तरी दाढीमिशांचा मात्र मनापासून तिटकारा येतो व त्यामुळे मी त्यांचें त्वरित उच्चाटन करतों. दाढीमिशांचीं हीं खुरटीं जंगलें मला नेहमी नकोशीं होतात. दाढी वाढलेला चेहरा मला कांटेरी फणसासारखा वाटतो तर दाढीमिशांचें संपूर्ण उच्चाटन केलेला तुकतुकीत चेहरा टवटवीत गुलाबासारखा वाटतो, त्यामुळे सकाळीं उठल्याबरोबर सगळे कार्यक्रम बाजूला सारून मी प्रथम दाढीचा समाचार घेतों. परंतु रोज उठून दाढी करण्याचाहि कंटाळा येतो व चीडहि येते. पण त्यांत त्यांचा काय दोष? माणसाला दिलेली निसर्गाची ही देणगीच इतकी विचित्र आहे कीं रोज तिचें उच्चाटन केल्याशिवाय गत्यंतर नाही. आजपर्यंत बाल वाढण्याच्या अनेक तेलांचे शोध लागले आहेत. तसेंच बाल काढण्याचे साबणहि अस्तित्वांत आले आहेत, पण केस न वाढण्याच्या तेलाचा

मात्र अजून कुणीं कसा शोध लावला नाही ? बाल वाढण्याचा तेलापेक्षा बाल न वाढण्याच्या तेलाचा शोध लावणाऱ्या शास्त्रज्ञाला मी तरी धन्यवाद दिल्याशिवाय राहणार नाही ! माणसाचा चेहरा म्हणजे सर्वांत नाजुक, गोंडस व सुंदर भाग. परंतु त्यावरून निर्दयपणे शस्त्र फिरवायचें म्हणजे कोण क्रौर्य ? याची कल्पना मला प्रथम 'पहिल्या' दाढीचे वेळीं आली. जोंपर्यंत दाढी आली नव्हती तोंपर्यंत आम्हीं मानेवरूनहि खुशाल वस्तरा फिरवून घेत होतों. पण दाढीवरून तें चकचकीत पातं फिरवायचं म्हणजे कोण यातायात करावी लागली ?

पहिल्यांदा ज्यावेळीं वस्तरा माझ्या गालांवरून आक्रमण करूं लागला त्यावेळीं क्लोरोफार्म दिल्या-प्रमाणे माझीं सर्व गात्रें अगदीं शिथिल झालीं. त्यामुळे गालासारख्या नाजुक भागावर केसांचें कुरण वाढविणाऱ्या निसर्गाचा मला मोठा राग आला, आणि त्याच वेळीं स्त्रियांना दाढी व मिशा न देणाऱ्या निसर्गाच्या रसिकपणाबद्दल मला हेवाहि वाटूं लागला. नाहीतर जगांतील अश्यीं काव्याला तरी मानवाला मुकावें लागलें असतें यांत शंका नाहीं. कोल्हटकर आपल्या इतिहासांतील राण्यांना दाढ्या व मिशा लावत असत. स्त्रियांना दाढी व मिशा न देतां माणसाच्यामागे ही कटकट लावणाऱ्या निसर्गावर कोल्हटकरांनी व्यक्त केलेला हा संतापच नव्हे काय ?

तिम्बूनानांना तर दाढी करण्याचा मोठा कंटाळा ! ह्या कटकटींतून वांचण्याकरिता त्यांनी अनेक उपायहि करून पाहिले. एकवेळ ते टायफाईडने आजारी पडले. तेव्हा त्यांचे डोक्यावरचे सर्व केस गळून गेले. पण दुर्दैवाची गोष्ट अशी कीं त्यांची दाढी मात्र बोकडासारखी वाढली. तिच्यावर आजार-पणाचा काडीइतकाहि परिणाम झाला नाही. त्या-मुळे नाना दाढीवर खूप चिडले, आणि त्यांनी दाढीच्या विरुद्ध आघाडी उघडली. केसांच्या सौंदर्यवर्धनाकरिता मी निरनिराळीं तेलें वापरीत असे. पण प्रत्येकाचा अनुभव त्याच्या लेखी गुण-धर्माच्या विरुद्धच येत असे. केस चोवीस तासांत रेशमासारखे मऊ, काळेभोर व लांब वाढतील अशी शिफारस असली तर केस हटकून आपला रंग बदलून अंबाडीसारखे राठ होत व शिवाय त्यांची गळती सुरू होई ती निराळीच ! त्यामुळें केसांचा रंग बदलल्याने अकालीं वृद्धपण येई व केसहि गमावून बसावें लागे. म्हणून माझा सुगंधी तेलावरचा विश्वास पूर्णपणें उडाला. तिम्बूनाना माग ज्या तेलाने केस गळतात असें त्यांना दिसून येई तें तेल मुद्दाम वापरीत. पण तें डोक्याकरितां नसून दाढीकरितां ! अमक्या तेलानें केस गळतात अथवा कमी होतात असें त्यांना कळल्याबरोबर तें तेल तिम्बूनाना तास न् तास तोंडाला चोळीत असत. परंतु अशावेळीं तेलांचा अनुभव अगदी उलट येत असे. कारण त्यांच्या दाढीची गळती न होतां उलट दाट कुरणासारखी वाढच होत असे. त्यामुळे तिम्बूनाना फार त्रस्त झाले व त्यांच्या डोक्यांत एक विचार आला. दाढी वाढूं द्यायची नसेल तर रोज ती करायला पाहिजे, अथवा हा त्रास वांचवावयाचा असेल तर तिला पूर्ण स्वातंत्र्य तरी दिलें पाहिजे. म्हणून त्यांनी शिखांप्रमाणे केसावर शस्त्र न धरण्याचें धोरण आचरणांत आणायचें ठरविलें, आणि शिवाजीसारखी दाढी वाढवायला व राणा प्रतापसारखा मिशांना पीळ द्यायला सुरवात केली. परंतु त्यामुळे त्यांची दाढी व कुत्र्याच्या शेपट्यासारख्या वाकड्या मिशा हा आम्हांला थट्टेला एक विषय मिळाला, आणि आम्ही 'कुत्र्याचें शेपूट वाकडें तें वाकडें' या ऐवजीं 'तिम्बूनानांच्या मिश्या वाकड्या त्या वाकड्या' अशी म्हण वापरूं लागलों. त्याच वेळीं वर्तमानपत्रांत एका घटस्फोटाची बातमी प्रसिद्ध झाली. तेव्हा मी नानांना म्हणालों, " अहो नाना, अशी बोकडासारखी दाढी काय वाढवली ? हें पाहा आज वर्तमानपत्रांत काय बातमी आहे ती ! 'एका स्त्रीने आपल्या नव-ऱ्याने दाढी वाढवली म्हणून घटस्फोट घेतला.' " त्यामुळे नाना हसण्याचे ऐवजीं उलट एकदम गरम झाले व म्हणाले, " मूर्ख आहे ती बाई. " नाना आपल्या दाढीवरून मुल्लासारखा हात



फिरवीत म्हणाले, " अहो, या स्त्रियांना आमच्या दाढीचा व मिशांचा हेवा वाटतो. मिशा हें आम्हां वीरांचें भूषण आहे. " कुत्र्याचें शेपूट सरळ केलें तरी तें पूर्वस्थितींत येतें त्याप्रमाणे नानांनी आपल्या मिशांना पीळ दिला, पण पुन्हा त्या आपल्या पूर्वस्थितींत आल्या. नंतर नाना म्हणाले, " दाढी वाढवणं म्हणजे परदेशी मालावर बहिष्कार घालणं आहे. कारण आज आर्थिक बचावाची अत्यंत आवश्यकता आहे. आपण विदेशी मालावर बहि-ष्कार घालून राष्ट्रीय बचाव आघाडीला मदत केली पाहिजे. "

" पण नाना एवढ्याकारिता हें जंगल कोण वाढूं देणार व त्याची जोपासना करणार ? "

" मग काय दाढी-मिशांचं मुंडन करून स्त्रियां-सारखा गुळगुळीत बायकी चेहरा करून घ्यायचा ? पिळदार मिशांवरून हात फिरवल्याने अंगांत जें शौर्य संचारतं तें तुमच्या तोंडावर तरी कधी दिसतं का ? " नानांनी युक्तिवाद केला. एकंदरींत तिम्बू-नाना आपल्या दाढी-मिशांच्या अभिमानाने भारा-वून गेले. ते आपल्या दाढीवरून हात फिरवूं लागले म्हणजे एखाद्या संन्याशासारखे निर्विकार, तर मिशांना पीळ देऊं लागले म्हणजे पैजेचा विडा उचलणाऱ्या सरदाराच्या अंगांत विरश्री संचारावी त्याप्रमाणे दिसत असत. त्यामुळे दाढीने त्रस्त झालेले नाना आपल्या दाढीचे गोडवे गाऊं लागले. त्यायोगें त्यांच्या या ' दाढी वाढवा ' मोहिमेला ' आधिक धान्य पिकवा ' मोहिमेइतकें महत्व प्राप्त झालें.

पण नानांचें हें दाढीप्रेम फार दिवस टिकूं शकलें नाही. कारण एक दिवस ते देवदर्शनाला देवळांत गेले असतां तिथल्या पुजाऱ्याने त्यांना मियां समजून बाहेर हाकून लावलें तर एक वेळ ईदच्या दिवशीं एका गलेलठ्ठ मुसलमानाने त्यांना ईद मुबारक म्हणून भररस्त्यावर कडकडून मिठी मारली. त्यामुळे नानांना आपल्या दाढीचा अतिशय राग आला व त्याच दिवशीं त्यांनी आपल्या दाढीचें मुंडन केलें. अशारीतीने बरेच दिवस काळजी घेतलेल्या दाढीला नानांनी तिलांजली दिली.

बालकांचा बालवाङ्मयाशीं जितका संबंध आहे तितकाच बालांचाहि वाङ्मयाशीं संबंध आहे. केसाने गळा कापणें, हजामत करणें वगैरे म्हणी प्रसिद्ध आहेत. त्याचप्रमाणे आपल्या धर्माशीं व रूढीशीं पण केसांचा जवळचा संबंध आहे. त्यामुळे इतरांनी बालांशीं द्रोह केलेला असला तरी मी त्यांना शिरसावंद्य मानतों. निसर्गानेसुद्धा त्यांना डोक्यावर बसवून उच्चासन प्राप्त करून दिलेलें आहेच. त्यामुळेच मला बालकांच्या संगोपनाइतकें बालांच्या संगोपनाचें महत्त्व वाटतें.

---

ॐ संख्याबळ हा भीरूंचा उल्हास आहे. आत्मतेजाचे वीर एकाकी संग्रामांतसद्धां रमून जातात. आत्मतेजाचें तें वीरत्वच तुम्हा सर्वांना जोपासायचें आहे. एकटे असा वा बहु-संख्य असा, हें वीरत्वच एक अस्सल वीरत्व आहे. आणि आत्मतेजाचें वीरत्व यज्ञाशिवाय, निश्चयावांचून, श्रद्धेविना आणि विनम्रता सोडून साध्य होणें शक्य नाहीं.

— म. गांधी




पोट धरधरून हसणें.

*

" आम्ही विमानानं काशीयात्रेला जाणार आहोंत. "
" पण काशीला जायला विमान सर्व्हिस कुठें सुरू झाली अजून ? "
" आमच्या हिची सर्व तयारी होईपर्यंत खचित होईल. "

*



# बंड्याची वधूपरीक्षा

लेखक : मु. म. थत्ते, एम्. एस्सी.

'आमची मुलगी तशी कांही काळी नाही. दहाजणींसारखी आहे रंगरूपाने. तिच्या आईने तर तिला घरकामांत अगदी तरबेज केली आहे. घरांत अडचण असतांना आमची मालीच सर्व करते.' माझ्या मित्राकडे 'स्थळाची' चौकशी करण्यासाठी आलेले एक वृद्ध गृहस्थ आपल्या मुलीसंबंधी सांगत होते. माझा मित्र बंड्या असा तसा पंचवीस वर्षांचा झाला होता. एम्. ए. पास होऊन पुण्यांत एका साप्ताहिकाचा उपसंपादक म्हणून काम करीत होता. त्याचे आईवडील साधारण मध्यम स्थितींतील असून सातारचे बाजूला एका खेडेगांवीं आपल्या दोन वर्षांपूर्वी मॅट्रिक पास झालेल्या लग्नाच्या मुलीसह राहात होते.

बंड्याला मी लहानपणापासून ओळखतों. वयाचे सोळाव्या वर्षीच स्वारीला 'चप्पले'चा प्रसाद मिळाल्यापासून माझें तर असेंच मत झालें होतें कीं बंड्याचें तरुणीकरण जरा लवकरच झालें; आणि आता तर त्याचे स्वभावांत, बोलण्यांत, दृष्टींत व चेहऱ्यांत उतूं जाणाऱ्या तारुण्याचीं चिन्हें नवख्या माणसालाहि दिसत होतीं. परंतु अनेक ज्ञात नि अज्ञात प्रयत्न करूनहि दुर्दैवाने त्याला तसें यश अद्यापपर्यंत मिळालें नव्हतें.

बंड्याने लग्नाचा विचार मुक्रर केल्यापासून वधूंचे पालक हळूहळू बंड्याचे खोलीवर येऊं लागले. बंड्यानेहि आपल्या भावी सहचारिणीसंबंधीं अनेक कल्पना रंगविल्या होत्या. त्याने पाहिलेले देशी विदेशी चित्रपट, वाचलेल्या कादंबऱ्या, कॉलेजमध्ये काढलेलीं सातआठ वर्षें आणि पुण्या-मुंबईला नवीन वसलेल्या भागांतून दिसणाऱ्या रंगीबेरंगी व्यक्ति ह्यांचा पुष्कळसा परिणाम बंड्याचे मनावर झाला होता. " बस् ; मुलगी फक्कड पाहिजे. बाकी विशेष कांही नाही. " बंड्या नेहमी म्हणे.

बंड्या, मी आणि बंड्याचा दुसरा एक मित्र ठरलेल्या वेळीं मालीला 'पाहावयास' गेलों. मोठ्या अदबीने मालीच्या वडिलांनी आमचें स्वागत केलें. एका खोलींत दोन सतरंज्या घातल्या होत्या, त्यांवर आम्ही सूट घातलेले तसेच बसलों. बंड्याचा हा असा पहिलाच प्रसंग. माली आली. एका खिडकींतून मालीची आई व मालीची पाठची बहीण आमचेकडे पाहात होत्या. थोड्याच वेळांत बंड्याची व मालीची दृष्टादृष्ट झाली. प्रथम तिला आमच्यांतला 'मुलगा' कोण हेंच कळेना. मीं बंड्याला प्रश्न विचारावयास सांगितल्यावर मग तिचे ध्यानांत आलें. ती नऊवारी नेसलेली, ठेंगणी, काळी, दोन बोटें कपाळावर पै एवढें कुंकू लावलेली व नाकांत चमकी घातलेली माली पाहतांच बंड्याचे मनोरथ भंग पावले. त्याचें कल्पनाचित्र व माली ह्यांत कोठलेंच साम्य नव्हतें. बंड्याने कसेबसे एक-दोन प्रश्न विचारले आणि पुढे आलेला चहा घेऊन आम्हीं काढता पाय घेतला.

खोलीवर परत येतांना बंड्या किंचित् रागाने व विनोदाने म्हणत होता, "काय लोक तरी. कशाला बोलाविलें ? आपल्या मुलीचें रूप काय दडत नव्हतें ? उगाच मोठमोठ्या उड्या हे घेतात कशाला ? क्लार्क नाही तर मास्तर काय थोडे आहेत ? म्हणे आमची माली दहाजणींसारखी आहे ! "

रीतीप्रमाणे मालीचे वडील दोन दिवसांनी बंडयाचे खोलीवर आले तोंच बंडयाचा पत्ता काढीत आणखी एक वृद्ध गृहस्थ 'आपण लग्नाचे आहांत ना?' अशी पृच्छा करीत खोलींत आले. बंडयाने मालीचे वडिलांना 'माझेवर विसंबून राहूं नका' असें सांगतांच मालीचे वडील निराश मनाने जिना उतरून गेले, पण तितक्याच आशाळभूतपणे हे दुसरे गृहस्थ बंडयाकडे पाहूं लागले.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं आम्ही त्या गृहस्थांकडे मुलगी पाहावयास गेलों. त्यावेळीं मात्र प्रथम-पासूनच बंडयाने प्रश्न विचारावयाचें ठरलें होतें. "आपलें नांव काय?" पुढे आलेल्या मुलीस बंडयाने विचारलें. "अंबू"! लठ्ठ आणि बॉंबे-मद्रास डोळयांच्या अंबूने चंबूसारखें तोंड करून आपल्या मतें बंडयाकडे पाहात उत्तर दिलें.

दुसऱ्याहि ठिकाणीं बंडयाची अशी वासलात लागलेली पाहून बंड्याने ठरविलें कीं प्रथम फोटो पाहिल्याशिवाय कुठेहि मुलगी पाहावयास जावयाचें नाही. बंड्याचे लग्नाची मोहिमेची जाहिरात सर्वत्र पसरली. कोणींतरी वधू-वर-सूचक मंडळांत नांवहि दिलें. बंड्याकडे पगडीवाल्यांची, मुलींचे भावांची व नातेवाईकांची ये-जा वाढली. बंडयाला आता मुली पाहावयाला जाण्यांत विशेष कांही वाटेनासें झालें. तो एकटाहि जाई. कधी कधी एकाच दिवशीं एका ठिकाणीं 'पाहाण्याचा' कार्यक्रम झाल्या-वर तसाच पुढे दुसऱ्या ठिकाणींहि 'पाहाण्याला' जाई. १०।१२ मुली 'पाहून' झाल्या. कधी नाक नकटें तर कधी नाकपुडया उघडया. कधी लंबूस व किर-कोळ तर कधी खुजा व वातुळ, कोणी चष्मा लावलेली तर कोणी देवी येऊन गेल्यामुळे चेहऱ्याचें ठशाचें पातलें झालेली, कोणी नऊवारीच नेसणारी तर एकादी अगदी केस गेलेली. बंड्याला एकहि मुलगी पसंत पडेना.

जमा झालेल्या अनुभवामुळे आता बंड्या जास्तच धीट बनला होता. एकदां तर बंड्याने अकालीं प्रौढत्व आलेल्या एका मुलीला विचारलें, "तुम्हांला संध्येचें मांडतां येतें का?" "आपणांला संध्या येते का?" तिने धिटाईने उलट प्रश्न केला. दुसऱ्या ठिकाणीं बंड्याने विचारलें, "तुम्हांला पोलकी बेततां येतात का?" "हो" ती म्हणाली. "स्वतःचीं?" "हो." "काय मापें आहेत?" "तें माझें मी पाहीन." तिने बंड्याला निरुत्तर केलें. तिसऱ्या एका ठिकाणीं बंड्याने विचारलें, "रजिस्टर लग्न केलें तर तुम्हांला काय वाटेल?" "लग्न झाल्यासारखें नाही वाटणार." "माझ्या खोलीवर आल्यावर सुद्धा—!" तिने बंड्याकडे फक्त तीव्र कटाक्षाने पाहिलें व ती उठून गेली. बंड्याचा व्रात्यपणा व "कीर्ति" ह्या निमित्ताने मात्र जास्तच पसरत गेली.

बंड्याचा 'पाहिलेल्यां' चा नंबर वाढूं लागला. पण अद्याप त्याचे पसंतीला कोणी उतरेना. परके लोकहि बंड्याची चेष्टा करूं लागले. बंड्या आमचेजवळ म्हणे, "रस्त्यावर फिरतांना चांगल्या चांगल्या मुली दिसतात, अगदी मागें वळून पाहिल्याशिवाय राह-वत नाही, पण प्रत्यक्ष 'पाहावयाला' गेल्यावर अगदी गडकऱ्यांच्या इंदू-बिंदू!" आम्हीहि चेष्टेने म्हणत असूं, "सुंदर मुली सांगून येत नाहीत. त्यांचेवर अनेकांची नजर असते. ते त्यांना सांगून जातात." बंडया मिस्किलपणें म्हणे, "फक्त पडित आणि टाकाऊ माल बाजरांत येतो. नशिब आमचें".

एकदा बंडयाला एक मुलगी पसंत पडली. चांगले १५-२० प्रश्न हंसत हंसत विचारले तिला. 'उद्या सकाळीं या' असें तिच्या वडिलांना सांगून स्वारी खुशींत खोलीवर आली. संध्याकाळीं आमचे मोठ्या ऐटीने नि मिटक्या मारीत स्वारी आमचे जवळ तिचें वर्णन करीत सुटली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं तिचे वडिलांची वाट पाहात बंडया खोलीवर बसला. परंतु कोणीहि तिच्याकडून आलें नाही. दोन तीन दिवस गेले तरी पत्ता नाही. शेवटीं एका तिऱ्हाइतामार्फत बंडयाने त्यांचेकडे विचारणा केली. "हो, कळवितों" असें उत्तर आलें. पण आठ दिवस गेले तरी कांही समजलें नाही. बंडयाची 'कीर्ति' नि वाह्यातपणा कोणींतरी त्याचे हितशत्रूने त्यांचे कानावर घातला होता. बंडयाची निराशा झाली व मनाहि खट्टू झालें. बंडयाने पुन्हा 'पाहण्याचा' क्रम चालू केला. परंतु कोणीहि पसंतीस येईना. कधी कधी त्याला वाटे 'नाकारलेल्या मुलींत एक दोन बऱ्या होत्या. पण आता परत तसें कसें कळवावें!'

नुसत्या फोटो पाहून नाकारलेल्यांची व गोत्र जमत नाही म्हणून सोडलेल्यांची संख्या सोडली तरी बंडयाने २५।२६ मुली 'पाहिल्या.' बंडयाला आता स्वतःची लाज वाटूं लागली. एकदां तर जिला बंडयाने मनांतून पसंत केली होती ती लग्न होऊन आपल्या सहचऱ्याबरोबर संध्याकाळीं कोठेतरी फिरा-वयास जातांना दिसली. बंडयाचें मन जास्तच खट्टू झालें.

माझेकडे येऊन बंड्याने आपली हाकिकत निवेदन केली. मीं म्हटलें, "मुलींचे पालक तरुण दिस-णाऱ्या अविवाहितांकडे खेटे घालतात ह्यांत तुम्हीं स्वतः प्रौढी मारण्यासारखें कांही नाही. कांहींना आर्थिक परिस्थितीमुळे मुलींना शिक्षण देतां येत नाही. कांही मुली दुर्दैवाने कुरूप निपजतात. कांहींना आपला सहचारी निवडण्याचें स्वातंत्र्य नसतें व तशी संधिहि त्यांना मिळत नाही. ह्या सामाजिक कठोर परिस्थितीचा जाच त्यांना निमुटपणें सहन करावा लागतो. अनेक मुली तूं नाकारल्यास, ह्यापुढे कदा-चित् तुला मुलीहि फारशा सांगून येणार नाहीत ह्याचा तूं विचार कर."

आपल्या वडिलांनाहि बंड्याने कळविण्यासारखी होती तेवढी हाकिकत कळविली होती. ज्यांना बंड्याने नाकारलें होतें त्यांचेपैकी एकदोघीजणी मुद्दाम लग्न झाल्यावर बंड्याचे खोलीवरून जात. हेतू हा कीं न बोलतां बंड्याला सांगावें 'आपणच कांही जगांत एकटे वीर नाही. पुरुषजातींत जन्माला आलांत एवढ्या शिदोरीवर आपण किती दिवस जगणार आहांत?'



बंड्याचे मनांत येऊं लागलें कीं आता दोन तीन मुलींत निवड करावयाची. एक पाहून झाली पण बंड्याचें मन होकार देण्यास कांही तयार होईना.

'गाडगीळ' असें म्हणत पोस्टमनने बंड्याचें पत्र खोलींत टाकलें. बंड्याच्या बहिणीचें पत्र होतें तें. पत्राचा मजकूर बंड्या वाचूं लागला. "तुझें बाबांना आलेलें पत्र मीं वाचलें. २५।२६ मुली 'पाहिल्यास' ना! तुला अद्याप एकहि पसंत पडली नाही. त्यांना नकार मिळाल्यावर काय वाटत असेल ह्याचा तूं कधी विचार केला आहेस का? मुली म्हणजे तुला काय वाटल्या? मंडईतील भाजीचे नमुने! गिऱ्हा-इकाने यावें, जरा वेळ थांबून पाहावें आणि पसंत नाही म्हणत पुढे जावें. मी स्वतःवरून सांगतें कीं आम्हांला उद्वेग येतो, पण मन दाबावें लागतें. आईवडिलांची-सामाजिक अन्यायाची चीड, क्षणभर आईवडिलांची-सुद्धा चीड येते. पण पुन्हा मन घट्ट करून दुसऱ्यापुढे यावें लागतें. आईवडील तरी काय कर-णार? मुलीचें कल्याण व्हावें हीच त्यांची इच्छा. जुनीं सामाजिक बंधनें तोडण्याची त्यांची तयारी नाही. पण ह्या सगळ्या 'शो' ला जबाबदार कोण? तूं इतका शिकलास, पण माणसांचीं मनें तुला समजलीं नाहीत. सिनेमांत पाहिलेल्या नि कादंबऱ्यांत वर्णन केलेल्या नायिका तुम्हांला खऱ्या वाटतात, तीं तुमचीं कल्पनाचित्रें होतात. कृत्रिम तऱ्हेने रंगभूषा नि वेषभूषा केली कीं तुम्ही भुलून जातां. तुला फक्त मुलीचे चेहऱ्याशींच का लग्न करा-वयाचें आहे? आणि समजा, तुला आज एखादी मुलगी आवडली तर तीच नेहमी तुला आवडेल असें कसें म्हणतां येईल? आणि नाही आवडली तर तिला सोडून का देणार आहेस तूं? लहान तोंडीं मोठा घांस घेतला. पण क्षमा कर..."

बंडयाने पत्र वाचलें, पण त्याच्या बहिणीचा आर्त स्वर त्याला समजला नाही. पण आता कदाचित् हा 'सीझन' जाईल म्हणून बंडयाने साधारण बऱ्याशा वाटणाऱ्या मुलीला होकार देण्याचें ठरविलें.

दोन दिवसांनी एका मुलीला पाहिल्यावर बंड्याने होकार देण्याचें निश्चित ठरविलें. आमचीहि वरवर संमति घेतली. बंड्याचे आईवडिलांसमक्ष त्याचें लग्न २००० रु. हुंडा नि ५०० रु. करणी घेऊन दोन्हीकडील खर्च मुलीचे वडिलांनी करून पार पडलें.

बंड्या एका खोलींतच संसार मांडून राहूं लागला. बंड्याची निर्मला अगदी उत्तम नसली तरी रूपाने निश्चितपणें दहाजणींसारखी होती. माहेरच्या वळणामुळे व समंजसपणें ती संसारांत रमली होती. बंड्याच्या दरमहा मिळणाऱ्या पगारांत नीटनेटकें नि व्यवस्थितपणें राहून आल्यागेल्याची अगत्यानें विचारपूस करून दरमहा पांचदहा रुपये ती मागे ठेवीत असे.

दोन तीन महिने होऊन गेले तरी बंड्याचा नेहमीचा स्वभाव व तें विनोदी बोलणें कांही दिसेना. बंड्याकडून हळूहळू कुरकूर ऐकूं येऊं लागली. "निर्मला बाहेर फिरावयास येतांना पॉवडर लावीत नाही, नेहमी गोल नेसत नाही, तिला वेषभूषा चांगली करतां येत नाही. चारचौघे मित्र जमले असतांना फ्रीली वागत नाही. तिला इंग्लिश चित्रपट पाहावयास आवडत नाही ......" पुढे पुढे तर बंड्या म्हणूं लागला "निर्मला मला आवडत नाही."

मी त्याचें समाधान करण्याचा प्रयत्न करी. तुझ्या पत्नीला हें ऐकून काय वाटेल? तुझ्या भोंवती एकत्रित केलेल्या तिच्या आशा-आकांक्षा मातीमोल होतील. होकार देण्यापूर्वी आवडीनिवडीचा प्रश्न. आता दोनतीन महिने तुम्ही एकत्र राहिल्यावर शारीरिक व्यंग नसतांना, तुला ती कां आवडूं नये? तुझ्या आवडीनिवडीला आता थोडी मुरड घाल. थोडें-फार तिच्या आवडीनिवडीकडे पाहा आणि तुमच्या या मीलनांतून आल्हाद कसा निर्माण होईल ह्याचाच आता तूं विचार कर."

निर्मला बंड्याचे मनाप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करी; परंतु बंड्याचे लहरीप्रमाणे तिला छानछोकी करण्याचें जमत नसे. बंड्याचें मन बदलण्याचें चिन्ह दिसेना. पुढे पुढे निर्मला मला आवडत नाही, असें तिच्या देखतहि तो म्हणूं लागला. चार पांच वेळां मुकाट्याने तिनें ऐकून घेतलें. शेवटीं तिला रहावेना. ती बोलून गेली, "मला तुमच्या पुढे वडिलांनी उभी केली ती काय बुरखा घेऊन केली होती का? दोन दोन तीन तीन वेळां पाहिलीत; तुमच्या मित्रांनी पाहिली. तुमच्याकडे मी येतांना फाटकापासून, माझ्यांत कांहीं व्यंग नाहीना, हें पाहण्यासाठी आपले मित्र उभे केलेत. वडिलांना ऐपत नसतांना आणि तुम्हांला गरज नसतांना तुम्हीं सांगितलेल्या अटी मान्य करून त्यांनी मला तुमचे हवालीं केली. कित्ती कित्ती आशा मी बाळगल्या होत्या! आदर्श संसार करावा; तुमची सेवा करावी......; पण तुम्ही मात्र मला नेहमी छिडकारीत आहां. दुसऱ्याचे देखत माझी निंदा, कुचेष्टा, व अपमान करतां; मला टाकून बोलतां. काय अपराध केला मीं? मला माहेरीं जाण्यासाठी सांगतां; कां तर मी तुम्हांला आवडत नाही. काय सांगणार माहेरीं जाऊन मी वडिलांना? समाज माझेकडे कोणत्या दृष्टीने पाहील! माझ्यासाठी नाही तरी निदान तुमच्या होणाऱ्या बाळासाठी..." निर्मला मूर्च्छित पडली.

बंड्याने लगबगीने उठून तिच्या कपाळावर गार पाणी घातलें व कांही वेळ गार पाण्याची पट्टी कपाळावर धरली. थोड्या वेळाने निर्मला सावध होऊन पाहातें तों बंड्याचे डोळे तिला पाणावलेले दिसले. तिनें उठण्याचा प्रयत्न करीत म्हटलें, "हें काय?" "कांही नाही" हातरुमाल डोळ्याकडे नेत बंड्या म्हणाला.

---

* ती (लाडांत येऊन)- मीं रोज असं जेवण करून घातलं तर मला काय मिळेल?
तो — माझ्या विम्याचे पैसे.

* * *

## कशासाठीं ? पोटासाठीं !



फोटो—आर्. व्ही. जोशी, एफ्. वाय्. सायन्स ए.

## खंडाळ्याच्या घाटासाठीं !



फोटो—वि. मा. जोशी, आय्. एस्सी.

## दर्पण.



फोटो—डी. एल्. ओस्वाल, इं. सायन्स.

## अर्पण.



फोटो—प्र. गं. महाजन, आय्. एस्सी.

कुरुक्षेत्र.



फोटो—एम्. एच्. गद्रे

प्रपात.



फोटो— व्ही. के. पाटील

कळस.



फोटो—वि. मा. जोशी, आयू. एस्सी.

अजिंठ्याचें विहंगदर्शन.



फोटो—श्रीराम कुलकर्णी, सी. बी. एस्सी.



# जिंकली सभा मीं

[ एक उपरोधिका ]

[ मुक्तछंद ]

चाललें व्याख्यान आझाद मैदानीं
केवढा प्रचंड श्रोतृसमुदाय
वायुला शिराया रीघ नसे तेथे.
निःशब्द आणि ती शांतता केवढी
पडली असती टांचणीहि जरी
पडसाद तिचे घुमले असते
साऱ्या मैदानांत.
व्यासपीठावरी—
चाललें होतें नानासाहेबांचें प्रभावी वक्तृत्व.
धबधब्यांतून पडावा खालती पाण्याचा लोट,
उन्मत्तपणें, गर्जना करीत,
तशा आवेशाने चाललें होतें त्याचें तें व्याख्यान
काय हा आवेश ! काय ही तडफ !
अग्निस्फुलिंगच उडताती जणूं शब्दाच्या रूपाने
श्रोतेजन सारे—
तटस्थ होऊन झेलत होते ते तेजाचे कण.
" भारतामधे
उठला पाहिजे क्रान्तीचा डोंब
बंडाचें शिंग फुंकुनी करा
जयजयकार क्रान्तीचा आज.
आजपासुनीया
गरीब श्रीमंत नाही हा भेद
समतेच्या या निशाणाखालती
सारेच समान.
उठा सारेजण—
दलितांचीं दुःखें दिसतीं सभोती
गरिबांच्या घरीं नाही खावयास पुरें दोन वेळ.
'भूक ! भूक !' ऐसा बालकांचा त्यांच्या
चाले आकांत.
येत कां नाही तो तुमच्या कानीं ?
आणि मजुरांच्या कोंदट चाळींत
सूर्याचा किरण चुकूनहि कधीं
शिरे नच जेथे—
पहा ना एकदा उघडीं नागडीं मजुरांचीं बाळें?
कुडकुडतातीं थंडीमध्ये तीं.
पाठीला भिडलीं तयांचीं पोटें.
नयनीं दिसतें केवळ दैन्य
आणि लाचारी.
नाही का अश्रु तुमच्या नयनीं त्यांच्यासाठी एक !
चला उठा तर—
पुकारा करा आज बंडाचा
उभवा झेंडा मानवतेचा लोकशाहीचा
दलितांचीं दुःखें करावया दूर
जगांत आणाया शान्ती समाधान.
जयजयकार करा क्रान्तीचा
बोला " जय हिंद. "
—संपलें भाषण.
टाळ्यांचा केवढा कडकडाट गगनभेदी !
दणदणलें जयाच्या घोषानें सारें मैदान.
नानासाहेबांच्या मुखीं विराजे
जयाचा आनंद.
म्हणाले मनांत " जिंकली, सभा मीं. "

* * *

ओसंडत होता आनंद मनांत
वाटत होतें—जाऊनीया घरीं सांगेन सखीला
" जिंकली सभा मीं. "
त्याच उन्मादांत उतरले खाली मोटारीमधुनी
आणि फाटकांत केळीच्या एका सालीवरुनी
घसरला पाय !
घसरला पाय–तोल सावरीला काठीच्या आधारें
गेला परी ताला ! (कोण तो सावरी ?)
"कुठे गेला गणू, हरामखोर,
काम चुकार, नंबरचा एक !"
गर्जत बोलले नानासाहेब.
वाटेंतील हें केळ्याचें साल
दिसलें नाही का रस्ता झाडतांना ?
फुटले डोळे का ?
फुकट पगार द्याया हवा यांना.
कुठे गेला तो ? बोलवा त्याला."
गणूच्या नांवाचा झाला पुकारा.
कांपत आला तो मालकाजवळ.
मेघाची गर्जना फोल ठरवून
कडाडली वाणी.
कुळाचा साऱ्या उद्धार झाला.
मायबाप त्याचे उद्धरून गेले.
अखेर नीट समज देऊन पाठविले त्याला—
साल उचलाया.
आणि तेवढ्यांत—
भिकारीण एक घेऊन कडेला बालक सान
शिरली आंत
लज्जारक्षणाहि अपुरें वस्त्र.
दैन्य मुखावर–आणि नसे गात्रीं
थोडेंहि त्राण.
पाय होते जरी लटपटत—
कशीबशी कांठी टेकत टेकत
आली ती आंत
साऱ्या दिवसांत मिळालें ना अन्न,
भुकेने जाहलें बालक व्याकूळ
तिच्याहि पोटांत पेटला होता आगीचा डोंब.
शिळें पाकें किंवा उष्टें खरकटें
मिळेल कांही या आशेने एका
आली ती आंत.
आणि पाहतांच भिकारिणीला त्या,
नानासाहेबांचा पुन्हा गेला ताल.
"कोण तूं ? आलीस विचारल्याविना
बंगल्यांत आंत ?
अन्नछत्र येथे उघडलें असें वाटलें का तुला ?
बाहेर हो आधी !"
"दादा मी उपाशी, दोन दिवसांची–
बाळाकडे पहा—"
"बोलूं नको शब्द एकहि पुढे
अन्नाचा कणहि मिळणार नाही तुजला इथे
म्हणे मी उपाशी दोन दिवसांची !
असे उपाशी कितीक येतात कितीक जातात.
येत नसे जर पोराला पोसतां —
देऊन टाक ना कुणाला तरी तें.
भिकाऱ्यांचें पीक आहे या देशांत
नाही तरी फार.
सोडले पाहिजे ओसाड बेटांत नेऊन साऱ्यांना–
मरायास तेथे."
हांसत मोठ्याने विनोदावर त्या आपुले आपण
कडाडले पुन्हा—
"गण्या गाढवा–हांकून दे या भिकारिणीला.
गेली कुठे तुझी अक्कल आज ?
मुकाट्याने जर नसेल जात—
सोड टिप्या कुत्रा तिच्या अंगावर."
हुकूम देऊन गणूला असा
शिरले घरांत नानासाहेब.
चहा पावाचा फडशा पाडीत
(टिप्याचें भुंकणें ऐकून हांसत)
ओरडले ते—
"नीले लाडके–आहेस कुठे तूं ?
माझ्या मनामधे भरला आहे केवढा आनंद !
ऐकलेस का तूं ?
जिंकली सभा मीं आझाद मैदानीं
जिंकली सभा मी–जिंकली सभा मीं."

—अनामिक



# तुकाराम आणि रामदास

लेखक : आ. ना. भंगाळे, ज्यूनियर बी. ए., साहित्य विशारद.

महाराष्ट्रांत सतराव्या शतकांत होऊन गेलेल्या अनेक संतकवींत तुकोबा व रामदासस्वामी हे संत-द्वय प्रमुख होत. दोघांचा जन्म एकाच वर्षी म्हणजे शके १५३० मध्ये झाला. दोघांनाहि भक्तीचा ठेवा परंपरागत मिळालेला होता. तुकोबा हे वारकरी सांप्रदायाचे पुरस्कर्ते आणि रामदास रामदासी सांप्रदायाचे प्रवर्तक असले, तरी दोघांनीहि आपा-पल्या परीने भागवत धर्माचा प्रसार करून धर्म, संस्कृति आणि वाङ्मय यांची यवनांच्या ऐन अमदानींत जोपासना करून महाराष्ट्रसमाजाचें संकटपरंपरेपासून रक्षण केलें. असें असलें तरी दोघांच्या वाङ्मयकृतींचें परिशीलन केलें असतां दोघांत कांही बाबतींत भिन्नता आढळून येते. तुकोबाच्या अभंगांत निवृत्तिवादावर तर समर्थांच्या दासबोधांत प्रवृत्तिवादावर जोर दिलेला दिसतो. 'प्रारब्धेंचि होय सुख, प्रारब्धेंचि पावें दुःख', असें म्हणून तुकाराम प्रारब्धावर आपला हवाला ठेवितात. उलट रामदास 'केल्याने होत आहे रे, आधी केलेंचि पाहिजे । यत्न तो देव जाणावा, अंतरीं धरितां बरें ।' असा यत्नवाद लोकांस निःशंकपणें पटवितात. तुकोबा 'ठेविलें अनंतें तैसेंचि रहावें, चित्तीं असो द्यावें समाधान.' म्हणून असलेल्या स्थितींतच आनंद मानतात, तर रामदास 'होत नाहीं प्रयत्नें ऐसें काय आहे ।' असा सवाल लोकांस टाकतात. तुकाबा संसार करूनहि विरक्त तर रामदास जन्मभर संन्यस्तवृत्तीने राहूनहि 'आधीं प्रपंच करावा नेटका,' असा उपदेश करतांना आढळतात. दोघे जर एकाच कालांत होते तर दोघांच्या वाङ्मयकृतींत हा फरक कां आढळून यावा ? त्यांच्या निवृत्तिप्रवृत्तीस असें कोणतें कारण घडलें असावें ? त्यांच्या जीवनावर, मनावर त्यांच्या कौटुंबिक स्थितीचा तसेंच तत्कालीन धार्मिक, सामाजिक, राजकीय स्थितीचाहि कांही परिणाम घडला असेल काय ?

तुकारामाचा जन्म देहू गांवीं एका प्रतिष्ठित घराण्यांत झाला. ते जातीने शूद्र असून व्यवसायाने वैश्य होते. पांडुरंगाची उपासना त्यांच्या घराण्यांत पूर्वांपार चालत आलेली होती. त्यांच्या वयाचीं पाहिलीं तेरा वर्षें आईबापांच्या प्रेमळ सहवासांत सुखाने गेलीं. बाराव्या वर्षी तुकारामाचें पहिलें लग्न झालें; पण रखुमाई दमेकरी असल्याचें आढळून आल्यामुळे पुढे १।२ वर्षांतच त्यांचें दुसरें लग्नहि जिजाईबरोबर घडून आलें. वयाच्या तेराव्या वर्षी म्हणजे शैशवावस्था संपते न संपते तोंच त्यांचे वडील निवर्तले; व संसाराची धुरा या वेळेपासूनच या पोरसवदा तुकारामाच्या शिरावर येऊन पडली. तरी पुढील चार वर्षें त्यांनी मोठ्या हिमतीने जमाखर्च ठेवणें, शेतीकडे लक्ष देणें, सावकारी करणें इ० कामें पार पाडून आपलें मूल मोठें संसारदक्ष आहे असें कनकाईकडून म्हणवून घेतलें. हीं चार वर्षें तुकोबांचा संसार आनंदाने चालला होता. परंतु अशा तऱ्हेने तुकोबाने आनंदाने संसार करावा अशी ईश्वरेच्छा नव्हती. ईश्वर त्यांच्या भक्तीचा भुकेला होता. तुकोबाचें लक्ष केव्हा एकदा संसारांतून मुक्त होऊन आपणाकडे संपूर्णतया लागतें अशी तो सारखी वाट पाहात असावा असें म्हटल्यावांचून राहवत नाही. यापुढे मात्र तुकारामावर एकामागून एक संकटें कोसळलीं. तशांतच दुष्काळ पडला. वयाच्या सतराव्या वर्षी ते मातृप्रेमासहि पारखे झाले. पुढे वडील भावजय वारली. वडील भाऊ सावजी तिच्या वियोगाने अधिकच विरक्त होऊन तीर्था-

टनास कायमचा निघून गेला. पाहिली आवडती बायको रखुमाई अन्न अन्न करतां मेली. तिच्या-मागून त्यांचा पहिला मुलगा संताजीबाळहि तुकोबास सोडून गेला. गुरेंढोरेंहि कांही रोगाने अकस्मात् मरण पावलीं. अशा रीतीने दुःखामागून दुःख आलें, म्हणून तुकोबांचें मन संसारांत लागेनासें झालें. ते दिवसेंदिवस उदासीन बनूं लागले. त्यांच्या विरक्तवृत्तीचा फायदा घेऊन लोकांनी त्यांचे पैसे बुडविले, देणेकऱ्यांनी तगादे लाविले. दिवाळें निघण्याची वेळ आली. नापत झाली. तशांत कुटुंबपोषणासाठी त्यांनी वाणसवद्याचें एक दुकान घातलें. पण तोंडाने विठ्ठल विठ्ठल म्हणून सढळहाताने माल देऊन पैशाची थोडीहि फिकिर न करणाऱ्या या साधूला नफा कसा यावा ? चार पैसे मिळायचे ते जाऊन उधारी वाढली. आंतबट्याचा व्यवहार होऊं लागला. दिवाळें निघालें. बेअब्रू झाली. यावेळीं आप्तेष्टांनी व सासऱ्यानेहि थोडी मदत केली, पण जम बसेना. तशांत लुच्च्यांनीहि त्यांना फसविलें. ह्यावेळीं त्यांची दुसरी पत्नी जिजाई जर शांतप्रकृतीची असती, तर तिने मोठ्या प्रेमाने संसारांतून उडून चाललेलें पतीचें मन मधुभाषणांनी संसाराकडे परत वळविलें असतें. पण ईश्वरी संकल्प तसा नव्हता. जिजाई स्वभावाने महा तिखट होती. तिने तुकारामाची तीव्र शब्दांत निर्भर्त्सना करण्याचा सपाटा चालविला. आतामात्र संसाराचा ताप तुकोबांच्या मनास अनावर होऊं लागला. त्यांचें मन अस्वस्थ झालें. याप्रमाणे अवघ्या चार वर्षांत तुकारामाच्या संसाराची परि-स्थितीने पार दाणादाण होऊन पैसा, मूल, बायको, अब्रू, गुरेंढोरें पार जाऊन सर्वांचा सत्यानाश झाला. दुःखाची परिसीमा झाली. प्रपंचदुःखांच्या इंगळ्यांनी तुकोबांचें कोमल अंतःकरण फाटून गेलें. ज्यावेळीं मनुष्याच्या आयुष्यांत एकामागून एक संकटें येऊं लागतात, प्रियजनांचा विरह होतो, बेअब्रू होते, प्रयत्न करूनहि यश मिळत नाही अशावेळीं आपल्या जीविताविषयी त्याला शंका वाटूं लागते. मनुष्य दैववादी बनतो. परमेश्वराच्या अस्तित्वाविषयी मनांत शंका राहात नाही व त्याविषयी अधिकाधिक श्रद्धा उत्पन्न होते. या स्थितींतून मुक्त होण्यास सर्वशक्तिमा परमेश्वराला शरण गेल्याशिवाय दुसरा मार्गच उरत नाही.

तुकोबांची स्थितिहि हुबेहुब तशीच झाली. चहूंबाजूंनी कोसळलेल्या दुःखांनी त्यांच्या मनाला मोठा धक्का बसला. 'सुख पाहतां जवापाडें, दुःख पर्वताएवढें,' याचा अनुभव त्यांना पूर्णपणें आला. आपली प्रियपत्नी व मुलगा यांच्या मृत्यूस आपणच कारणीभूत आहोंत ही बोचणी त्यांच्या चित्तास चैन पडूं देईना. आपल्या हातून पांडुरंगाची सेवा नीट घडली नसावी. तारुण्याच्या ऐन रंगांत आपण विठ्ठलास पार विसरून गेलों व म्हणून हीं संकटें आलीं असावीं असें त्यांच्या भाविक मनास वाटलें व प्रायश्चित्त म्हणून यापुढे संसारांतून आपलें लक्ष काढून आपलें सर्वस्व त्यांनी विठ्ठलास अर्पण करण्याचें ठरविलें. जर ईश्वरप्राप्ति करून घ्यावयाची असेल तर संसारांत लक्ष ठेवून भागणार नाही, हें तुकोबांच्या मनाने पक्कें घेतलें, व त्यांच्या तोंडून 'ठेविलें अनंतें तैसेंचि रहावें, चित्तीं असों द्यावें समाधान,' अशा तऱ्हेचे उद्गार बाहेर पडले. जें जें होतें तें ईश्वरेच्छेनेच होतें अशी त्यांची ठाम समजूत झाली. मनुष्यास जें धन व जो मान प्राप्त होतो तोहि प्रारब्धानेच-पूर्वसंचितानेच मिळतो यावर त्यांची अढळ श्रद्धा बसली. 'प्रारब्धेंचि जोडे धन, प्रारब्धेंचि वाढे मान,' फार काय 'प्रारब्धेंचि होय सुख, प्रारब्धेंचि पावें दुःख' असें ते म्हणूं लागले. याचें स्पष्टीकरणहि त्यांनी केलें आहे. "'केलें तें क्रियमाण । झालें तें संचित म्हण । प्रारब्ध जाण उरउरित । उरलें तें ।' व या संचितावर जी मनुष्याचें सुखदुःख अवलंबून असतें. जगांत 'एका विषमता दिसते, त्याला हेंच कारण आहे. 'एका ओझें एका लाभ घडे देवा, संचिताचा ठेवा वेगळाला.' त्याप्रमाणे 'बांधलें गांठी तें लागतें भोगावें,' म्हणून सुखाच्या पाठीमागे लागून जीवास व्यर्थ शिणवूं नका" असा त्यांचा उपदेश आहे. खरें सुख जसें ईश्वराने आपणांस ठेविलें असेल



त्यांतच आहे, यावर त्यांचा अढळ विश्वास होता. यावरून त्यांचा प्रारब्धवाद निराशामूलक आहे असें मात्र म्हणतां येणार नाही, हें त्यांच्या इतर वचनां-वरून सिद्ध होण्यासारखें आहे. कारण त्यांचा एकंदर कल हा पारमार्थिक उपदेशाकडे असून क्षणिक सुखापेक्षा चिरकालीन सुखाची जोड करून घेण्यास मनुष्याने झटावें असें त्यांना वाटतें. असो. तेव्हा तुकारामाचा हा प्रारब्धवाद त्यांच्या संसारावर येणाऱ्या संकटांतून उत्स्फूर्त झाला आहे, असें मानावयास हरकत नाही. पुढे पंढरीच्या भेटीसाठी तुकोबाच्या जीवाला तळमळ लागली. त्यांनी एकांत-वास पत्करला व एकट्या परमेश्वराकडे आपली दृष्टि वळविली. पुढे कांही दिवस परमेश्वरांनी तुकोबाची कसोटी पाहिली. पण 'सदा नामघोष करू हरिकथा । तेणें सदा चित्ता समाधान' यांत तुकोबांस समाधान वाटूं लागलें व पुढे ते नारायण-स्वरूप झाले. 'आपुलें मरण पाहिलें म्यां डोळा । तो जाला सोहळा अनुपम्य' व 'आम्ही जातों आमुच्या गांवां, आमुचा रामराम घ्यावा ।' असें म्हणत म्हणत ते सदेह वैकुंठास गेले.

रामदासांच्या चरित्राकडे पाहिलें तर असें दिसून येईल कीं, रामदासांचा जन्म ब्राह्मणकुळांत जांब येथे झाला. रामदासांचें मूळचें नांव नारायण. नारायणाच्या कुलांत रामोपासना मुळापासून होती. नारायणाचें बालपण चार मुलांप्रमाणेच खेळण्या-बागडण्यांत गेलें. त्याची बुद्धि तीव्र होती. पठण, गायन ह्यांत त्यांचीं बारा वर्षें गेलीं. वयाच्या पांचव्या वर्षी त्यांची मुंज झाली. त्यानंतर दोन वर्षांनीच त्यांचे वडील सूर्याजीपंत निवर्तले. वयाच्या आठव्या वर्षी नारायणास गांवाबाहेर असलेल्या मारुतीच्या देवळांत रामदर्शन होऊन अनुग्रह झाला. लहानपणापासूनच त्याचें लक्ष गृहकृत्याकडे नसे. राणूबाईला हें आवडेना. एकदा नारायण घरांतल्या अंधाऱ्या खोलींत जाऊन गुपचूप बसला. त्या नारा-यणास म्हणाल्या, 'अरे ! येथे काय करतोस ?' तेव्हा नारायण म्हणाला, 'आई, चिंता करितों विश्वाची !' मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात ते असे. हा मुलगा बाराव्या वर्षीच लग्नमंडपांतून साव-धान हा शब्द ऐकून समाजाला सावधान करण्या-साठी पळून गेला. पुढे तो नाशिकपंचवटीस येऊन राहिला. आता आपणाला ते रामदास म्हणवूं लागले. गोदावरीच्या पुण्यपावन परिसरांत स्वामींचीं १२ वर्षें गेलीं. ह्या काळांत त्यांनी आपल्या करुणाष्टकांतून, 'संसाराची ओढ माझ्या मनाला लागूं देऊं नको, मनःशुद्धि राखण्याची मला शक्ति दे, विवेकी बनव,' अशी आळवणी देवाला केली आहे. ईश्वराच्या भेटीची त्यांना ओढ लागली होती. म्हणून त्यांनी हा धांवा सुरू केला होता. गीता, भागवत, उपनिषदें इ० संस्कृत ग्रंथांचें अध्ययनहि त्यांनी येथेच केलें. त्याचप्रमाणे तीन गायत्री पुरश्चरणें व तेरा कोटी रामनामाचा जपहि केला.

लहानपणींच ही वृत्ति म्हणजे 'वयेंविण देवपिसें' लागलेलें पाहून नाशिकच्या लोकांस त्यांच्याबद्दल मोठें नवल वाटे. वयाच्या चोविसाव्या वर्षापर्यंत त्यांचें हें आध्यात्मिक जीवन जवळजवळ तुकोबां-सारखेंच होतें असें म्हणावयास हरकत नाही. पण तुकोबांप्रमाणे स्वामींनी संसार आपल्यामागे कधीच चिकटूं दिला नाही व म्हणून संसारांत अनुभवाला येणारीं दुःखें रामदासांच्या वाट्याला आलीं नाहीत.

तुकारामाप्रमाणे स्वामींनीहि बहुजनसमाजाला भक्तिमार्गाला लावून धर्मांतर करण्यापासून परावृत्त केलें. पण त्यांनी एक गोष्ट अधिक केली. ती म्हणजे त्यांनी भक्तिमार्गाला हरिकथानिरूपणानंतर राजकार-णाची जोड दिली. ही गोष्ट कै. न्या. रानडे यांनीं आपल्या 'The Rise of the Maratha Power' या ग्रंथांतील 'The Saints in Maharashtra' या भागांत सिद्ध केली आहे; व हाच तुकारामादि इतर संतांत व रामदासांत फरक आहे. दोघांच्या शिकवणुकींतील फरक सांगतांना रे. डेमिंग म्हणतात, "In this respect, the teaching of Ramdas does differ from that of Tukaram and the other Bhaktas."

समर्थांनी चार गोष्टींवर जास्त भर दिलेला आहे. ते म्हणतात—

मुख्य हरिकथा निरूपण । दुसरें तें राजकारण ।
तिसरें सावधपण । सर्वविषयीं ॥ चौथा अत्यंत साक्षेप ।

यांत त्यांच्या सर्व चळवळीचें व प्रयत्नवादाचें सार भरलेलें आहे हें विचारांतीं दिसून येईल. श्री. न. र. फाटक यांनी 'रामदास आणि तुकाराम' ह्या लेखांत दोघांची तुलना करतांना म्हटलें आहे कीं, तुलनेने जितक्या मानाने रामदास राजकारणी ठरतील, तितके तुकारामहि राजकारणी ठरतात. या विधानांत कांहीच तथ्य वाटत नाही. कारण तुकोबांच्या अभंगांतून राजकारण आलेलें नाही व जें थोडें असेल तें केवळ ओघानेच म्हटलें पाहिजे. इतक्याने ते राजकारणी संत होते हें म्हणणें चुकीचें आहे. दुसरें असें कीं, कांही टीकाकार रामदासांनी योजलेला 'राजकारण' हा शब्द 'चातुर्य' या आकुंचित अर्थाने आला आहे असें म्हणतात. परंतु यांतील वैयर्थ्य श्री. शं. श्री. देव, करंदीकर, प्रा. शं. दा. पेंडसे इ० विद्वान् समर्थवाङ्मयभक्तांनी साधार पटविलें आहे व तें सहज पटतेंहि.

समर्थांनी हरिकथानिरूपणानंतर आपल्या भक्तिमार्गाला राजकारणाची जोड दिली, असें करण्यांत त्यांच्या आयुष्यांत असें काय कारण विशेष घडलें? तर तपश्चर्येनंतर बारा वर्षें सबंध हिंदुस्थानभर केलेली तीर्थयात्रा हेंच तें कारण होय. तीर्थयात्रेच्या निमित्ताने या दीर्घ काळांत तत्कालीन हिंदु समाजाचें त्यांना सूक्ष्मपणें अवलोकन करतां आलें. त्यावेळीं यवनांचा अंमल जारी होता. स्त्रिया भ्रष्ट केल्या जात होत्या. विधर्मी व परकीय सत्तेमुळे देवळें पाडणें, मूर्तींची नासधूस करणें, बलात्काराने धर्मांतर करावयास लावणें इ० प्रकार सर्रास चालले होते. त्यांतच दुष्काळाने कहर उडविला. लोकांची अन्नान्न दशा झालेली, धान्याची लुटालूट चाललेली, तशांत ब्राह्मणांनी आचार व क्षत्रियांनी विचार सोडल्यामुळे लोकांची अधिकच दैन्यावस्था झाली. उच्च वर्ण यवनांच्या सेवेंत समाधान मानत होता. बुवाबाजीस ऊत आला होता. नास्तिकांचा सुळसुळाट व देवाधर्माविषयीं अनास्था दिसून येत होती. याचें वर्णन समर्थांनी 'अस्मानी सुलतानी' या प्रकरणांत चित्रित केलें आहे. ते म्हणतात—

पदार्थ मात्र तितुका गेला । नुस्ता देशचि उरला ।
येणें करिता बहुताला । संकट जालें ॥
माणसा खावया धान्य नाही । आंथरूण पांघरूण
तेंहि नाही ।

अशा तऱ्हेची परिस्थिति होती. 'कितेक अनाचारी पडून कितेक यातिभ्रष्ट झाली होती.' याबद्दल कै. प्रा. लिमये म्हणतात, 'Ramdas was an agitator in the higher sense of the term. It must have been his object to work up the feelings of the Maharashtrians, by narrating to them a heart-rending account of the suffering of the Hindus.'

हिंदु समाजाची वरील हीनदीन स्थिति पाहून समर्थांच्या अंतःकरणास धक्का बसला. पण ते त्यामुळे विरक्त बनले नाहीत. ही दुर्दशा नाहीशी करण्याचें सामर्थ्य त्यांच्यांत होतें. नुसत्या भक्तिमार्गाने—टाळकुटीने—राष्ट्राचा उद्धार होईल असें त्यांना वाटेना. यवनांच्या दीर्घ जाचाने बहुजनसमाज दुर्बळ बनून त्यांत कसलाहि आत्मविश्वास उरला नव्हता. हा देह नश्वर असून सर्व काळ ईशाचिंतनेंत घालवून आत्मोन्नति करून घ्यावी ही तुकारामादि संतांची वृत्ति रामदासाला त्यावेळीं मुळींच पटण्यासारखी नव्हती. अंधारांत खितपत पडलेल्या समाजाला जागृत करण्याचा मार्ग ते शोधूं लागले. आपल्या धर्माचा, समाजाचा, देशाचा, उद्धार होण्यासाठी स्वराज्याशिवाय दुसरा मार्ग नाही हें त्यांनी पूर्णपणें ओळखलें. त्याकरिता 'मराठा तितुका मेळवावा । महाराष्ट्रधर्म वाढवावा ।' असें सांगून त्यांनी लोकसंघटना करण्यास प्रारंभ केला.

त्याबरोबर भक्कम पायावर धर्मस्थापना करण्यासाठी त्यांनी तीर्थयात्रा करीत असतां ठिकठिकाणीं मठ स्थापिले. धर्मस्थापनेस स्वराज्य अगदीं आवश्यक आहे ही गोष्ट त्यांना लवकरच कळून आली. बहुजन समाजाचीं मनें स्वराज्यस्थापनेकडे खेंचलीं जावीं म्हणून त्यांनी आपल्या संप्रदायांत राजकारणाचा समावेश केला, व लोकांस त्यांचा विस्कटलेला प्रपंच नेटका करण्यास प्रवृत्त केलें. तसेंच त्यावेळीं उदयोन्मुख व प्रभावी अशा छत्रपति शिवाजीमहाराजांचें नेतृत्वच नव्हे तर गुरुत्वहि त्यांनी संपादिलें व आपल्या हातून होईल तितकी मदत केली. अशा रीतीने लोकांमध्ये नवचैतन्य निर्माण करण्याचें कार्य स्वामींनी केलें, व ज्यांचा आत्मविश्वास ढासळत आहे अशा समाजाला—

'सामर्थ्य आहे चळवळीचें । जो जो करील तयाचें ।'

त्याप्रमाणे

'केल्यानें होत आहे रे । आधीं केलेंचि पाहिजे ।
यत्न तो देव जाणावा । अंतरीं धरितां बरें ॥'

असा प्रवृत्तिपर उपदेश पटवून सांगितला, म्हणूनच कै. न. चिं. केळकर हे समर्थांना महाराष्ट्राचे मॅझिनी म्हणतात त्यांत आश्चर्य नाही. त्यांच्या प्रयत्नास ज्यावेळीं यश आलेलें त्यांनी पाहिलें. शिवाजीमहाराजांनी महाराष्ट्रांत स्वराज्य स्थापन केलें त्यावेळीं समर्थांचें अंतःकरण आनंदाने भरून आलें. त्यांच्या जीवनाचें सार्थक झाल्यासारखें त्यांना वाटलें. त्यांना त्यांचा राम मिळाला व त्यांच्या तोंडून—

'स्वधर्मा आड जें विघ्नें । तें तें सर्वत्र उठिलीं ।
लाटिलीं कुटिलीं देवें । दापिलीं कापिलीं बहु ॥
बुडाला औरंग्या पापी । म्लेंच्छ संहार जाहला ।
मोडिलीं मांडिलीं क्षेत्रें । आनंदवनभुवनीं ॥
मानसा प्रचीत आली । शब्दीं विश्वास वाटला ।
'कामना पुरती सर्वे । आनंदवनभुवनीं ॥'

असे उद्गार बाहेर पडून सिद्धदशा पूर्ण झाल्यासारखें त्यांना वाटलें व सुदैवाने हे दिवस पाहण्याचें भाग्यहि त्यांच्या आयुष्यांत त्यांना मिळालें. शिवाजीमहाराजांच्या मृत्यूनंतरहि संभाजीस योग्य तऱ्हेने कार्यप्रवृत्त करण्यासाठी त्यांनी जो उपदेश केला आहे त्यांत ते म्हणतात—

'अखंड सावधान असावें । दुश्चित कदापि नसावें'
तसेंच, 'बहुत लोक मेळवावें । एक विचारें भरावें ।
कष्ट करोनि घसरावें । म्लेंछावरी ॥
आहे तितुकें जतन करावें । पुढे आधीक मेळवावें
महाराष्ट्रराज्य करावें । जिकडे तिकडे ॥'



यावरून राजकारणाकडे ते किती दक्षतेनें लक्ष घालीत हें दिसतें. तसेंच त्यांचा यत्नवादहि ठिकठिकाणीं दिसतो. विशेषतः हें यत्नवादी तत्त्वज्ञान आपणांस ओव्या शतक बारावें ह्यांत उत्तम रीतीने दिसून येईल. दैववाद्यांचें म्हणणें व त्यावर उत्तर संवादरूपानें देऊन समर्थांनी प्रारब्धवादी लोकांचें म्हणणें खोडून काढलें आहे. ते म्हणतात 'होत नाहीं प्रेत्नें ऐसे काय आहे?' प्रयत्नानें काय साध्य होणार नाही? प्रारब्धवाद्यांच्या 'होणार तें कळेना कांहीं केल्या' ह्यावर समर्थांनी मोठें मार्मिक उत्तर दिलें आहे. ते म्हणतात दैवाने जर आपोआप जें मिळायचें तें मिळणार असेल तर खाण्यापिण्यासाठी तरी हातपाय कां हलवावे? यावर दैववादी प्रारब्धाकडे वळतो पण समर्थ प्रारब्धावर अंधश्रद्धा ठेवीत नाहीत. 'नाही नाही ऐसें त्वां तरी देखीलें । कपाळ वाचीले कोणेपरी'. त्याप्रमाणे 'आधीं जें निर्माण तेंचि थोर' अर्थात् बरें अगर वाईट, भाग्यदुर्भाग्य, सुदैवदुर्दैव याला कारण म्हणजे स्वतःचा प्रयत्नच होय. 'यत्नाचा लोक भाग्याचा । यत्नेंविण दरिद्रता ॥' असा त्यांच्या शिकवणुकींतील महत्त्वाचा धडा आहे. आपणास यश येत नसल्यास तें मिळण्यासाठी जो प्रयत्न आपण करितों त्यांत कांही चूक आहे, असें त्यांना वाटत असे. याचा अर्थ समर्थांचा प्रयत्न उगाच कांहीतरी करीत रहा असें सांगणारा नसून जें करावयाचें तें विवेकपूर्ण व योग्य करावयास लावणारा आहे. जें आपणांस मिळवावयाचें आहे त्याचीं साधनें आधीं निश्चित करा व मग प्रयत्न करा, म्हणजे हमखास त्यांत यश मिळेल असें त्यांचें आग्रहाने सांगणें होतें. ते सांगतात, 'अचूक यत्न तो देवो । चुकणें दैत्य जाणिजे ॥'. अशा रीतीनें सावधानतापूर्वक विवेकमूलक प्रयत्न ही यशाची गुरुकिल्ली आहे हें समर्थांच्या शिकवणीचें सार आहे. रा. रा. अळतेकर यांनी म्हटल्याप्रमाणे पारतंत्र्यांत पिचत पडून आपल्या सामर्थ्याची विस्मृति पडलेल्या आणि उद्धाराचा मार्ग न दिसल्याने हताश झालेल्या

जनतेला संघटनेच्या सामर्थ्याची जाणीव देऊन कर्तृत्वोन्मुख करणाऱ्या समर्थांइतका कट्टा यत्नवादी इतर साधुसंतांत दुसरा मिळेल कीं नाही याची शंकाच आहे.

मग तुकोबा जर याच काळांत होते, तर अशा तऱ्हेची विपन्नावस्था त्यांना दिसली नाही काय, असा प्रश्न साहजिकच उत्पन्न होतो. त्याला उत्तर असें आहे कीं, तुकोबानें रामदासाइतका प्रवास केला नव्हता. त्यामुळे रामदासाइतकें समाजस्थितीचें व देशाचें भयानक चित्र अवलोकन करण्याची त्यांना संधि मिळाली नसावी व दुसरें महत्त्वाचें म्हणजे तशी त्यांची वृत्तिच नव्हती. त्यांचें ध्येय एकमेव होतें. एका विठ्ठलाशिवाय त्यांनी दुसऱ्या कोणासहि प्राधान्य दिलेलें नाही. 'विठ्ठल विठ्ठल वाणी । अमृत हे संजीवनी '. हरिकथेच्या नामघोषानेच त्यांच्या चित्ताला समाधान मिळत होतें. त्यांनी शिवाजी राजाचीहि पर्वा केली नाही. शिवाजीनें आदरानें निमंत्रण पाठविलें असतां ' तुम्हापासी आम्हा येवो-नियां काय । वृथा भार आहे चालण्याचा ', ' मुंगी आणि राव । आम्हा सारखाचि भाव ॥ केवढी ही विरक्ति !

तुकोबांच्या अभंगांतून रामदासाप्रमाणे राजकारण आलें नाही, प्रवृत्तिवाद आला नाही, म्हणून तुकोबा रामदासापेक्षा कमी आहेत असें मुळीच होत नाही. 'जयाची वदे वेदवेदान्त वाणी । म्हणावें कसें ही तयालागि वाणी ॥' अशी वामनपंडितांनी त्यांची मुक्तकंठाने स्तुति गाईली आहे. त्यांनी आपल्या अभंगांच्याद्वारें समाजाला नीतिशास्त्राचें व भक्ति-मार्गाचें उत्तम शिक्षण दिलें आहे. तेव्हां दोघे आपा-पल्या परीनें श्रेष्ठ आहेत. दोघांनी आपल्या निवृत्ति-प्रवृत्तीच्या मधुर मीलनाने महाराष्ट्रसमाजास, देशास व धर्मास जागृत केलें.

———



आई —मन्या, गप्प बस, नाहींतर तोंडांत देईन.

मन्या —काय गोळी ?



# नको असलेलीं पत्रें !

लेखक : वा. ना. फेगडे, द्वितीय वर्ष, कलाविभाग.

नेहमीप्रमाणे आजहि दहा वाजण्याच्या सुमारास मी पोस्टमनची वाट पाहात होतों. आज नक्की वाटत होतं, मनाला रिझविणारं, आनंद देणारं असं एखादं तरी पत्र हमखास येईल. परंतु आशा ही कोणाचेच मनोरथ पूर्ण करीत नाही. जें आपण इच्छावं तें होईल असं क्वचितच् संभवतं !

आजहि तसंच झालं ! पोस्टमनने माझ्या नांवाने आलेलीं दोनचार पत्रें टाकलीं. पहिलं पत्र–एका मित्राचं ! —" मी फार अडचणींत आहें. परि-क्षेची फी भरावयाची आहे. दहा रुपये कमींतकमी पाठव. मी आभारी होईन. " वगैरे वगैरे. नेहमी आपलं ह्या मित्राचं हेंच रडगाणं ! दुसरं पत्र घर-मालकाचं ! " खोलीचं भाडं तुमच्याकडे राहिलं आहे. पाठवून द्या. " छट् ! काय हीं पत्रं !

अशा तऱ्हेचीं पत्रं येऊन दोन प्रकारचे तोटे ! एकतर मी ज्यांची—ज्या प्रकारच्या पत्रांची आशा करतों, तीं पत्रें मला मिळत नाहीत, अन् दुसरं म्हणजे अशीं पत्रं उगीच रडगाणीं ऐकवतात अन् काळजी पाठीमागे लावतात. आणि मग अशीं पत्रें पाठविणारांचा मनस्वी राग येतो व असं वाटतं पूर्वीची पद्धत बरी होती. अशा तऱ्हेचीं पत्रं निदान दररोज तरी मिळत नसावीं. कारण टपालाची सोय नसल्याकारणान एक पत्र पाठविणं म्हणजे बरंच खर्चाचं काम होत असावं ! अर्थातच खर्चापेक्षा ज्या पत्राचें महत्त्व जास्त तेंच पत्र पाठविलं जात असावं !

अशीं कोणतीं पत्रें पूर्वी पाठविलीं जात असावींत ? एकतर राजांनी राजांना पाठवावयाचीं पत्रें ! कारण त्यांचीं कामें—लढाईसंबंधीचीं अथवा करारमदारा-संबंधीचीं— जास्त महत्त्वाचीं ! आणि म्हणूनच एक टपाल्या हा राजाजवळ असावयाचाच !

दुसरीं पत्रें म्हणजे प्रेमपत्रें ! अशीं पत्रें हीं कितीहि खर्च आला तरी पाठविणारा त्याला अर्थातच् मानीत नसावा. परंतु आज टपालाची सोय अवघ्या तीन पैशांत झाल्यामुळे जो तो आपला पत्र खरडतो अन् मग नको असलेलीं, बुरसट विचारांचीं पत्रें एखाद्या झाडाखाली पडणाऱ्या पाचोळ्याप्रमाणे जमा होतात.

नको असलेलीं पत्रें हीं आषाढाच्या पावसा-प्रमाणे असतात. जशा आषाढांत पावसाच्या सरीवर सरी बरसतात त्याप्रमाणे ह्या पत्रांचा वर्षाव ! परंतु हव्या असलेल्या पत्रांचा मात्र स्वाति नक्षत्रां-तील पावसाप्रमाणे ध्यास घ्यावा लागतो. इतकें करूनहि तीं आलीं तरच नवल !

जीं पत्रें मला हवींशीं वाटतात तींच दुसऱ्यांनाहि आवडतील असेंहि नाही. मला नको असलेलीं पत्रें जेव्हा मी माझ्या कांही मित्रांना दाखवितों तेव्हा तीं त्यांना खूप आवडतात. माझा एक मित्र आहे ! व्यापारी आहे तो ! माझ्या पत्रांतून मला नको असलेले बाजारभाव आले तर त्याला फार आनंद होतो व नेहमी माझ्या मुंबईच्या मित्राच्या पत्राची तो मोठ्या आपुलकीने चौकशी करतो. पण मला तें पत्र नको असतें ! माझ्या बालमित्रांना निराळींच पत्रें आवडतात तर तरुण मित्रांना निराळींच ! एकूण व्यक्ति तितक्या प्रकृति हेंच खरं !

हें पत्रांच्याच बाबतींत घडतं असं नाही ! आपल्याला ज्या गोष्टी घडूं नयेत असं वाटतं त्याच

नेमक्या घडून येतात. ज्या संधीची आपण उत्सुकतेने वाट पाहतों ती चुकून आपल्याजवळ येणार नाही ! नको असलेले 'चान्स' मिळतील ! नको असलेलीं माणसं आपल्याजवळ जमा होतील ! पण हव्या असलेल्या गोष्टी मात्र क्वचितच् लाभतात.

आणि असं आहे म्हणूनच मनुष्य प्रयत्नवादी राहिला आहे ! आपण इच्छिल्याबरोबर जर कल्पतरूप्रमाणे प्रत्येक गोष्ट आपल्याला मिळाली असती तर मनुष्य हा प्रयत्नाच्या मागे लागलाच नसता ! सर्व कांही मनाप्रमाणे कष्टाशिवाय मिळत असल्यावर कोण महामूर्ख उगीच आटापिटा करीत बसेल ! परंतु तसं घडत नाही हेंच एका दृष्टीने बरं आहे.

शिवाय प्रयत्नाशिवाय, खटपटीशिवाय ज्या गोष्टी आपल्याला लाभल्या असत्या त्या तितक्या आनंददायक झाल्या नसत्या ! अनायासें प्राप्त झालेल्या वस्तूंचं मूल्य हें कमी झालं असतं व त्यापासून आत्म्याला लाभणारं समाधानहि मिळालं नसतं !

हा विचार जेव्हा मनांत येतो तेव्हा असं वाटायला लागतं. आपण ज्या पत्रांचा कंटाळा करतों, जीं आपल्याला नकोशीं वाटतात, तीं जर आलीं नसतीं तर हव्या असलेल्या पत्रांची किंमत कमी झाली असती. त्यापासून मिळणारा आनंद आज जितका मिळतो तितका मिळाला नसता ! आठ दहा मुलींच्या घोळक्यांत ज्याप्रमाणं एखादी जास्याच सुंदर असलेली मुलगी अधिक सुंदर वा आकर्षक वाटते त्याप्रमाणेच नको असलेल्या पत्रांतील हें हवं असलेलं पत्र अधिक आनंददायक वाटतं आणि हव्या असलेल्या पत्राबरोबरच ह्या नको असलेल्या पत्रांचाहि मी सानंद स्वीकार करतों !!

— —

※ " एका पुरुषानं एकच बायको केली पाहिजे असा कायदा होणार म्हणे. पण माझ्या पूर्वीच्या दोन बायका आहेत. तेव्हां कायद्याचा मला त्रास तर होणार नाही ना ?"

" जवळ असलेला साठा कळवला म्हणजे झालं. "

* * *

※ **पत्नी**— पाहातेंय मी ! हल्ली तुमचं माझ्यावरचं प्रेमच कमी व्हायला लागलंय् ! पूर्वी कसे दररोज वेणी आणून देत होता नि आता पंधरा दिवस झाले तरी——

**प्रो. विसरभोळे**— आं ? म्हणजे तुला नव्हतों देत वेणी ? मग कुणाला बरं देत होतों रोज ?

* * *

※ कैद्यांच्या मनरंजनासाठी एकदा एका होतकरू गायिकेचें गाणें करण्यांत आलें. दुसऱ्या दिवशीं सर्व कैद्यांनी जेलरकडे तक्रार केली कीं आम्हांला दिलेल्या शिक्षेंत या गाण्याचा अन्तर्भाव केला नव्हता.

* * *



# मिठाचें आत्मवृत्त

लेखिका : कु. विमल लेले, द्वितीय वर्ष, कलाविभाग

ह्या विसाव्या शतकांत कोणत्या वस्तूला केव्हां किती महत्त्व येईल हें सांगावयाला नको. एखादी वस्तु नाहीशी झाली किंवा दुर्मिळ झाली कीं तिचें महत्त्व जास्त पटतें. म्हटलेंच आहे कीं, 'The way to love anything is to realize that it might be lost.' (G. K. Chesterton. )

कांही दिवसांपूर्वी खुर्दा मिळेनासा झाला होता. नंतर आगपेटी, रॉकेल, जळाऊ लाकडें, साखर इत्यादि वस्तू दुर्लभ झाल्या होत्या व त्या त्या वस्तूंनी आपलें महत्त्व पटवून दिलें. आतां साखर मिळेनाशी झाली. तेव्हा लोकांनी आता 'मीठ मिळणार नाही, मीठ काळ्या बाजारांत जाणार' अशी अफवा उठविली. लागलीच मिठाचे भाव कडाडले. एक वेळ साखर मिळाली नाही तर तिच्याऐवजी ( Substitute म्हणून ) गूळ, मध, सॅक्रिनच्या गोळ्या इत्यादि गोड पदार्थ वापरून काम भागवतां येतें. चहाची तलफ असलेले लोकसुद्धा दुधाची तहान ताकावर भागवण्याप्रमाणे साखरेच्या चहाची तहान गुळाच्या अगर सॅक्रिनच्या गोळ्यांच्या चहावर भागवूं शकतात. पण मिठासारखी वस्तु दुष्प्राप्य झाल्यास दुसऱ्या कोणत्याच गोष्टीचा आश्रय घेणें दुर्लभ व अशक्य आहे. साखरेसाठी लोकांची रांग लागली तर तिला 'मुंग्यासारखी' अशी उपमा देतां येईल. पण मिठासाठी अशी रांग लागली तर — तर काय उपमा द्यावयाची, हें तुम्हीच ठरवा.

जसजशी एकेक वस्तु नाहीशी होत गेली तसतसे तिला काव्यांत व लेखांत महत्त्व येऊं लागलें. लेखकांना लेख, लघुकथा, लघुनिबंध लिहिण्यास नवीन विषय मिळाला व मला अहोरात्र मिठाविषयींचे विचार त्रास देऊं लागले व ह्या सर्वांचा परिणाम म्हणजे रात्रीं स्वप्न पडलें. मीठ मिळालें नाही तर— ! छे. ही कल्पनाच भीतिदायक वाटते. मीठ— — मीठ— मीठ ! त्या दिवशीं माझ्या मनांत सारखें 'मीठ' घोळत होतें.

रात्रीं आगपेटी, रॉकेल, साखर, मीठ इत्यादि एकेकदा दुष्प्राप्य झालेल्या वस्तूंची मोठी जंगी सभा भरली होती, त्यांत मिठाने आपलें महात्म्य किती आहे तें सांगावयास सुरवात केली. मीठ म्हणालें,

" जेवणाच्या पानावर डाव्या बाजूच्या टोकाचा लहानसा कोपरा पकडण्यापलीकडे मला फारसें मानाचें स्थान नाही आणि लोकांनी आपल्या विचारांमध्ये तर तेवढीहि जागा मला दिली नसेल. परंतु १९३० सालीं मार्चच्या १८ तारखेला महात्मा गांधी दांडीला निघाले आणि ते कशासाठी ? तर मिठाचा कायदा मोडण्यासाठी ! झालें. महात्मा गांधी, मीठसत्याग्रह, 'निमक का कायदा' ह्याबद्दलच्या विचारांनी, माहितीने व चर्चेने सबंध हिंदुस्थान दणाणून गेला. मिठामध्ये एवढी गुपित स्फोटकशक्ति असेल हें त्यावेळपर्यन्त कोणाच्या लक्षांतहि आलें नसेल. आमच्या ( मिठाच्या ) ह्या स्फोटकशक्तीपुढे एक मोठें सरकार डळमळतें कीं काय असेंहि कांहीना वाटत होतें. त्यावेळीं सर्वतोमुखीं मीठ मीठ मीठ हा एकच शब्द ! एवढें अनपेक्षित भाग्य फार थोड्या वस्तूंच्या नशिबीं आलें असेल. १९३० सालानंतर १९४७ एप्रिलच्या पहिल्या तारखेस हिंदी लोकांना मीठ-स्वातंत्र्य मिळालें आहे, त्यामुळें माझें हें भाषण अस्थानीं होणार नाही. 'नावडतीचें मीठ अळणी' ह्या म्हणींत उपरोधाचें

उत्तम उदाहरण आहे. बोटींतून किंवा विमानांतून दुर्दैवाने समुद्रांत पडल्यावर प्रवासी जिवंत राहिल्यास त्याला तहान लागते. तेव्हा एक सुखद विचार त्याच्या मनाला चाटून जातो. 'खारट पाण्यांतील मीठ अळणी असतें तर !' रासायनिक दृष्टया मी क्लोरिन व सोडियम ह्या दोन मूलतत्त्वांपासून झालों. गंमत म्हणजे, हीं दोन मूल तत्त्वें स्वतंत्रपणें अत्यंत विषारी व मनुष्याच्या शरिराला घातुक आहेत. पण संयोगीकरणानंतर हा व्यक्तिगत विषारी गुण नाहीसा होतो. कपडे धुण्याचा सोडा, साबणाचा तीव्र सोडा, जंतुनाशक क्लोरिन वायु, ब्लीचिंग पावडर वगैरे महत्त्वाच्या वस्तु निर्माण करण्यासाठी लाखो खंडी मीठ खपतें आहे. समुद्र हेंच सर्वांचें माहेरघर आहे, असा एक सिद्धान्त आहे. आपली ही निर्मिति समुद्रापासून होते. प्रत्येकाच्या रक्तांत दोन तोळे तरी मीठ असतें. या दृष्टीने पाहतां सर्व प्राणी आपल्या शरिरामध्यें खारट अशा रक्ताचा सांठा म्हणजे एक लालवर्णी समुद्रच बाळगतो हें मात्र नाकबूल करतां येणार नाही. शरिरांतून घामावाटे पुष्कळ मीठ जातें. मेहनतीचीं कामें करणारे लोक कामानंतर गूळ पाणी पितात, कारण गुळांत थोड्या प्रमाणांत मीठ असतें, व म्हणूनच गूळ रुचकर लागतो. नुसतें पाणी प्याल्यास 'नको हा जीव' असें होतें. गूळपाण्याऐवजी साखर-पाणी पिऊन समाधान होत नाही. हा नेहमीचा अनुभव आहे. गेल्या महायुद्धांत अमेरिकन शिपाई ब्रह्मदेशांत आले तेव्हा त्यांना नेहमीच्या सैनिकी खाद्यांबरोबर चघळण्यासाठी चांगल्या रुचकर स्वादिष्ट अशा मिठाच्या गोळ्या देत. मिठांत अन्यद्रव्यें मिसळून स्वाद व रुचि आणलेली असे.

आबिसिनिआ, तिबेट या देशांत मिठाच्या वड्या नाणीं म्हणून वापरत. पुरातन काळीं स्वीडनमध्ये देहान्त शिक्षा देण्याचे दोन प्रकार असत. फांसावर लटकवणें किंवा मिठाशिवाय फक्त एक महिना तुरुंगांत ठेवणें. पहिलीच्या मानाने दुसरी सौम्य दिसत असली तरी वस्तुस्थिति अगदी उलट ! मीठ तोडलेले कैदी महिन्याच्या आंत तडफडून, वैतागून, असह्य वेदनांनी हैराण होऊन शेवटीं मृत्यूला बळी पडत. म्हणून कांही कैदी मरण्याचा मार्ग सुखाचा म्हणून फांसावर जाण्यास तयार होत. एखाद्या शहराला वेढा देऊन त्या शहराचें मीठ तोडलें तर तें शहर शरण यावयास कितीसा वेळ ? गरिबाला चैनीच्या वस्तु स्वप्नांतहि मिळणें अशक्य म्हणूनच तो आपल्याला मीठ-भाकरी मिळाली तरी धन्य समजतो. कारण जीवनाला आवश्यक असणाऱ्या वस्तूंची ही तळपायरी आहे. पिठांत मीठ पडलें तर रुचीची माधुरी वाढते म्हणून ही उपमा त्याला समर्पक वाटते. दुधांत साखर पडली तर किंवा सुवर्णाच्या कोंदणांत हिरा बसवला तर काय होईल हें त्याला काय माहित ?

म्हणूनच मध्य एशियांतील देशांमध्ये मीठ देणाऱ्या माणसाचे उपकार फार मानीत. 'खाल्लेल्या मिठाला जागणें' हें कृतज्ञपणाचें लक्षण होतें. मिठाचे उपकार विसरणारा कृतघ्न किंवा 'निमकहराम' समजला जात असे. ज्या गोष्टीला महत्त्व द्यावयाचें नसतें किंवा दाद द्यावयाची नसते त्या गोष्टीला लोक 'मीठ घालीत' नाहीत.

'अलिबाबा व चाळीस चोर', या गोष्टींत चतुर मार्ग्यानेने चोरांचा नायक तेव्हाच ओळखला कारण त्याने आपण मीठ वर्ज्य केल्याचें सांगितलें होतें.

ज्या घरचें मीठ खावयाचें त्या घरच्या माणसाशीं बेइमान होतां येत नाही यावरूनहि माझी योग्यता लोकांनी किती ओळखली हें समजण्यासारखें आहे.

फार कशाला ! मी मिळत नाहीं अशी नुसती अफवा पसरतांच त्या सरकारी दुकानांत माझ्यासाठीं लागलेल्या रांगांकडे नजर टाका आणि त्यावरून माझी योग्यता ठरवा."

मिठाचें भाषण संपलें आणि सर्वांनी पसंतीदर्शक टाळ्यांचा कडकडाट केला. टाळी वाजविण्यासाठी मींहि हात उचलला तोंच एकदम हाताला कांहीतरी लागून हाताच्या झिणझिण्या झाल्या—

आणि मी जागी झालें, अन् पाहातें तों मी माझ्या खोलींतच होतें आणि कॉटच्या कठड्याला हात लागून हाताला झिणझिण्या आल्या होत्या.

———



# निरंकुशाः

लेखक : त्रिंबक कानवदेकर, द्वितीय वर्ष, कला विभाग

[ टीप— सहज वाचतां वाचतां, 'निरंकुशाः कवयः ।' ही ओळ डोळ्यापुढे आली अन् त्या ओळींचा चालू धकाधकीच्या 'हुकुमशाही' मामल्यांत फोलपणा दिसून आला नी त्यावेळीं मनःचक्षूंपुढे जीं चित्रें तरंगलीं तीं नाट्यछटात्मक स्वरूपांत रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. ]

— १ —

" पण...... "

" पण बिण कांही नाही. सांगितलें ना तुम्हांला ? कसलीही गचाळ कविता करायची अन् संपादकाच्या उरावर आणून प्रसिद्ध करा, म्हणून सांगायला कांही वाटत नाही! जरा, लिहिल्यानंतर वाचतां तरी कांहो आपण ? म्हणे ही माझी निर्यमक कविता आहे ! मुक्तछंद आहे ! अगदीच मोकाट छंद दिसतोय तुमचा; अन् मनाचं तारूहि बरंच मोकाट सोडलेलं आहे या कवितेंत. अलम् महाराष्ट्रांतील आम दुनिया आमचें हें 'दारुबंदी प्रचार मासिक' वाचते अन् त्यांत ह्या असल्या कविता ! वा ! वा !! पिऊनच लिहितां कीं काय तुम्ही ? अन् हें 'रमावल्लभ', हें काय नांव वाटतं तुमचं ! माफ करा ! राईच्या वल्लभा ! वेळ नाही. आपल्या कविता छापूं शकत नाही. "

" पण साहेब येवढी तर कविता— "

" कोण आहे रे तिकडे. यांना... "

" नको ! नको ! साहेब जातों मी. "

— २ —

" साहेब रजा पाहिजे होती. "

" मागल्याच महिन्यांत दिली होती ना तुम्हांला ? तेव्हा म्हणे माझी बायको आजारी आहे ! आज काय आहे...असं चालणार नाही...सांगून ठेवतों. एकतर मुकाट्यानं ऑफिसचं वर्क पाहा, नाहीतर सरळ राजिनामा द्या. हें काय आहे ! दर पाळीला मला अमुक होत आहे नी माझें तमुक माणूस अत्यंत आजारी आहे ! कॅज्युअल लीव्हसुद्धा संपली तुमची. मि. ढवळे, I have no time. आपलं काम करा ! नाहीतर सरळ घरचा रस्ता सुधारा. ऑफिस पैसे देत आहे. चांगले एटी सिक्स प्लस ट्वेंटी फाइव्ह रुपीज् टिच्चून घेतां ना दर महिन्याला; फुकट राबवून घेत नाही तुम्हांला. जरी मी पुष्कळ कन्सेशन्स देत असलों तरी मी फार स्ट्रिक्ट आहें. असलं खपायचं नाही मला, सांगून ठेवतों ! "

" पण सर— "

" Get-out. "

— ३ —

" धनी, लई टायम झाला पगा, कारखारीन अन् पोरंटोरं वाट परहात असतील जनुं "

" पुरें कर बडबड ! माहीत आहे मला. तुम्ही नोकर लोक फार बेताल झाला आहांत अलीकडे. रात्रीचे आठ नाही वाजत तों चालले घरीं....त्या वकिलाकडे जाऊन आलास का ? कां नाही गेलास ? म्हणे...बाईसाहेबांनी काम सांगितलं. मग तेवढं

आटोपून लवकर गेला असतास तर पाय झिजले नसते तुझे. असा संताप येतो. चाबकाने फोडून काढावं असं वाटतं लेकाला. मला माहिती आहे, रात्रीचे नऊ वाजतां त्या तमाशाच्या थेटराजवळ काय 'गस्त' असते का रे तुझी ?...... थांब. आज जायचें नाहीं घरीं. आज त्या लाहोरच्या रेडिओ स्टार ××× जानचें गाणें व्हायचें आहे आपल्या घरीं. अन् हा दिवाणखाना झाडणं, बिछाईत टाकणं, कपबशा धुणं, ह्याला बोलाव, त्याला बोलाव, हीं कामं काय तुझा बाप करील ?"

—४—

"अरे पण मोहन, जास्त बोललोंच नाही मी तिच्याशीं."

"आणखी काय जास्त बोलायचं राहिलं ? म्हणे ऽऽ माझं प्रेम जडलंय् ! अरे तूं लाख प्रेम करशील पण तिचं तरी तुझ्यासारख्या काळ्या फत्तरावर प्रेम बसायला हवंय् ना ! प्रेम म्हणजे काय 'काळा बाजार' वाटला ? खरोखर मूर्ख आहेस. म्हणे Love at first sight; पहिल्या दृष्टींत मार डाला. वारे रोमिओ, चिरिओ ऽऽ चिरिओ ! प्रेम म्हणजे काय बाजारांतली भाजी वाटली तुला ? तिला रस्त्यांत जाऊन सांगितलंस् 'माझं प्रेम जडलय् तुमच्यावर.' कां ? कां ? कां मारणार नाही ती चपलेन तुला ? अरे बाबा ! जमाना पालटला आहे. हल्ली स्त्रियांना भाव आला आहे. आजच्या जमान्यांत स्त्रियांच्या हातांत व्हेटो पॉवर्स आहेत. म्हणूनच तुमच्यासारख्या लाळघोटूंचे अर्ज नामंजूर होत आहेत. कळलं ?"

—५—

"मोन्या ऽऽ !" ×××× लेका कुठ गेला होतास ? बोलतो कीं नाही ? कां दातखीळ बसली वाटतं तुझी ? बोल ...... खेळायला गेलों होतों, शारीरिक शिक्षण परिषदेच्या मॅचेस होत्या. शरम नाही वाटत सांगायला ? अन् हा अभ्यास पडलाय् तो कोण करणार ? कोठे आहे प्रोग्रेस बुक...... अभ्यास-बरा-म्हणजे चांगला कीं वाईट ? नंबर १८. एकूण मुलें छत्तीस. वारे गुरुजी ! अन् वा ऽ रे शिष्य ! सकाळीं पहावं तर कारटा पुस्तकाचं नांव काढील तर शप्पथ ! नुसता शो. बापाजीचे पैसे मिळतात. दुपारीं आम्हांला ऑफिस, मग तुम्ही शाळेंत जातां कीं, रिकामे गांवांत भटकतां राम जाणे !

......अन् म्हणे मुलांना घोकंपट्टी नको. त्यांना बेसिक एज्युकेशन द्या. दगड करा अन् फत्तर करा. ह्यांच्या बापाजीचें काय जातें ऽऽ ? इथे कोणाच्या खिशाला चाट बसतेय हें कुणाला समजतं ? चालले लेकाचे सुधारणा करायला ! इथे शब्दाचें स्पेलिंग पाहायचं असलं तर डिक्शनरी पाहावी लागते चिरंजीवाना. जा ऽऽ ! जा ऽऽ ! वाकडं तोंड करून काय पाहातोस ? अभ्यास कर ! अन् करा तोंड काळं ! माहिती आहे काय दिवे पाजळणार आहेस ते."

---

सद्‌गृहस्थ—काय हो, मुलांच्या फोटोग्राफला काय घेणार ?
फोटोग्राफर—डझनाला पांच रुपये.
सद्‌गृहस्थ—मग सध्यां नाही जमायचं. मला दहाच मुलं आहेत.

*    *    *



# आजचा शेजारधर्म

लेखिका : कु. गोदू लेले, द्वितीय वर्ष, कलाविभाग.

आजच्या काळांत प्रामुख्याने अडचण जर कशाची भासत असेल तर ती जागा मिळण्याची. आज प्रत्येक शहरांत जागेकारिता कोण धडपड करावी लागते, व इतक्या धडपडीनंतरहि जी जागा आपल्याला मिळते, ती स्वतंत्रच असेल असें कांही निश्चितपणें सांगतां येणार नाहीं. कदाचित् पोटभाडेकरू म्हणून एका खोलींतहि आपल्या संसाराचा पसारा आटोपशीर रीतीने मांडावा लागेल. तेव्हा अशा स्थितींत पदोपदीं शेजाऱ्यांशीं संबंध येणार. तेव्हा शेजारधर्माचें उल्लंघन झालें तर मला वाटतें, आपण धडपणें कोठेहि राहूं शकणार नाही. तेव्हा आजच्या काळांत जे कांही प्रश्न प्रामुख्याने भेडसावीत आहेत, त्यांपैकीच शेजारधर्माचा एक आहे, असें म्हटल्यास फारसें वावगें होईल असें वाटत नाही.

पूर्वीचा रानटी अवस्थेंतील मानव व हल्लीचा समाजांत राहणारा मानव ह्या दोघांच्याहि वागणुकींत बरीच तफावत दिसते व ह्याचें एकच कारण व तें म्हणजे हल्लीच्या मानवाची समाजांत राहून तयार झालेली मनोवृत्ति हेंच होय, व ह्या प्रकारच्या तयार झालेल्या मनोवृत्तींतूनच शेजारधर्माचा प्रश्न उद्भवतो.

ज्याप्रमाणे हक्काला कर्तव्याची बाजू आहे, त्याचप्रमाणे शेजारधर्म ही चीजसुद्धा एकांगी नसून तिला दोन बाजू आहेत. शेजारधर्म हा एकाचकडून पाळला जात नसून, तो दोन्ही बाजूंकडून समानतेने व समजुतदारपणें पाळला गेला पाहिजे—आचरणांत आणला गेला पाहिजे. मानव हा कांही सर्वगुणसंपन्न असतोच असें नाही. त्यामुळे त्याला निरनिराळ्या प्रकारच्या अनेक अडचणी असतात. तेव्हा कोणत्याहि आपद्ग्रस्त माणसाला, मग तो गांवांतला, गल्लींतला अगर कुठलाहि असला तरी मदत करणें हें आपलें कर्तव्य आहे. मग शेजाऱ्याची काय कथा ! पण ह्याच वेळेस जर त्याच्याशीं वाकडें असलें तर सर्वच प्रश्न आटोपतो. तेव्हा समाजांतील एक घटक या नात्याने शेजारधर्माचें पालन करण्याची प्रत्येकाची जबाबदारी आहे.

जर आपण सहानुभूतिपूर्वक मदत केली किंवा बोललों तर आपल्या संकटकालीं, आपणांस कोणी मदत करील. परंतु त्या वेळेस हाहि विचार असावा कीं एखादा माणूस मदत करतो तेव्हा तीहि योग्य त्या प्रमाणांत घ्यावी. नाहीतर 'भटाला दिली ओसरी, भट हातपाय पसरी' अशांतली गत व्हायची. केव्हा केव्हा आपणांस अशींहि उदाहरणें दिसतात, कीं शेजारी चांगला म्हणून त्याच्याकडे पाण्याच्या भांड्यापासून तें चांदीच्या ताटापर्यंत सर्व वस्तु मागायला म्हणून लोक येतात. कांही कांही क्षुल्लक वस्तुहि घरांत नसाव्यात ही अगदी लाजिरवाणी गोष्ट आहे. बरें, नेलेल्या वस्तु वेळेवर परत करायचें तर नांवच नाही. अशा रीतीने शेजाऱ्याच्या चांगुलपणाचा अवास्तव फायदा घेऊन, कांही कांही लोक आपआपसांत निष्कारण वैर उत्पन्न करतात. तेव्हा चांगुलपणाचा अवास्तव फायदा न घेतां शेजारधर्माचें पालन करणें हें जास्त श्रेयस्कर ठरेल. ह्याच्या उलट कांही अगदी उत्तम शेजाऱ्यांचींहि उदाहरणें देतां येतील. कांही मोठ्या चाळींतून अनेक भाडेकरू राहात असतात. पण ह्या चाळींत अनेक सुसंस्कृत माणसें असलीं, तर हे अनेक भाडेकरीसुद्धा सलोख्याने राहूं शकतात. अशा चाळींतून दुपारीं एकएकट्या राहणाऱ्या स्त्रिया

एकत्र येऊन निरनिराळ्या कलांचा आस्वाद घेऊं शकतात, निरनिराळे कार्यक्रम सांघिक रीतीने करूं शकतात. घरांतील कांही कामें अशीं असतात कीं तीं एकत्रित रीतीने केल्यास अधिक सोयीस्कर होऊं शकतात. तेव्हा अशासारखीं (उन्हाळ्यांतील) कामें करून हें संघटन वाढूं शकतें. दुपारच्या रिकाम्या वेळांत एकमेकांच्या उचापती काढून भांडणें करण्यापेक्षा, एकत्रित येऊन निरनिराळीं संसारोपयोगी कामें करून, तो वेळ सत्कारणीं लावणें इष्ट आहे, किंवा ह्या फावल्या वेळांत सहकारी तत्त्वावर संस्था चालवून त्यांत रोज व्यवहारांत लागणाऱ्या वस्तु, भरतकाम, विणकामाच्या वस्तु निर्माण कराव्यात. वर वर्णन केल्याप्रमाणे आदर्श शेजारी आजच्या सुधारलेल्या जगांत सुद्धा बोटावर मोजण्याइतकेच आहेत ही मोठी दुःखद गोष्ट आहे. ह्यावरून हल्ली स्त्रिया सुशिक्षित असूनसुद्धा पूर्वीच्या अशिक्षित स्त्रियांपेक्षा त्यांचीं मनें जास्त सुसंस्कृत झालीं आहेत, असें म्हणण्यास मन थोडेंसें तरी कचरतें. कारण अद्याप त्या आपली 'कूपमंडुक' वृत्ति सोडून बाहेर येऊन समाजांत मिसळून वागण्यास तयारच होत नाहीत, व त्यामुळे आपल्या हिंदु स्त्रियांपेक्षा इतर जातीचा शेजार जास्त मानवतो. कारण त्या लोकांना वेळेची किंमत असते, कलेची अभिरुचि व सोशिक वृत्ति असते. या उलट अद्यापहि आपल्या ह्या शिक्षित समाजांत पावलोगणिक भांडणें दिसून येतात व ह्यामुळे अजून समाजांत समष्टिजीवनाचा अभावच दृष्टोत्पत्तीस येतो.

त्याचप्रमाणे शेजारधर्माचें पालन फक्त स्त्रियांवरच अवलंबून आहे असें नाही. परन्तु आजहि आपल्या समाजांत कांही कांही ठिकाणीं ही दृष्टि दिसून येते. स्त्रियांना सदोदित घरांत राहावयाचें असल्यामुळे त्यांचा शेजाऱ्यांशीं जास्त संबंध येतो व म्हणून त्यांनी शेजारधर्माबद्दल जागृत राहिलें पाहिजे हें जरी खरें असलें तरी, पुरुषांना ही जबाबदारी अजिबात टाळतां येते असें नाही, तर ह्या बाबतींत पुरुषवर्गाने सुद्धा जास्त दक्षता बाळगली पाहिजे. कारण ज्या ठिकाणीं पुरुषांचें वाकडें असेल, त्या ठिकाणीं त्या घरांतील स्त्रीला सलोख्याचे संबंध ठेवणें जड जातें.

ह्या सर्व दृष्टीने विचार केल्यास आपणांस असें म्हणतां येईल कीं आजच्या काळांत घराला लागून असलेलाच शेजार, एवढा संकुचित अर्थ सोडून देऊन, प्रत्येक स्त्री-पुरुषाने, सगळें शहर तो शेजार, सगळें राष्ट्र तो शेजार ह्या विशाल दृष्टिकोनांतून शेजारधर्माकडे पाहणें आवश्यक आहे; व ह्या दृष्टिकोनांतूनच निरनिराळे विधायक कार्यक्रम आंखून सर्व समाजांत हीच दृष्टि निर्माण केली पाहिजे. तेव्हाच आजच्या आणीबाणीच्या व क्षोभदायक कालांत शेजारधर्माचें योग्य तें परिपालन होऊन समाजाला व राष्ट्राला त्याचा सदुपयोग होईल.

———

✗ डॉक्टरसाहेब आपल्या दोस्ताला वेड्याचें इस्पितळ दाखवीत होते.

एका खोलींत एक गृहस्थ रडत बसला होता. त्याच्याकडे बोट दाखवून डॉक्टर म्हणाले, "ह्याच्या प्रेयसीनें याला नकार दिला म्हणून याला वेड लागलं."

आणखी थोडें पुढे गेल्यावर दुसऱ्या खोलींत एक वेडा आपलें डोकें भिंतीवर आपटत होता. त्याच्याकडे बोट दाखवून ते म्हणाले, "आणि त्या नकार दिलेल्या प्रेयसीनें यांच्याशी लग्न केलं."

* * *



# आधी 'मानव' व्हावें आणि मग 'लेखक'

लेखक : प्र. ल. पाठक, प्रथम वर्ष, कलाविभाग

आजकाल 'लेखकां' चें पोळेंच फुटलें आहे असें म्हणतात. पण मग त्यांत काणेकरांनी म्हटल्याप्रमाणे रक्ताने लिहिणारे असे किती असतात ? बोटावर मोजण्याइतकेसुद्धा नाहीत. अच्युतराव कोल्हटकरांनी म्हटल्याप्रमाणे आजच्या वाङ्मयसेवकाची स्थिति हाडूकबहादर काडीपैलवानासारखी झालेली आहे. अगदी मनापासून लिहिलेले असे फारच थोडे लेख आढळतात. कारण बहुतेक सर्वांना "फोटो मासिक पुस्तकांत अमुचा ..." असें म्हणण्याची सुवर्ण-संधि मिळाली कीं, अस्मान ठेंगणें वाटतें.

अशी जर आज साहित्यांत स्थिति झालेली आढळते तर वाङ्मयांत जीवनाचें खरेंखुरें प्रतिबिंब पडणार कसें ? म्हणूनच "जीवनविरहित वाङ्मय म्हणजे वंचितांचा विरंगुळा" असें जें म्हणतात तें सार्थ वाटतें. वाङ्मयनिर्मिती कांही एका विशिष्ट ध्येयपूर्तिस्तव असते हेंच कांही कलावंतांना मान्य नाही. पण "कलेकरिता कला" हें खूळ बोकाळलें आहे. पण असें जर आहे तर मग उच्च दर्जाचें वाङ्मय निर्माण व्हावयास पाहिजे, पण तें होत नाही.

माणुसकीला व समाजाला धरून जातिवंत लेखक लिहीत असतो. त्याला नुसते समाजावर व चालू परिस्थितीवर कोरडे ओढून भागत नाही, तर आपल्या लिखणाचा समाजावर कांही परिणाम झाला आहे असें दिसतांच समाजाला पुढील मार्गदर्शन करण्याची जबाबदारी त्यांजवर येऊन पडते. पण ती जबाबदारी घेण्यास किंवा आपल्या लेखनशैलीच्या जोरावर समाजाला आपल्याकडे खेंचून घेण्यासचमुळी आयुष्यसुद्धा घालवावें लागतें, व तेव्हाच तो मनाने खराखुरा 'मानव' बनतो.

या दृष्टीने पाहतां मराठी वाङ्मय कांही अगदीच बेवारशी नाही. समाजाचा कल कोणीकडे झुकतो आहे हें बरोबर ओळखून हरिभाऊ आपट्यांसारख्या लेखकांनी सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या. तसेंच शिवरामपंत परांजप्यांच्याहि लेखनाचा परिणाम सहजतेने महाराष्ट्रीय मनावर व्हावयाला लागला. आपली जबाबदारी ओळखून त्यांनी सतत दहा वर्षे आपल्या लेखणीच्या जोरावर आपल्या वाचकांना विचार-छायेंत, वर्धमान उत्साहाने डुंबत ठेविलें. प्रतिकूल परिस्थितींत, जागरुक इंग्रज सरकारच्यासमोर बिनधोकपणाने आणि सफाईने स्वातंत्र्याचा पुरस्कार केला, व निर्भेळ स्वातंत्र्याच्या प्रचाराचें लोण महाराष्ट्राच्या मैदानावर सर्वांसमक्ष आणून पोहोंचविलें. त्यांच्याप्रमाणे इतरहि अनेक लेखक आहेत.

समाजाला योग्य असें लिहिण्यास व समाजाला त्याप्रमाणे वागावयाला लावण्यास अनुभूति भरपूर पाहिजे. कारण "अनुभूतीशिवाय सहानुभूति नाही." व ही अनुभूति मिळविण्यांतच जवळजवळ सर्व आयुष्य जातें. इब्सेनचें प्रसिद्ध "Dalls House" हें नाटक त्यानें वयाच्या ४९ व्या वर्षीं लिहिलें व त्यानें त्याच्या वयाच्या ७१ व्या वर्षी रंगभूमि पाहिली. अखिल

नाट्यसृष्टि बदलवून टाकण्यासाठी इब्सेनला ५० वर्षें पर्यन्त माणूस म्हणून राहावें लागलें व मग त्याच्यांतील "मानव लेखक" जागृत झाला.

पण अशा लेखकांचे पाय मागे ओढावयाला समाजच कारणीभूत होतो. पतंगाच्या दोऱ्याप्रमाणे समाज मनुष्याला वर जाऊं देत नाही. आज आपणाला वाटतें कीं मानवाने पंचमहाभूतांवर ताण केली. नाना प्रकारचे शास्त्रीय शोध लावून मानवजात सुखाचा कळस गांठण्याचा प्रयत्न करीत आहे. पण आज जर आपण प्रत्येक मनुष्याचें मन तपासून पाहिलें तर त्यांत आपणाला " What man has made of man ? " हाच एक प्रश्न दिसतो. मानवाची आजची हीन—नव्हे क्षुद्र—मनोवृत्ति पाहिली म्हणजे " ते केन जानीमहे " अशी स्थिति होऊन जाते. बंगालच्या दुष्काळांत अन्नाच्या अभावीं शाकाहारी लोकांनासुद्धा माणसाचें मांस खाण्याची पाळी कोणीं आणिली ? माणसाची येवढी अधोगति माणसानेच केली. आपल्या क्षुद्र व स्वार्थी मनोवृत्तीने, शंकेखोरपणाने व अविश्वासाने मनुष्य हा मनुष्याचा शत्रु होऊन बसला आहे. आजचीं महायुद्धें म्हणजे मानवाच्या असुरी बुद्धीचें एक प्रतीकच आहे. पूर्वीसुद्धा यापेक्षाहि भयंकर महायुद्धें झालीं. पण तीं सर्वांच्या कल्याणासाठी, सज्जनांच्या रक्षणासाठी व " हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जितो वा भोक्ष्यसे महीम् " या हेतूने. पण आज ? आजचीं युद्धें व्यापारी पेठा जिंकण्यासाठी, अणुबॉंबचा ताबा मिळविण्यासाठी, किंबहुना स्वतःच्या राष्ट्राशिवाय सर्व पृथ्वीचा विध्वंस करण्याच्या असुरीबुद्धीने लढविलीं जात आहेत. मानवाने निसर्गावर मात केली. पण निसर्ग घटकांत असणारी एकी त्याच्यांत नाही. मानवाइतकी स्वार्थबुद्धि पशुपक्षांतहि दिसून येत नाही. त्यांच्यांतसुद्धा " काक आह्वयते काकान् " पण मानवांत मात्र " याचको न तु याचकान् " अशी स्थिति आढळते. पण आपण मात्र दैवाच्या नांवाने खडे फोडतों. शास्त्रीय शोधांच्या जोरावर मानवजातीच्या कल्याणाचा उच्चांक गांठण्याच्या गप्पा मारतों, वैद्यकशास्त्रावर दीर्घायुष्याचे इमले उभारतों, व इकडे आपला स्वार्थ साधण्यासाठी दुसऱ्यावर विषप्रयोग करतो; आणि आपल्या मनाला रिझविण्यासाठी नानाप्रकारचीं अनन्वित कृत्यें करतों. आज अपहृत झालेल्या स्त्रियांचीं भग्न हृदयें आपणाला एकच प्रश्न विचारीत आहेत, आणि तो म्हणजे, " मनुष्य हा मनुष्याचा मित्र आहे काय?"

इतकी अधोगती झालेली आहे मानवाची. मानवाला नैतिक मूल्यें शिकविणें हेंच एक आज मोठें कार्य आहे. सर्व समाजाची घडी विस्कळित झालेली आहे म्हणूनच आज आपणांला खरेखुरे " मानव लेखक " हवेत. पाशवी सत्तेने सर्व मानवजातीला त्राहि भगवन् करून सोडलें असतां समाजाला आज ' रामशास्त्री ' नकोत. पण आज ' रामदास, ज्ञानेश्वर, गॅलिलियो ' सारखे खंबीर लेखक हवेत. आजच्या सुधारलेल्या जगांत राजसत्तेप्रमाणेच साहित्यसुद्धा बहुशः लोकाधीन झालेलें आहे. राष्ट्राच्या जीवनांत, भाषा व वाङ्मय यांना परिमहत्त्वाचें स्थान असतें. देशाच्या प्रगतीचें व परिस्थितीचें, वाङ्मय हें एक प्रभावी शस्त्र आहे. मानवाच्या प्रगतिपथावर ध्रुव ताऱ्याप्रमाणे असणारीं जीवनाचीं चिरंतन मूल्यें (Standards) आणि सत्यें हीं साहित्याने दिलेलीं लेणीं आहेत. कोणत्याहि स्वतंत्र राष्ट्राला सैन्यापेक्षा साहित्याची आज जास्त जरुरी आहे. कारण सैन्याने फार तर जिवंत राष्ट्राचें रक्षण होईल, पण मृतप्राय राष्ट्राला जिवंत करणें व त्याला दीर्घकालपर्यंत जिवंत ठेवणें हें काम फक्त साहित्यच करूं शकतें. उज्जवल परंपरा जिवंत राखून शौर्य व धर्म जनतेच्या अंगीं बाणण्यास तोफा व बॉंबपेक्षा साहित्यच उपयोगी पडतें. ब्रिटिश बेटांचें स्वातंत्र्यसंरक्षण २५ मैल रुंदीच्या खाडीमुळे नेल्सन व वेलिंग्टनच्या लढाऊ परंपरेमुळे झालें असेल. पण ज्याचें रक्षण करावयाचें त्या स्वातंत्र्याची ज्योत तेवत ठेवण्याचें काम बेकन, शेक्सपियर, शेले, शॉ, इ० साहित्यप्रभूंच्या सामर्थ्यामुळेच झालें आहे. हिंदी राष्ट्राचा स्वाभिमान व स्वातंत्र्यप्रेम जिवंत राहावयाला कारण म्हणजे पेशव्यांची लढाऊ परंपरा नसून व्यास, वाल्मिकी, कालिदास, भवभूति इ०चें अमर साहित्य व सामर्थ्यवान् शिकवणूकच आहे. त्यांचें वाङ्मय आपल्या रोमरोमांत भिनलें आहे. त्या उज्ज्वल परंपरेची आम्हांला आठवण आहे.



आपल्या लेखकांची ही उज्ज्वल परंपरा आपण पुढे चालविली पाहिजे. जीवन व तत्त्वज्ञान यांचा मेळ घालून, श्रद्धेचें नवें वातावरण पसरवून, पाशवी वृत्ति नाहीशी करून प्रीतीचा व्यापक दृष्टिकोन पुनरपि प्रस्थापित करणारे ज्ञानेश्वर, तुकाराम, टागोर, गांधी यांसारखे अमर साहित्यिक हवेत. साहित्य हें दुधारी शस्त्र आहे त्यामुळे समाजाचें संघटन व विघटनहि होऊं शकतें, व तें शस्त्र साहित्यिकांच्या हातांत आहे. अर्थात् समाज साहित्यिकांकडून संघटनेचीच अपेक्षा करणार, म्हणूनच विजेचें बटन दाबून दिवे लावणाऱ्यापेक्षा आज " ठिणगी पाडून दिवे लावणारे " लेखक—मानवलेखक समाजाला पाहिजेत.




प्रोफेसर ( स्त्री सल्लागारास )—आपल्या शारीरिक न्यूनावर विजय मिळविण्यासाठीं पहिली गोष्ट करावयाची म्हणजे घरांतील सर्व आरसे फोडून टाका.

# साप्ताहिक भविष्य

लेखक : पां. प. टोणगांवकर, द्वितीय वर्ष, कलाविभाग

"अरे हेमन्, आज धनुर्धारी नाही आणलास ?" मीं आणलेल्या सामानाची उचकाउचक करीत काकांनी एकदम विचारलें. मलाहि त्यांची थोडी थट्टाच करायची होती. म्हणून मीं विचारलें, " दर आठवड्याला कशाला लागतो हो काका तुम्हांला धनुर्धारी ? एकदा पाहून नाही का समजत तुमचं भविष्य ? कसा विश्वास बसतो त्यावर तुमचा कुणास ठाऊक ? तो ज्योतिषी कांही तरी लांब लांब गप्पा मारतो अन् तुम्ही लोक त्याच्यावर विश्वास ठेवता झालं ! अहो, असं भविष्य कधी खरं झालय् ?"

" छे ! तुम्ही आजकालचीं पोरं म्हणजे अगदीच नास्तिक बनलांत ! थांब, तुला पुरावाच देतों म्हणजे तर झालें. " काकांनी आपलें वेदवाक्य उच्चारलें आणि घाईघाईने घरांत जाऊन त्यांनी एक अंक आणला. " हं ! ऐक आता मेष राशीचं भविष्य; संततीचा लाभ. " हें ऐकून तर डोक्यावर बॉम्बचा स्फोट व्हावा तसा दचकून उठलों मी. "अहो काका... " मीं म्हटलें. कारण काकांचें कुटुंब वारल्याला दोन वर्षें झालीं होतीं, आणि काकांनी कधीहि आपल्या मुलाचं तोंड पाहिलं नव्हतं. कारण त्यांना मुलगाच नव्हता. काका पुढे वाचूं लागले, " सत्कृत्यें घडतील. ब्राह्मणभोजन घालाल. " आपण हें सगळं स्वप्नांत ऐकतों आहोंत की काय असा मला भास झाला. कारण काका म्हणजे नंबर एकचे चिक्कू. त्यांचा चिक्कूपणा पाहून एखाद्या मारवाड्यानेहि लाजेने मान खाली घातली असती.

" असा बावळटासारखा बघतोस काय ? " काकांच्या ह्या शब्दांनी मी पुन्हा भानावर आलों, " अरे हें पाहा, आपली मनी मांजर नाही का व्याली मागल्या आठवड्यांत ? दुसरं, तुझ्या काकूचें श्राद्धहि मागल्याच आठवड्यांत केलं. ते काशीला जाणारे यात्रेकरू ते देखील मागल्याच आठवड्यांत आपल्याकडे येऊन गेलेले नाही का ! " आता काकांचें माझ्या डोक्यांत लख्ख उजेड पडला. काकांचें भविष्य आणि त्यांचें तें स्पष्टीकरण ऐकून मी तर अगदी गारच झालों. भविष्यावर त्यांचा इतका विश्वास असेल अशी कल्पनाहि कधी मला शिवली नव्हती. कुठला संबंध कुठे नेऊन जोडला होता काकांनी ! ' उदारचरितानां तु वसुधैव कुटुम्बकम् ' ही म्हण काकांच्या बाबतींत तरी शंभर टक्के लागू झाली असती.

असल्या तऱ्हेच्या भविष्यावर विश्वास ठेवणाऱ्या लोकांचा मला एकप्रकारें हेवाच वाटतो म्हणाना. कांहीहि होवो; यांना आपली फिकीर ती कशी नाहीच. आकाशांतील ग्रह करतील तें प्रमाण ! तशीच किती निष्काळजी आणि बेफिकिरी जीवन ! तशीच यांची एकप्रकारें कींवहि कराविशी वाटते. येवढ्या तेवढ्या कामासाठी देखील बिचारे आकाशांतील ग्रहांकडे नजर लावून बसतील. कोट्यावधि अंतरावर असणारे ग्रह आणि त्यांच्या चित्रविचित्र गति यांच्या फेऱ्यांत आपलें नशिबहि संपूर्णपणें गोतें खात असलें पाहिजे अशी यांची ठाम समजूत दिसते. एरवी यांचा भविष्यावर इतका दृढ विश्वास असण्याचें काय कारण ?

पण यांना इतकेंहि ठाऊक नसतें कीं बिचारे ठिपक्यायेवढे दिसणारे ग्रह देखील स्वतःच शनीच्या फेऱ्यांत असतात. एका ठराविक नियमानुसारच त्यांनाहि आपली गति ठेवावी लागते. अशाप्रकारें स्वतः ग्रहदशेंत असणारे हे ग्रह दुसऱ्यावर कसा अंमल चालवणार, व त्यांच्या मर्जीनुसार माणसाचें भाग्यचक्रहि कसें फिरतें या कोड्याचा उलगडा मला अद्याप पावेतों झालेला नाही.



पूर्वी राजेलोकदेखील मुहूर्त पाहून महत्त्वाच्या कामावर निघत म्हणे. मला वाटतें ज्योतिष्यांचा ग्रहच त्यांच्या पाठीमागे लागल्यामुळे त्यांना कदाचित् तसें करावें लागत असेल. स्वारीवर निघतांनाच एका विधवेचें तोंड दिसलें म्हणूनच आपल्याला पानिपतच्या युद्धांत अपयश आलें असें प्रसिद्ध मुत्सद्दी नाना फडणवीस म्हणतो. ही गोष्ट अतिशयोक्त जरी असली तरी तत्कालीन समाजावर असल्या गोष्टींचा पगडा किती जोरदार बसला होता याची थोडीशी जाणीव होते.

असल्या भविष्यामुळे नेहमी तोटेच होतात असं मात्र नाही. त्याचे कित्येक फायदेहि आहेतच. परवाच माझ्या पाहण्यांत एक गंमतीदार उदाहरण आलें. भविष्यावर गाढ विश्वास असणाऱ्या एका सद्गृहस्थाच्या मुलाने आपलें लग्न आपल्या पसंतीच्या एका मुलीशीं ठरविलें. अर्थात् हें त्याच्या वडिलांना पसंत न पडून त्यांनी त्याला घराबाहेर हाकलून देण्याची धमकी दिली. तेव्हा मुलगा काय करतो बिचारा ? गप्प बसला. कांही दिवसांनी त्याच्याकडे एक ज्योतिषी आला. त्याने मुलाची आणि मुलीची पत्रिका पाहून सांगितलें कीं "या दोन्ही पत्रिका तंतोतंत जुळतात आणि ह्या मुलीचें तुमच्या मुलाशीं लग्न न कराल तर तुमच्या घरांत शनीच्या प्रभावाने एक मृत्यु घडण्याचा संभव आहे. " हें ऐकतांच त्या गृहस्थाचें धाबें दणाणलें आणि त्यांनी आपल्या मुलाची मनीषा पुरी केली. हा सर्व प्रकार कशामुळे घडला असावा असें तुम्हांस वाटतें ? अहो, ज्योतिषी मुलानेच आपल्या वडिलांकडे पाठविला होता. पण फी मात्र पांच रुपये घेतली हां बेट्याने ! आहे कीं नाही गंमत ! असा भविष्याचा फायदा होणार असेल तर मला वाटतं आजकालचीं सगळीं मुलं आपल्या वडिलांकडे ज्योतिषी पाठवून आपलें लग्न हव्या त्या मुलीशीं जुळवून घेतील.

एकंदरींत विचार करतांना आपणांस असें आढळून येईल कीं फलज्योतिष शास्त्राला कुठल्याहि तत्त्वाचा आधार नाही. पुष्कळदां आपणांस असें आढळून येतें कीं साप्ताहिकांतील भविष्य अगदीच सर्वसामान्य दर्जाचें असतें. उदा. 'गृहकलह होतील.' आडवड्यांतून एकदा तरी नवरा–बायकोचें भांडण हें व्हायचेंच. आठवड्यांतून एखाद्या तरी कार्ट्याला ताप नाहीतर खोकला यायचाच आणि यालाच आमचे ज्योतिषी महाशय ' संततीस त्रास ' म्हणून नांव देतात. 'ता. १, २, ३,...द्रव्यलाभ'. बरोबरच आहे. त्याच दिवशीं बहुधा सर्वांचे पगार होतात. "२९, ३०, ३१ या तारखांना आर्थिक अडचण व चणचण भासेल. " कारण याच दिवशीं बहुदा सर्व पगार खलास होऊन खिशांत कपर्दिकहि राहात नाही. 'कित्येकांना संततिलाभ' गरोदर स्त्रियांना योग्य काळीं मुलं झालीं तर त्यांत आश्चर्य तें कसलें ? एखाद्या आठवड्यांत लग्नतिथि असली म्हणजे आमचे ज्योतिषी महाशय–'वधुवरांचीं लग्नें होतील' असें भविष्य डोळे झाकून ठोकून देतात. आतां आपणांस असें आढळून येईल कीं लाखों लोकांच्या राशीचें हें भविष्य असतें आणि त्यांपैकी कित्येकांच्या इथे तें खरें ठरणारच. कारण ह्या अगदी सर्वसामान्य गोष्टी असतात. तेव्हां ज्योतिषशास्त्र यांत नवीन असें काय सांगतें हेंच मला समजत नाही.

"अरे मी काय म्हणतोंय् तें ऐकलस् का ? हें बघ, पंजाब मेलला भीषण अपघात. १२ ठार १५ अत्यवस्थ. मागल्याच आठवड्यांत 'प्रवास टाळा, अपघात भय' म्हणून सांगितलं होतंना ? " यावर मी काकांना कांही म्हणणार इतक्यांत माझ्या पाठीवर टपकन् कांही तरी पडलें. मागे वळून बघतों तों नीला समोर खिडकींत उभी राहून माझ्याकडे बघून हंसत होती. तिला बघतांच काकांना त्यांच्या भविष्याबरोबर सोडून देऊन मी बाहेर पळालों.

"अन् तुम्ही आजकालचीं तरुण पोरं म्हणजे..." काका म्हणत होते.

नाट्यछटा

# “ कसे तरी दिवस काढायचेय् झालं ”

लेखक : मधुकर वि. वैद्य, द्वितीय वर्ष, कलाविभाग

ओ ! हो ! कोण ? – पंत या ... या ... अलभ्य लाभ ! ... अलभ्य ... नमस्कार पंत ... या ! आज इकड कुठ पायधूळ झाडलीत् ... यावं यावं ... वा ! छान ... असं कुठ झालंय ... इथ वर बसा कीं खुर्चीवर ... हो ! आम्ही कुठले मोठे ! नुसतं नांव मोठं न् लक्षण खोटं ! ... अहो म्हणतात ना — ‘ बड्या घरचा पोकळ वासा ’ ... अस्सं आहे पाहा ! ... अहो बसा कीं ... हां बरं कसं काय चाललंय् पंत तुमचं? ठीक ना सर्व ... छान ! छान ! ...

— हं काय म्हणतेय् दिवाळी ... छे ! ... आज नुसती होळी करायचीच वेळ आलीय् ... आता तेवढंच राहलय् हातांत ... अहो कसची दिवाळी न् कसचं काय् ... सर्वंच ठीक आहे झालं न् काय ... अरे हो ! बाळू ऽऽ ... अरे बाळ्या ऽऽ ... अरे पंतांना कांही पाणी वगैरे आणशील कीं नाही ... आता हेंच पाहा ना ... चहा द्यायची आपली नेहमीची पद्धत ... पण आता ती सुद्धा पंचाईत ... करतां काय ! ... अहो साखरच नाही घरांत ... मग चहा कुठला ... अहो माझंच पाहा ना आता ... मला चहाची इतकी संवय ना ... पण मी सुद्धा आता तीन वेळचा चहा दोन वेळेवर आणलाय् ... अहो करता काय् ... असा त्रासलों पाहा या महागाईला ... अहो परवा गेलों जरा बाजारांत ! म्हटलं पाहूं या साखर मिळाली तर ! ... आणि म्हटलं चहाचाहि एक डबा घेऊन जाऊं ... पण कसचं काय हो ! कांही विचारूं नका बुवा ! ... अहो काय सांगूं पंत ! शेवटीं तीन रुपयाप्रमाणे साखर खरेदी केली न् काय ! ... आणि भाव बघतो चहाचा तर काय ... कॉफीच्या डब्याइतका ! ... अबब ! ... आता काय करावें म्हटलं ... शेवटीं कसा तरी कॉफीचाच डबा विकत घेतला ... काय करावं कांही सुचत नाही ... कसे तरी आपले दिवस काढायचे झालंय् न काय ! ... चहाचं काम कॉफीवरच आपलं भागवायचं ... अहो उपाय नाही हो दुसरा ! ... अश्शी ही महागाई ... मी तर अगदीच हैराण झालों बुवा या महागाईला ! ... अहो ! ... आपण जगतों हीच कृपा ईश्वराची ! ... काय म्हणतां पंत ‘ तुमचं ठीक आहे ! ’ ... भले ! अहो आताच सांगितलं ना अहो विष खायला सुद्धा नाही पैसा ! ... कांही विचारूं नका बुवा ! हातांत राहातच नाही मुळी पैसा ! ... आताच पाहाना दिवाळी ... आणि कोठे पूर्वीची दिवाळी ... ती रोषणाई ... आणि कुठ ही ... छे ! छे ! ... हें आठवलं कीं वाटतं ... “ ते हि नो दिवसा गताः ’ ... ! अहो घरीं आलेल्या माणसाला सुद्धा फराळ देण्याची पंचाईत ... तुमचंच पाहाना रोजच्या बैठकींतलं तुम्ही ! ... पण करतां काय ... इलाजच नाहीं ! ... कसे तरी दिवस जात आहेत् झालं ! ... अहो मी त्या — दुकानांत गेलों ... डालडा डबा विचारला ... पण तिथ नाही ... ! दुसरीकड गेलों ... तिथहि नाही ... पुढे गेलों तिथहि तीच गत ! ... सर्व दुकानं हिंडलों. परंतु डालडा नाही ... म्हटलं आता काय करायचं ! ... दिवाळी कशी जाणार ! ...



शेवटीं मोठ्या मुष्किलीन दोन तीन शेर गावरानीच तूप घेतलं झालं ... छे छे ! बुवा ... अगदी डोकं फिरून जायची वेळ आली ... काय ही महागाई ! ... काय कराव तरी काय माणसान ! ... जगावं कीं मरावं ! ... त्रासलों या महागाईन बुवा अगदी ! ... अहो तशीच गोष्ट पर्वांची सांगतों तुम्हांला ... मुलांचे कपडे अजिबात फाटले म्हणून म्हटलं चला थोडा कपडा खरेदी करूं ! ... मुलांनाहि होईल थोडा नि स्वतःला म्हटलं थंडीचा एखादा सूट वगैरे पाहूं ... पण काय ! कपड्याचा भाव तर सर्वांच्याहि वर ताण ... ! ... आणि त्यांतून तें काळ्याबाजाराचं भूत ! ... सर्वंच बदललंय् झालं ... जिकडे पाहावं तिकड महागाई हंसतेय् खद्‌खदा ! ... काय विचारतां ... छे छे बुवा ! ... हैराण झालों ... ! अहो कपडा पाहिला ... तर काय सिल्कचा कपडा नि आपला साधा कपडा ... अहो बरोबरच भाव ! ... अहो कशाला ! एकच म्हणाना ... मला तर कपडा घेतल्याशिवाय उपायच नव्हता ! ... म्हटलं हा साधा कपडा खरेदी करणार तर सिल्कचाच भाव, मग त्यापेक्षा सिल्कचाच घेतलेला काय वाईट ! ... आणि शेवटीं अगदी नाईलाजान सिल्कचाच खरेदी केला लहान तागा एक ! ... हो ! करतां काय ! ... अहो कसे तरी कपडे घालून दिवस काढायचे ! ... कसं तरी जगायचं ... तसंच पातळं बघितलीं बाजारांत तर काय डोकं फिरलं अगदी म्हणे ... २० रु. व ३० रुपये ! ... अहो मग वायलच काय काय वाईट...कशीतरी तीच खरेदी केली मंडळीकरिता ! ... करतां काय त्याशिवाय .. ! ... कपडा सुद्धा भरपूर मिळत नाही ! ... राहावं तरी कसं माणसान ... मी तर पीडलों या महागाईन ... फारच त्रासलों ! ... फारच हैराण झालों ! ... डोक फिरण्याची वेळ आलीय् ! ... काय भयंकर ही महागाई ! ... मरण बरं !! ... आणि त्यांतल्या त्यांत आपल्यासारखा मध्यम वर्ग तर फार दाबला गेला ... ! ... हें जीवन कसं तरी घालवायचं ... बस्स ! एवढं माहीत आपल्याला ! ... बाहेर पाहिलं कीं, नको ते भाव, नको ती खरेदी ... !! अस्स होऊन जातं बघा ... पण त्याला आपला नाइलाज आहे ! ... अहो ! ... कसं तरी पोट भरून ... कसं तरी कपडालत्ता वापरून दिवस काढायचे ...!! छे ! छे ! नको तो विचार ! अगदी तापून जातं डोकं !! ... वेडा होण्याची भीति वाटते ! ... राहयचं तरी कसं आम्हीं ! ... काय ही महागाई !! ... कमाल झाली महागाईची ! ... छे ! छे ! कसे तरी दिवस काढायचे !! ... कसे तरी दिवस कंठायचे !! ... त्रासलों !! ...

# दूरस्थ मातेस—

आई तुला स्मरुनि लोचनिं नीर वाही
मूर्ती तुझीच मग मी बघतों मनीं ही
सारेंहि सौख्य गमतें तुजवीण फोल
जीवास ना गमत वैभव तें अमोल.

आई तुझ्याविण जिणें गमतें वृथा गे
आई तुझे चरण वंदिन मी कदा गे
आई तुझ्याविण प्रमोद बहूत दूर
आई तुला स्मरुनि होत विपण्ण ऊर

कैलास जो मज तुवां उपदेश आई
चित्तीं स्मरोनि मन हाय विषण्ण होई
नाहीं कधी सुखविलें तुज मीं कृतींनी
होती व्यथा किति मनीं असल्या स्मृतींनी

जेव्हा तुझे चरण वंदिन मी पुन्हा गे
तेव्हाच तप्त मन होइल शांत वेगें

दि. ना. दैठणकर
द्वितीय वर्ष, कलाविभाग



# ग्रामीण उद्योगधंदे

लेखक : गो. उ. शिम्पी, सी. बी. ए., जळगांव.

आजच्या यांत्रिक युगांतील राष्ट्रांकडे पाहिल्या-नंतर ग्रामीण उद्योगधंदे आपल्या राष्ट्रांत जोपासले पाहिजेत, वाढविले पाहिजेत असं म्हणणारांचं खरंच पुष्कळांना हसूं येतं ! " कुठे वीज आणि मोठ-मोठीं यंत्रें यांच्या साहाय्याने अत्यंत मोठ्या प्रमाणांत चाललेलें उत्पादन नि कुठे आमच्या खेडुतांच्या झोपडींतला चरखा नि तेलाचा घाणा किंवा हातमाग ?" असं म्हणून ग्रामीण उद्योगधंदे जोपासले पाहिजेत असं म्हणणारांना ते मूर्खांत गणूं बघतात. पण खरोखरीच का ते मूर्ख आहेत ? थोडासा विचार केल्यानंतर ते मूर्ख नाहीत असंच आपणांला वाटायला लागेल. कसं तें बघूं या !

## ग्रामीण उद्योगधंदे म्हणजे काय ?

लहान प्रमाणावर किरकोळ अवजारांच्या साहा-य्याने चालविलेले लहान लहान उत्पादक धंदे म्हणजेच ग्रामीण उद्योगधंदे ! या धंद्यांत साधारणतः घरांतील कर्ती माणसें, स्त्रिया, मुलें आणि जरूर पडल्यास एकाद दुसरा मजूर एवढीच उत्पादन करणारांची संख्या ! उदाहरणादाखल खेड्यांतील तेलाची घाणी घेऊं या ! घाणी, बैल, घाणी चालविण्यासाठी घाणी हाकणारा, व त्याच्या मदतीस त्याची पत्नी ! या-व्यातिरिक्त त्यांना दुसऱ्या माणसाची जरूर नसते. हातमागाचा धंदा सुद्धा त्याचप्रमाणे आहे. सूत कातण्याची ( अथवा गिरणीचें आयतें सूत सुद्धा हल्ली उपयोगांत आणतात ) सूत उकलण्याची वगैरे सर्व क्रिया स्त्रिया करतात ! माग चालविणारा कापड विणतो ! असल्या प्रकारचे जे कांही उद्योग-धंदे आहेत ते ग्रामीण उद्योगधंदे होत ! दोरखंड विणणें, गालिचे-सतरंज्या विणणें, टोपल्या तयार करणें असे अनेक उद्योगधंदे अद्याप खेड्यापाड्यांतून या यांत्रिक युगांत चालू आहेत. लहान लहान यंत्रांच्या साहाय्याने चालविलेले उद्योगधंदे सुद्धा यांतच मोडतील.

## ग्रामीण उद्योगधंद्यांचें वर्गीकरण

(१) शेतकऱ्यांना नित्योपयोगी वस्तूंचें उत्पादन करणारे उद्योगधंदे– या उद्योगधंद्यांत दोरखंड तयार करणें, टोपल्या विणणें, शेतीचीं अवजारें तयार करणें हे उद्योगधंदे मोडतात.

(२) खेड्याची सर्वसाधारण गरज भागविणारे उद्योगधंदे— यांत कापड विणणें, तेलाचा घाणा, कुंभारकाम, लोहारकाम, सुतारकाम हे उद्योगधंदे येतील.

(३) खेड्याबाहेर, शहरांत अथवा अन्य ठिकाणीं चाललेले उद्योगधंदे — या उद्योगधंद्यांत तयार होणारा माल साधारणतः अन्य प्रांतांत अथवा देशांत प्रसिद्धि पावलेला असतो. उदा. गालिचे तयार करणें, तांब्या–पितळेचीं भांडीं तयार करणें, दागिने नक्षी वगैरे धातूवरील कोरीव काम करणें हे उद्योगधंदे या वर्गांत समावेश केले पाहिजेत.

(४) लहान यंत्रांच्या साहाय्यांनी चाललेले उद्योगधंदे — पाश्चात्य राष्ट्रांत सुद्धा या उद्योग-धंद्यांना अद्याप स्थान आहे. तें म्हणजे गवत कापणें ( यंत्राच्या साहाय्याने ) वगैरे.

## ग्रामीण उद्योगधंद्यांपासून फायदे

**(१) मजुरांना अथवा कारागिरांना काम:—**

मोठ्या प्रमाणावरील यांत्रिक उत्पादन हिंद-मधील हंगामी बेकारीचा प्रश्न सोडवूं शकत नाही. आपला

हिंद मुख्यतः शेतकीप्रधान देश आहे. शेतीचें काम कांही वर्षभर पुरत नाही. आणि शेतीकामाचा पांच-सहा महिन्यांचा काळ सोडला तर राहिलेले सहा-सात महिने मजूर अगदी रिकामा असतो. शेतकऱ्यास फार तर आणखी एकदोन महिने वेळ मिळत नाही. तरी पण सर्वसाधारण चार महिने तरी सर्व मजूर व शेतकरी रिकामे असतात, आणि या रिकाम्या काळांतील या सर्व लोकांचें कसब फुकट जातें, आणि या रिकाम्या वेळेचा दुरुपयोग केला जातो. या रिकाम्या वेळांतील कांही रिकामटेकडे उद्योग म्हणजे कोर्टकचेरीच्या कामांत वाढ, लग्न जुळविण्याच्या कामांत प्रवासाची वाढ, संध्याकाळीं गांवाबाहेर चकाट्या पिटीत असतांना विड्या, पान, चहाचा चुराडा करायचा व निरर्थक खर्च वाढवायचा. या काळांत काम नसल्यामुळे उत्पन्न कांहीच नसतें व वरील प्रकारचा निरर्थक खर्च वाढतच असतो ! आणि म्हणूनच कित्येक लोक सावकाराच्या मगरमिठींत आपणहून सांपडतात. ही मगरमिठी दिवसेंदिवस घट्ट आवळली जाते आणि शेवटीं स्वतः निःसत्त्व चिपाड होऊन ते या जगांतून कायमची सुटका करून घेतात आणि बायकामुलांना मात्र या मगरमिठींत अडकवून जातात. मगरमिठी पडूंच नये आणि पडली तरी ती कशी सोडवावी याच्या अनेक मार्गांपैकी ग्रामीण उद्योगधंदा हा एक उत्तम मार्ग आहे. या रिकाम्या वेळांत काम व पैसा असला की त्यांची सुटका होऊं शकेल. या कामामुळे शेतीला जोडधंदा मिळेल व एकंदरींत शेतकऱ्यांची सांपत्तिक स्थिति सुधारण्यास मदत होईल.

(२) ग्रामीण उद्योगधंद्यांत भांडवलास दुय्यम प्राधान्यः— सर्व उत्पादन यांत्रिक साहाय्यानें करावयाचें ठरविलें तर हिंदला भांडवल किती लागेल ? मशिनरी, कारखान्यांच्या इमारती, मजुरी, व्यापारी कमिशन, व्यवस्था यांसाठी भांडवल खूप लागतें. आणि आपला हिंद पाश्चात्य देशांप्रमाणे भांडवलवाला नाही. हिंदमध्ये मजूर जास्त व भांडवल कमी ही स्थिति आहे. आणि म्हणूनच ग्रामीण उद्योगधंदे जोपासणें भाग पडलें. ग्रामीण उद्योगधंदे चालवायला भांडवल फारच थोडें लागतें. यांना नको मशिनरी, इमारती व्यवस्था ! अगदी थोडें आणि सोपें काम ! उद्योगधंद्याचीं अवजारें खेड्यांतच तयार करतां येतात. त्यामुळे परदेशीं पैसा पाठवायची जरूरी नाही. पूर्वीच्या काळीं तर ज्या गिऱ्हाइकांना माल हवा असे तेच त्याला लागणारा कच्चा माल पुरवीत असत. याचें उदाहरण म्हणजे तेलाचा घाणा ! तेल काढण्यासाठी गळिताचीं धान्यें शेतकरी पुरवीत असे आणि तेल नेत असे. तेल काढण्याबद्दल मजुरी म्हणून तेल्याला धान्य अथवा खाद्य पदार्थ पुरवी. या उद्योगधंद्यांत एक तर भांडवल कमी लागे व माल पण ताजा व चांगला मिळे. म्हणून अजूनसुद्धा कांही खेड्यांत ग्रामीण उद्योगधंदे अस्तित्वांत आहेत.

(३) ग्रामीण उद्योगधंद्यांत तयार झालेला मालः— ग्रामीण उद्योगधंद्यांत तयार होणाऱ्या मालावर मालक अथवा उत्पादन करणारा जातीनें लक्ष घालीत असतो आणि माल पण थोडा आणि लक्षपूर्वक तयार केला जातो. त्यामुळे तो सुबक, सुंदर आणि टिकाऊ असतो. शिवाय कांही माल उदा० लग्नमौंजीस धार्मिक दृष्ट्या लागणारें कापड अथवा इतर वस्तू, गालिचे, चटया, मातीचीं भाडीं, टोपल्या, वगैरे मोठ्या प्रमाणावर तयार करणें परवडत नाही. कारण या मालाचा खप फारच थोडा असतो, आणि खेड्यांतील जनतेला तर तो जरूर लागतो. म्हणून ग्रामीण उद्योगधंद्यांत तो तयार केला जातो.

(४) संपत्तीचें विकेंद्रीकरणः— ग्रामीण उद्योगधंद्यापासून अत्यंत महत्त्वाचा आर्थिक फायदा म्हणजे संपत्तीचें विकेंद्रीकरण. संपत्ति ठराविक लोकांच्याच हातीं राहिली म्हणजे समाजांत वर्गकलह निर्माण होतात. हा गरीब, हा श्रीमंत असे भेद वाढत जातात. मजूर व मालक यांचे संबंध दुरावतात. त्यांच्यांत तेढ निर्माण होते व ती तेढ वाढत राहते. ग्रामीण उद्योगधंद्यांत उत्पादन मोठ्या प्रमाणांत होत



नाही. त्यामुळे त्या उत्पादनाच्या नफ्याची संपत्ति ठराविक लोकांजवळ राहात नाही. अनेक उद्योगधंद्यांत ती विभागली जाते. प्रत्येकाच्या कसब अथवा कौशल्य व श्रमाप्रमाणे ती वांटली जाते. त्यामुळे सामाजिक कलह होण्याची धास्ती कमी.

ग्रामीण उद्योगधंदे पिढीजात चालत आलेले असल्यामुळे त्या उद्योगधंद्यांच्या शिक्षणासाठी निराळा काळ नवोदित नवशिक्या माणसाला फुकट घालवावा लागत नाही. त्याच्या शारीरिक वाढीबरोबरच त्याच्या भोवतालच्या निरीक्षणाने कारागिराचा मुलगा हळूहळू त्या धंद्यांतील माहिती घेत असतो. वडिलांनी धंद्यांत मिळविलेली पत त्याला पुढे उपयोगी पडते.

(५) उत्पादनाचें योग्य वांटपः— ग्रामीण उद्योगधंद्यांत उत्पन्न होणारा माल सर्वांना त्यांच्या गरजेनुसार कितीहि आणि केव्हाहि मिळत असे. त्यामुळे हल्लीच्या "काळ्या बाजाराला" त्यावेळीं स्थान नव्हतें. आणि अर्थातच राष्ट्रदोही, समाजद्रोही, नीच "काळाबाजार करून आपलीं ढेरपोटें वाढविणारे लोक" पण नव्हतेच.

(६) उत्पादनासाठी यणारा खर्चः— ग्रामीण उद्योगधंद्यासाठी, इमारत वगैरेसाठी भांडवल लागत नाही. उत्पादनासाठी पत्नी व मुलें यांचें विनामूल्य साहाय्य त्याला मिळत असल्यामुळे मजुरीचा खर्च पण कमी ! शिवाय त्या कारागिराच्या गरजा पण फारच कमी असायच्या. म्हणून जास्त नफा मिळवायची पण त्याला जरुरी भासत नसे. त्यामुळे उत्पादनासाठी खर्च फार थोडा येत असे.

(७) हल्लीच्या वाढत्या किंमतीला आळाः— आज युद्धामुळे व युद्धोत्तर उत्पादनांतील अडचणींमुळें वस्तूंच्या किंमती भरमसाठ वाढत आहेत. या वाढत्या किंमतींना आळा घालण्याचें आपलें व आपल्या सरकारचें आद्य कर्तव्य होऊन बसलें. यासाठी मोठमोठ्या अर्थशास्त्रज्ञांच्या बैठकी झाल्या व निरनिराळे उपाय पण सुचविले गेले. मुंबई योजनेंत (Bombay plan ) उत्पादक वस्तूंचें उत्पादन वाढविलें पाहिजे यावर अधिक जोर देण्यांत आला आहे; परंतु उत्पादनाचीं सर्व साधनें म्हणजे जमीन, मजूर, भांडवल व व्यवस्था हीं सर्व जर उत्पादक वस्तूंचे उत्पादनासाठीच केवळ उपयोगांत आणलीं तर नित्योपयोगी आणि जीवनपयोगी वस्तूच, उदा. कापड, खाद्यपदार्थ वगैरेंचें उत्पादन कमी होईल, कारण अर्थशास्त्राच्या नियमाप्रमाणे आपणाजवळ उत्पादन साधनें हीं मर्यादित आहेत. म्हणून सर्व उत्पादन-शक्ति उत्पादक वस्तूंच्या उत्पादनाकडे उपयोगांत आणली तर साहजिकच जीवनोपयोगी वस्तूंचें उत्पादन कमी होईल. हा माल कमी व त्याची मागणी तर आहे तेवढीच राहील. म्हणजे उत्पादनाच्या मानाने त्याला मागणी जास्त राहील. मागणी जास्त आणि माल कमी अर्थात् किंमती वाढणारच ! या वाढत्या किंमतीला आळा घालण्यासाठी ग्रामीण उद्योगधंदे उत्तम साहाय्य करूं शकतील. कारण या उद्योगधंद्यांनी थोड्या प्रमाणांत कां होईना जीवनोपयोगी वस्तूंत भर पडेल व किंमती कमी होण्यास मदत होईल.

(८) ग्रामीण उद्योगधंद्यांचा सामाजिक जीवनावर परिणामः— ग्रामीण उद्योगधंद्यांत सर्व मजुरांत निरनिराळीं कामें वाटलेलीं असतात, संपत्तीचें विकेंद्रीकरण झालेलें असतें. त्यामुळे मालक-मजूर यांमध्ये झगडा असायचें कारणच उरत नाही ! मग संप आणि लॉक आऊट कोठून येणार? मजूर समाजाचे घटक आहेत आणि त्यांच्या स्थैर्याने सामाजिक जीवनावरहि चांगला परिणाम होतो.

(९) रुपयाच्या किंमतींतील कपात व ग्रामीण उद्योगधंदेः— पौंडाची किंमत अमेरिकन डॉलरच्या किंमतीच्या प्रमाणांत कमी केली आणि त्याचबरोबर हिंद सरकारनेहि आपल्या रुपयाची किंमत कमी केली. रुपयाची किंमत कमी करण्याचा मुख्य हेतु हा की, आपला व्यापार भारताच्या दृष्टीने फायदेशीर व्हावा ( Favourable Balance of trade ), यासाठी आपली निर्यात वाढविली पाहिजे आणि आयात कमी केली पाहिजे. शक्य तोंवर डॉलर विभा-

गांतील ( Hard-currency area ) मालाची आयात खूपच कमी करायला हवी. यासाठी आपण उत्पादन वाढवायला पाहिजे. भांडवलाच्या अभावीं आपले यांत्रिक उद्योगधंदे पाहिजे तितक्या मोठ्या प्रमाणांत उत्पादन वाढवूं शकत नाहीत आणि आपले भांडवलदार बांधव-खरोखरच त्यांना भाऊ म्हणायला लाज वाटते— अधिक नफा मिळविणें हेंच एक ध्येय डोळ्यापुढे ठेवतात ! नफा हाच त्यांचा देव, नफा हें त्यांचें सर्वस्व ! देशाचें मग कांहीहि होवो ! नाहीतर राष्ट्राच्या या आणिबाणीच्या वेळीं भांडवल पुढे येऊं नये ना ? कोठे गेला तो काळ्याबाजाराचा पैसा ? कोठे गेला तो युद्धकालांतील नफा ? हें सर्व भांडवल का एकदम नाहिसें झालें हो ? पण भांडवलदारांची वृत्तिच हीन आहे. त्यासाठी कडक धोरण स्वीकारणें सरकारचें काम आहे.

पण तोंपर्यंत स्वस्थ बसून कसं चालेल ? ग्रामीण उद्योगधंद्यांची वाढ केल्याने उत्पादनाचा प्रश्न थोडा-बहुत सुटूं शकेल ! म्हणून ग्रामीण उद्योगधंदे वाढवायला पाहिजेत ! जोपासले पाहिजेत !

आणि हल्लीच्या परिस्थितींत ते वाढविण्यासाठी खालील गोष्टींची आवश्यकता आहे.

(१) **शिक्षण** :—ग्रामीण कारागिरांत अज्ञान व अशिक्षितपणा हे दोन अत्यंत मोठे दोष आहेत. हे दोष घालविण्यासाठी प्राथमिक व औद्योगिक मोफत शिक्षणाची सोय होणें अत्यवश्यक आहे. आजच्या आपल्या राष्ट्रीय सरकारने वर्धा योजनेनुसार बेसिक शिक्षण अथवा कृतिद्वारां शिक्षणाचें तत्त्व मान्य केलें आहे. आणि प्राथमिक शाळा व ट्रेनिंग कॉलेज यांमध्यें या कार्यास सुरवात सुद्धा झाली आहे.

ग्रामीण उद्योगधंद्यांच्या पुनरुद्धारासचें कार्य वर्धा येथील प्रयोगशाळेंत श्री. जे. सी. कुमारप्पांसारख्या विद्वान् अर्थशास्त्रज्ञाच्या देखरेखीखाली, गांधीजींच्या तत्त्वप्रणालीवर, व अनेक निरनिराळ्या पुढाऱ्यांच्या व विद्वानांच्या सहकार्यावर चाललेलें आहे. हे प्रयोग बऱ्याच अंशीं यशस्वी झाले आहेत. या सर्व विद्वानांच्या मतें "ग्रामीण उद्योगधंद्यांच्या पुनरुद्धाराशिवाय आजच्या हिंदमध्ये शांतता व सुव्यवस्था लाभणें बरेंच दुर्लभ आहे."

(२) **भांडवलः**—ग्रामीण उद्योगधंद्यांना सरकारने आर्थिक साहाय्य (subsidies) द्यायला पाहिजे; आपल्या राष्ट्रीय सरकारने 'स्टेट एड टु इंडस्ट्रीज्' ( State aid to Industries ) कायदा पास करून प्रांतिक सरकारांना अशा ग्रामीण उद्योगधंद्यांना आर्थिक साहाय्य देण्याची सत्ता दिली आहे. त्याशिवाय निरनिराळ्या सहकारी संस्था ( Co-operative Societies ) आर्थिक साहाय्य देण्याचें कार्य करीत आहेत.

(३) **कच्चा माल** :—ग्रामीण उद्योगधंद्यांना लागणारा कच्चा माल चांगला आणि भरपूर मिळेल अशी व्यवस्था व्हायला पाहिजे, म्हणजे उत्पादनहि होईल व ग्रामीण उद्योगधंदे वाढतीलहि. हल्ली कांही यांत्रिक कच्चा माल सुद्धा ग्रामीण उद्योगधंद्यांत उपयोगी पडतो. उदा॰ गिरणीचें सूत हातमागासाठी वापरतां येतें. गिरणीचें सूत भरपूर तर मिळणें शक्य नाही, पण थोडें जरी असलें तरी तें योग्य वाटलें गेलें तर हातमागाचे उद्योगधंदे वाढतील व त्याबरोबरच कापडाचें उत्पादनहि वाढेल.

(४) **बाजारपेठः**—माल तयार होईपर्यंत सर्व ठीक झालें. पण तो माल विकला गेला पाहिजे. त्याची किंमत आली तरच त्याची मेहनत करणाराला मेहनताना देतां येईल. म्हणून ही मेहनत उत्पादक होण्यासाठी (Productive Labour) त्या मालाची योग्य विक्री झाली पाहिजे. ग्रामीण उद्योगधंद्यांतील कारागिराला त्याच्या मालाची योग्य किंमत मिळूं शकत नाही. याचें कारण म्हणजे भांडवलदार व व्यापारी यांचा हस्तक्षेप व दलाली ! माल तयार करण्यासाठी कारागीर सावकाराकडून कर्ज काढतो आणि माल तयार झाला रे झाला कीं सावकार पैशाचा तगादा करतो. मग पैसे नाहीतर त्या मालाची बाजारभावापेक्षा कमी भावांत खरेदी हे दोनच मार्ग कारागिरापुढे ठेवतो ! बिचारा कारागीर ! हतबल असतो, अडलेला असतो. आणि म्हणून असल्या गाढवांचे पाय धरतो ! पण हे गाढव जातीवरच जातात ! लाथा झाडून कामगाराला



दूर लोटतात. भरमसाठ नफा मिळवितात ! प्रत्यक्ष घाम गाळणारा मजूर नि कारागीर अन्नवस्त्राला महाग असतो नि हे मध्यस्थी भांडवलदार मात्र इकडचें अंग तिकडे न हलवितां भरमसाठ नफा गिळंकृत करून अजीर्णाचे ढेकर देतात ! काय ही सामाजिक दुर्गति !

आपलें राष्ट्रीय सरकार कांही अंशीं ही दुर्गति नि वर्गभेद नाहीसा करण्याचा प्रयत्न करीत आहे. यासाठी ग्रामीण उद्योगधंद्याच्या मालाचीं प्रदर्शनें भरवून त्यासाठी स्वतंत्र विक्रीचीं दुकानें ठेवून हा माल जनतेच्या नजरेस आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. मार्केटिंग ऑफिसर्स व को-ऑप. सोसायट्यांच्या साहाय्याने हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न होत आहे. पण या मुंगीच्या पावलाच्या गतीकडे पाहिल्यानंतर ध्येयप्राप्तीचा डोंगर चढायला किती काळ लागेल याचा अंदाज करतां येत नाही. पण आर्थिक समता लवकरच आपल्या राष्ट्रांत नांदो हीच सदिच्छा !

— जय हिन्द —


## दि फॉर्च्यून प्रॉव्हिडंट इन्शुरन्स कं. लि.

रजिस्टर्ड ऑफिस : जळगांव पू. खा.

**आयुष्याचा विमा रु. १०० पासून रु. ९०० पर्यंत स्वीकारला जातो.**

— कंपनीचीं वैशिष्ट्यें —

[ १ ] २¾ टक्के इतका कमी व्याजाचा दर गृहीत धरूनहि कंपनीचे पाहिल्याच मूल्यमापनांत कंपनीची आर्थिक परिस्थिति अत्यंत समाधानकारक असल्याचें दिसून आलें.

[ २ ] विमा कायद्याप्रमाणें गव्हर्नमेंट अॅप्रुव्हड सिक्युरिटीजमध्यें व रिझर्व बँक ऑफ इंडियाकडे जरुरीपेक्षां अधिक रकम गुंतविलेली आहे.

[ ३ ] शारीरिक तपासणीसहित अगर शारीरिक तपासणीशिवाय विमे उतरविले जातात.

[ ४ ] क्लेमच्या रकमा ताबडतोब देण्यांत येतात.

[ ५ ] विमा-अर्जाबरोबर प्रवेश फी आकारली जात नाहीं.

[ ६ ] एजन्सीकरितां लायसेन्सची जरुरी नाहीं.

**ठिकठिकाणीं सढळ अटींवर एजन्सीज व स्पेशल एजन्सीज देणें आहेत.**

विशेष माहितीसाठी लिहा :— के. एच्. संघवी
डी. एल्. रिसबूड
डायरेक्टर्स.

# मराठी वाङ्मय मंडळ

मराठी वाङ्मय मंडळ, विद्यालय सुरू झाल्यावर, बरेंच उशिरां म्हणजे १३ सप्टेंबरला स्थापलें गेलें. मंडळ स्थापण्याचा उद्देश विद्यालयांतील मराठी भाषाप्रेमिकांनी एकत्र येऊन वादविवाद, चर्चा, निबंध वाचन करावें, श्रेष्ठ साहित्यिकांचे स्मृतिदिन साजरे करावेत व परस्थ विद्वानांचीं भाषणें करवून विद्यार्थ्यांत मराठी वाङ्मयाविषयीं विशेष ज्ञान व आपुलकी उत्पन्न करावी असा होता.

प्रत्येक वर्गाचा एक याप्रमाणे प्रतिनिधी निवडण्यांत आले होते.

एफ्. वाय्. आर्टस् : जी. एच्. कुलकर्णी.
एफ्. वाय्. सायन्स् : बी. जामखेडकर
इंटर आर्टस् : एम्. एस्. मुजुमदार.
इंटर सायन्स् : पी. टी. वाणी.
एफ्. वाय्. सायन्स् : के. डी. पाटील.
बी. ए. बी. एस्सी : पद्माकर लांडगे.
स्त्री–प्रातिनिधि : कु. पुष्पा कार्णिक.

मराठी वाङ्मय मंडळाच्या कार्यक्रमास सुरुवात मराठी भाषेचा क्रांतिकारक व आद्य असा काव्य-ग्रंथ ज्ञानेश्वरी याच्या जयंतीने झाली. या प्रसंगीं श्री. ब. ह. पळशीकर अध्यक्ष म्हणून लाभले होते. संतवाङ्मयाचा व्यासंग असल्यानें त्यांनी विद्वत्तापूर्ण व अधिकारी वाणीने ज्ञानेश्वरीवर भाष्य केलें.

नंतरचा कार्यक्रम वादविवादाचा झाला. "आजची बोलपटसृष्टि वास्तव आणि समाजास हितकारक आहे का ? " हा वादाचा विषय होता. विद्यार्थि व विद्यार्थिनींनी हिरिरीने आपापली बाजू लढवली. एकंदरींत हिंदी चित्रपटसृष्टीपेक्षा मराठी चित्रपटसृष्टि प्रगातिपथावर व ध्येयबिंदूकडे जात आहे असें बहुतेकांचें मत पडलें.

आधुनिक मराठी काव्याचे जनक कवि केशवसुत यांची पुण्यतिथि साजरी करण्यांत आली. विद्यार्थ्यांनी अभ्यासपूर्ण भाषणें करून या क्रांतिकारक कवीस आदरांजली वाहिली.

चवथा कार्यक्रम म्हणजे जळगांव येथील साहित्य संमेलनाचे अध्यक्ष व रविकिरणमंडळाचे अध्वर्यु माधव ज्युलिअन् यांच्या पुण्यातिथीचा. या प्रसंगीं मराठींतील नामवंत व विद्वान् टीकाकार श्री. श्री. के. क्षीरसागर अध्यक्ष म्हणून लाभले होते. वैयक्तिक आठवणी, वाङ्मयीन गुणदोषविवेचन, व माधवराव पटवर्धन यांविषयींचा आदर यामुळे व्याख्यान प्रसंगोचित गांभीर्याने व माहितीपूर्ण असें झालें.

नंतर " माझें युद्धकाळांतील युरोपभ्रमण " या विषयावर पुणें येथील श्री. अनंतराव लिमये यांचें भाषण झालें. एक मराठी माणूस तिकडे भाषाभिन्नता वगैरे गोष्टींमुळे कशा अडचणींत सांपडतो याविषयींचें तें एक मोठें गमतीदार असें भाषण झालें. त्यांच्यावरील बारीकसारीक प्रसंग म्हणजे कोणत्याहि लघुकथेला पुरेल एवढा मालमसाला होता.

मध्यंतरी मराठी वाङ्मय मंडळाचा पोटविभाग म्हणून "अभ्यास मंडळ" सुरू करण्यांत आलें होतें. याचे चिटणीस म्हणून श्री. म. शं. मुजुमदार व सहाचिटणीस म्हणून कुमारी उषा पटवर्धन यांची नेमणूक करण्यांत आली होती. या अभ्यासमंडळातर्फे तीन कार्यक्रम झाले.

पहिल्यांदा " आजचें मराठी काव्य प्रगातिपथावर आहे काय " या विषयाचा उपन्यास प्रा. म. ना. अदवंतांनी केला व विद्यार्थ्यांनी चर्चा केली.



श्री. नेमाडे यांनी " मराठींतील ऐतिहासिक कादंबरी " या विषयावर व्याख्यान दिलें. सखोल वाचन, बहुश्रुतता यामुळे त्यांचें व्याख्यान उद्बोधक व विवेचक असें झालें.

काव्य, कादंबरीनंतर नाटकाचा क्रम यावा हें स्वाभाविकच होतें. प्रख्यात नट व ललितकलादर्श कंपनीचे मालक कै. बापुराव पेंढारकर यांचे चिरंजीव श्री. भालचंद्र पेंढारकर यांचें " मराठी नाट्यसृष्टि " या विषयावर व्याख्यान झालें. स्वतः नाट्यसृष्टींतील कलावंत असल्याने व्याख्यानांत माहितीबरोबरच जिव्हाळा व कळकळ ओतप्रोत भरली होती त्यामुळें व्याख्यान परिणामकारक झालें.

दि. ११–२–५० रोजीं दासनवमीचा समारंभ साजरा करण्यांत आला. जळगांवचे रामदास वाङ्मयाचे व्यासंगी विद्वान् श्री. रा. कृ. प्रभुदेसाई हे या प्रसंगीं प्रमुख वक्ते होते. त्यांनी आपल्या रसाळ भाषणांत रामदासांच्या कार्याचें विवेचन केलें व त्यांच्या वाङ्मयावर येणाऱ्या निरनिराळ्या आक्षेपांचें निरसन केलें.

मराठी वाङ्मय मंडळ व अभ्यासमंडळ यांच्या यंदाच्या कार्याचा समारोप याच प्रसंगीं करण्यांत आला.

| | |
|---|---|
| | प्रा. म. ना. अदवंत (उपाध्यक्ष) |
| पद्माकर लांडगे<br>कु. पुष्पा कार्णिक<br>चिटणीस | प्रा. ग. ह. तारळेकर (कार्याध्यक्ष) |


## राधाकृष्ण मेडिकल स्टोअर्स

### औषधाचे व्यापारी

— आमचेकडे —

सर्व प्रकारचीं आयुर्वेदिक, ॲलोपेथीक, बॉयलॉजिक व पेटंट औषधें तसेंच प्रोव्हिजन, टॉयलेट व स्टेशनरी सामान माफक दराने मिळेल.

ठिकाणः—माहिजीबाजार, जळगांव, पू. खा.

सर्व प्रकारच्या इलेक्ट्रिक सामान स्वस्त दरानें

— मिळण्याचें एकच ठिकाण —

**धी अरुण इलेक्ट्रिक ॲण्ड जनरल स्टोअर्स**

डॉ. आचार्य यांचे शेजारी, माहेजी बाजार, जळगांव.

इलेक्ट्रिकचें सर्व सामान, मोटर्स, इलेक्ट्रिकल वर्दींगटन्, सिमस्पन्, डायरेक्ट कपल पंपसेट, डोमॅस्टिक सेल्फप्रायमिंग पंपसेट, एमको सिलींग फॅन्स ३६" ते ४८", एमको टेबल फॅन्स १४", आसुलेटिंग व सर्व तऱ्हेचे ग्लोब स्वस्त भावाने विकत मिळतील.

तसेंच हाऊस वायरिंगचीं व सिनेमा वायरिंगचीं कामें उत्तम प्रकारें करून दिलीं जातात.

**आपणांस लागणारीं क्रमिक पुस्तकें, टिपणी पुस्तकें**

तसेंच

**वाचनालयें व भेट पुस्तकें**

थोडक्यांत

आपल्या कोणत्याहि प्रकारच्या वाङ्मयीन गरजांसाठीं

भेटा अथवा लिहा.

व्हीनस बुकस्टॉल

अप्पा बळवंत चौक : पुणें २.


टीपः— मुद्रणलेखन महाराष्ट्र साहित्य परिषदेप्रमाणे.


२० वर्षांचा अनुभव असलेले, अप्-टु-डेट व आधुनिक शिलाईचे
व रेग्युलर कपडे शिवून मिळण्याचें

— एकच ठिकाण —

**हायक्लास टेलरिंग फर्म**

प्रोप्रायटर— एस्. एस्. भोळे

माहिजी बाजार,

जळगांव, पूर्व खानदेश.

**खान्देश स्पोर्टस्**

जळगांव पू. खा.

बक्षीसांस लागणारे कप्स्, शिल्डस् मेडल्स् मिळतील

फुटबॉल, व्हॉलीबॉल, हॉकी, क्रिकेट बॅडमिंटन व देशी खेळांचे सामान — मिळेल.

# जर्मन डिझेल इंजिनें



H. M. G.
एच्. एम्. जी.



Lombardini.
लोम्बारडीनी.

६ ते २०० हॉर्स पॉवरपर्यंत

आडवे व उभे

— मिळण्याचें एकच ठिकाण —

## धी ईस्ट ॲण्ड वेस्ट एजन्सीज्

मोटार स्टॅन्ड समोर—

जळगांव, पूर्व खानदेश.



संपादक व प्रकाशकः— प्रा. म. ना. अद्वंत, जळगांव, पू. खा.
मुद्रकः— लक्ष्मण नारायण चापेकर, आर्यसंस्कृति मुद्रणालय, टिळक रस्ता पुणें २.